
प्रकाशित
मनोज मधुकर कळमकर
लिखित
पोलीसदादा
पोलीस कथासंग्रह



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# पोलीसदादा

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# पोलीसदादा

लेखक : मनोज मधुकर कळमकर



# पोलीसदादा

## लेखक : मनोज मधुकर कळमकर

पत्ता -शिव समर्थ निवास, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर जवळ खालापूर.

तालुका -खालापूर. जिल्हा -रायगड

पिन- 410 202

संपर्क क्रमांक- 97 65 89 9 878

Email : manojkalamkar76@gmail. com

**या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.**

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

प्रकाशन : ४ जुलै २०२१ (पोलीसदादांचा प्रथम स्मृतीदिन)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



मनोज मधुकर कळमकर



**दैनिक पुढारी, दैनिक सकाळ, दैनिक सागर, दैनिक महानगर या दैनिकात खालापूर प्रतिनिधी म्हणून विविध विषयावर लिखाण. कृषी,क्राईम, सामाजिक प्रश्न ऐतिहासिक तसेच शोध पत्रकारिता माध्यमातून विविध विषयावर लिखाण.

** आवड -वाचनाच्या छंदातून पत्रकारितेकडे ओढा त्यातूनच पुढे क्राईम स्टोरी लिहिण्याची संधी मिळाली कवितां चारोळी तसेच व्यंगचित्र आवड.

** आवडते लेखक व कवी -पु ल देशपांडे, आचार्य अत्रे, सुहास शिरवळकर, व पु काळे,शांता शेळके, विश्वास पाटील, दिलीप प्रभावळकर.

**लेखन- सत्य घटनेवर आधारीत क्राईम स्टोरी हे दुसरे पुस्तक प्रकाशन होत आहे. ई साहित्याच्या माध्यमातूनच क्राईम स्टोरी आधारित सद्रक्षणाय आहे हे पहिले पुस्तक प्रकाशित झाले आहे.

**भविष्य वेध -क्राईम स्टोरी लिखाण सोबतच कवितेची आवड असल्याने कविता आणि चारोळी ई साहित्याच्या माध्यमातून प्रकाशित करण्याचा मानस.



# मनोगत

ऑनलाइनच विश्व एवढ्या झपाटाने सर्व काबीज करेल असं काल परवा परत वाटलं नव्हतं. परंतु 2020 मध्ये आलेल्या कोरोना आजाराने माणसाला घरात बसवलं आणि ऑनलाइन जगाची ओळख अगदी पाच वर्षाच्या मुलापासून ते ऐंशी वर्षाच्या आजोबांपर्यंत सर्वांना झाली. गरजेची वाटू लागली मग ते शिक्षण असो किंवा आजोबांनी घरात बसून दूर असलेल्या नातवाशी साधलेला संवाद. माध्यम होतं ऑनलाईन.

गुन्हेगारी जगतात घडणाऱ्या घटना कथा स्वरूपात आणताना सुरुवातीला जी प्रेरणा मिळाली ती घरातून. वडिलांची पोलीस खात्यातील नोकरी आणि त्यानंतर मोठे बंधू महेश कळमकर यांची पोलीस खात्यातील नोकरी.

ह्या पुस्तकाचं नाव पोलीस दादा या अर्थाने आहे कि वर्दीत असलेला पोलीस हा सर्वसामान्य नागरिकांसाठी आधार असतो. मनातील भय, भीती वर्दीत असलेला पोलीस दादाला पाहिला की निघून जाते. अनेक वर्ष पोलिसांची हेटाळणी करत पांडू हवालदार असं संबोधलं जायचं. परंतु अनेक घटना आणि 2020 मध्ये आलेल्या कोरोना आजारात या विषाणूला रोखण्यासाठी देखील



वर्दितील पोलीस दादाच अहोरात्र रस्त्यावर उभा होता. हा विषाणू जगात पसरला असं म्हणण्यापेक्षा ह्या विषाणूने जग दाखवलं असे म्हणण्याची वेळ आली. सर्वसामान्यांना देखील पांडू हवालदार मध्ये पांडुरंगाचा साक्षात्कार होऊन पोलीस दादा तू पांडू नव्हे पांडुरंग आहेस याची प्रचिती आली.

2020 हा काळ अतिशय कठीण गेला. माझ्या कुटुंबासाठी देखील मोठा आघात ह्या वर्षांमध्ये झाला. कर्तव्य बजावत असताना सहाय्यक फौजदार महेश कळमकर यांना कोरोना आजारानी गाठलं आणि त्या आजाराने त्यांचे आयुष्य संपवलं. आमचा दादा आणि सर्वसामान्यांचा पोलिसदादा ह्या आजारानी हिरावून घेतला. पोलीस खात्यात नोकरी करताना गुन्हेगाराचा शोध घेण्यासाठी कर्जत स्टेशनला वडा विक्रेत्याच्या भूमिकेत तर कधी युपी वाला भैया बनवून परप्रांतीयांमध्ये मिसळणारा आमचा दादा हरहुन्नरी होता. झारखंड सारख्या नक्षलग्रस्त भागातून देखील आरोपी आणताना जिवाची बाजी लावणारा असा आमचा पोलीस दादा हा महाराष्ट्र पोलिसांची मान उंचावणारा असा होता. या पुस्तकातील एका कथेत मायलेकरांची भेट घडून आणताना वर्दीच्या पलीकडे देखील माणूस असतो याची जाणीव करून देणारा असा हा पोलीस दादा वाचकांच्या भेटीला आणताना मनात पोलिसांबद्दल चा अभिमान दाटून येतो.



गुन्हेगारी विश्वातील बातम्या, सविस्तर माहिती वेळोवेळी देणारे सर्व पोलिस अधिकारी कर्मचारी यांचे मनापासून आभार व्यक्त करावेसे वाटतात. काहीतरी वेगळं करण्यासाठी नेहमी प्रोत्साहित करणारे ई साहित्यचे अध्यक्ष सुनील सामंत साहेब, आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागातील पोलीस निरीक्षक जमील शेख, पोलीस निरीक्षक विश्वजित काईंगडे, खालापूर पोलीस निरीक्षक अनिल विभुते, पुस्तकाच्या मुखपृष्ठासाठी मदत करणारा माझा कलाकार मित्र अतुल सोळंकी, टायपिंगसाठी मदत करणारी भाग्यश्री शिंदे तसेच नेहमी वेगळ्या कामाचे कौतुक करणारे तहसीलदार ईरेश चप्पलवार, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शिव-व्याख्याते प्रशांतजी देशमुख यांचे विशेष आभार.



**पोलीस खात्यात नोकरी करणे म्हणजे सुळावरची पोळी** अशी परिस्थिती असते. परंतु हे आव्हान समर्थपणे पेलून भारताच्या कानाकोपऱ्यात जाऊन आरोपी पकडून आणले, प्रसंगी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता नक्षलग्रस्त भागातून देखील गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या असे माझे बंधू



**सहाय्यक फौजदार कैलासवासी महेश मधुकर कळमकर**

यांना हे पुस्तक अर्पण करीत आहे.



# कथानुक्रम


1. दारूसाठी वाट्टेल ते
2. झोपमोड
3. लोभ
4. छकुली
5. खदखद
6. भंगार
7. डॉक्टर तुम्ही सुद्धा
8. काळी
9. प्रेयसी
10. तोतया
11. दानव
12. वर्दीतील पोलीस दादा
13. सापळा
14. नराधम
15. बनाव
16. संशयाचे भूत
17. निष्कलंक
18. कोवळी कळी
19. फसलेली गेम
20. पार्टी
21. महागडा मोबाईल


या कथासंग्रहातील कथा सत्यघटनांवर आधारित असल्या तरी त्यांना कथारूप देताना काही बदल केलेले आहेत. या कथा वाचकांना अनुभव यावा व त्यांनी सावध रहावे या हेतूने लिहीलेल्या आहेत. त्यात कोणा व्यक्तीची वा समाजाची बदनामी वा हानी करण्याचा हेतू नाही. यातील व्यक्ती व स्थळांची नावे बदलण्यात आली आहेत. जर यांचे कोणाशी साम्य आढळून आले तर तो योगायोग समजावा.



# दारूसाठी वाट्टेल ते

दिवसभरात एकाही गुन्ह्याची नोंद नाही, साधी एनसी दाखल झाली नव्हती त्यामुळे नाईट ड्यूटीचा चार्ज घेतलेला हवालदार म्हात्रे रात्र सुद्धा सुखाचे जावू दे अशी मनोमन प्रार्थना करत होते. तेवढ्यात फोनची रिंग वाजली. दुसरी रिंग व्हायच्या आधीच म्हात्रेनी रिसीव्हर कानाला लावला. पलीकडून घाबरलेला, धाप लागलेला आवाजात साहेब खून झालाय.. .. लवकर या.. असे शब्द कानी पडले. समोरची व्यक्ती प्रचंड घाबरलेली जाणवत होती. त्यामुळे म्हात्रे यांनी धीर देत घाबरू नका कुठे खून झालाय याची व्यवस्थित माहिती द्या असे सांगितले. साहेब कोमल हॉटेल जवळ एकाला चाकुने भोसकले अशी माहिती फोनवरील व्यक्तीनी दिली. खुनाचा गंभीर प्रकार असल्यामुळे हवालदार म्हात्रे सोबत दोन पोलीस शिपाई घेऊन कोमल हॉटेल कडे रवाना झाले.

जुन्या मुंबई-पुणे हायवेवर खालापूर पासून सहा किलोमीटरवर असलेल्या कोमल हॉटेलच्या दिशेने भरधाव वेगात पोलीस जीप निघाली. पोलीस स्टेशनमधून निघताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक पाटील यांना खुनाची माहिती म्हात्रे यांनी फोनवरून दिली होती. पाच मिनिटात जीप कोमल हॉटेलजवळ पोहचली. ट्रक पार्किंग



भागात गर्दी होती. जीपमधून उतरणाऱ्या पोलिसांना पाहताच गर्दी पांगू लागली. अंदाजे 35 वर्षाचा तरूण रक्ताच्या थारोळयात पडलेला. हवालदार म्हात्रे आजूबाजूला निरीक्षण करत असताना रक्ताने माखलेला चाकू त्याच्या दृष्टीस पडला. तेवढ्यात पाठीमागून आवाज आला. साहेब मी फोन केला होता पोलीस स्टेशनला असे सांगत कपाळावर आडवे पांढरे गंध लावलेला एकजण पुढे आला. साहेब मी कोमल हॉटेलचे मॅनेजर नागेश. जोरात किंकाळी ऐकली म्हणून मी धावत बाहेर आलो. पाहतोय तर सुधाकर जमिनीवर पडलेला. पोटात कोणीतरी चाकूच मारल्यामुळे तो विव्हळत होता. नागेश जखमी तरुणाला नावाने ओळखत असल्यामुळे हवालदार म्हात्रेनी सुधाकर विषयी माहिती गोळा करण्यास सुरुवात केली.

सुधाकर ट्रक ड्रायव्हर आहे. नेहमी माझ्या हॉटेलवर जेवायला थांबतो अशी माहिती नागेशने पुरवली. सुधाकर चाकू हल्ला होताना कोणी पाहिले का असे विचारल्यावर जमलेल्या गर्दीने नकारार्थी सूर लावला. प्रत्यक्षदर्शी नसल्यामुळे हवालदार म्हात्रे विचारात पडले. खून होताना कोणीच पाहिले नसल्याचे इन्स्पेक्टर पाटील यांना म्हात्रे यांनी फोनवर सांगितले. त्यावर ट्रक ड्रायव्हर सुधाकर यांच्या ट्रान्सपोर्ट कंपनीची माहिती घेऊन काही तपास लागतो का पहा अशा सूचना पाटील यांनी दिल्या. हॉटेल मॅनेजर नागेश यांनी जवळच उभ्या असलेल्या ट्रकच्या दिशेने हात दाखवत



हा सुधाकरचा ट्रक असे सांगितले. जय मल्हार ट्रान्सपोर्ट सोलापूर असा बोर्ड असलेले दोन ट्रक एकमेकाला खेटून उभे होते. हवालदार म्हात्रे यांनी ट्रकच्या बोर्ड वरील मोबाईल नंबर डायल केला. भगवान जाधव बोलतोय अशी ओळख समोरच्या व्यक्तीने करून दिली. तसेच आपण जय मल्हार ट्रान्सपोर्टचे मालक असल्याचे सांगितले. हवालदार म्हात्रे यांनी ड्रायव्हर सुधाकरचा खून झाल्याचे सांगताच भगवानला धक्काच बसला. स्वतःला सावरत त्याने सुधाकरचा घरचा पत्ता व नंबर म्हात्रेना दिला. साहेब सुधाकर आणि पोपट दोन ड्रायव्हर माझ्याकडे काम करत असून सकाळी दोघ माल भरून वाशीला गेले होते अशी माहिती दिल्यावर म्हात्रेना दुसऱ्या ट्रकचा उलगडा झाला. परंतु तुमचा दुसरा ड्रायव्हर पोपट कुठे दिसत नाही असे सांगितल्यावर, कुठेतरी दारू पिऊन पडला असेल असे भगवानने सांगितल. हवालदार म्हात्रेनी हॉटेलचे सर्व परिसर पिंजून काढला पण पोपटचा काहीच तपास नव्हता.

सकाळी सुधाकरचा भाऊ व नातेवाईक प्रेत ताब्यात घ्यायला आले. सोबतच्या मित्राचा खून झाला तरी पोपटचा काहीच पत्ता नाही म्हंटल्यावर हवालदार म्हात्रेच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. सुधाकरच्या भावाजवळ पोपटची माहिती पत्ता



विचारून प्रेत नातेवाईकांच्या हवाली केले. इन्स्पेक्टर पाटील यांना पोपट विषयी माहिती देताच लगोलग पोपटच्या गावी सोलापूरला निघायच्या सूचना म्हात्रेना मिळाल्या. चार जणांचे पथक दहा तासांचा प्रवास करून सोलापूरला पोहोचेपर्यंत रात्र झालेली. सोलापूरपासून पंचवीस किलोमीटरवर पोपटचे गाव होत. रात्रीच्या वेळेस अनोळखी गावात जायचे म्हटल्यावर स्थानिक पोलिस घेऊन म्हात्रे व टीम निघाली. पोपटच्या गावात पोहचल्यानंतर पोलीस पाटलांना उठवण्यात आल. बॅटरीच्या उजेडात पोपटच घर पोलीस पाटलांनी दाखवल्यावर म्हात्रेनी सोबतच्या शिपायाना घराभोवती गराडा घालण्यास सांगितल. दारावरची कडी बराच वेळ वाजवल्यानंतर पोपटच्या पत्नीने दरवाजा उघडला. पोपटराव आहेत का? उठवा जरा असे म्हात्रेनी सांगताच.. त्यो काय मुडदा पिऊन झोपलाय, सकाळ पर्यंत उठायचा नाय सकाळी या असे पोपटच्या बायकोने तिरमिरीत सांगितले. आम्ही पोलिस आहोत असे सांगत म्हात्रे आणि सोबतचे शिपायाने घरात घुसत पोपटच बिऱ्हाड उचलल. नशेत टूम पोपटला गाडीत बसवत गाडी सोलापूरवरून खालापूरच्या दिशेने निघाली.

सकाळी गाडी खालापूर पोलीस स्टेशनच्या आवारात शिरली तशी पोपटची नशा देखील बऱ्यापैकी उतरली होती. पोलिसांच्या ताब्यात आहोत समजल्यावर पोपटचे हात पाय गळाले. इन्स्पेक्टर



पाटील यांच्या पुढ्यात पोपटला उभे करण्यात आले. सव्वासहा फुटी पाटील इन्स्पेक्टरनी कमावलेल्या आवाजात पोपटला सुधाकरचा खून का केलास? असे विचारताच पोपटला दरदरून घाम फुटला. पोपटची होती नव्हती तेवढी नशा उतरली. आपल काही खरं नाही हे समजून पोपटने सांगण्यास सुरुवात केली. साहेब मी आणि सुधाकर दोस्त. मुंबई ट्रिप असली का कोमल हॉटेलला थांबून खानपान करायचो. जेवणाअगोदर दारूची पार्टी करायची अस आमचा नेहमी ठरलेल असायचा. त्यादिवशी दारू पार्टीचा खर्च करण्याची पाळी सुधाकरची होती. पण तो मला दारू पाजण्यास नका देऊ लागला असे पोपट सांगताना मध्येच थांबला. पुढे सांग, पाटील साहेबांचा आवाज ऐकताच पोपटने पुन्हा सांगायला सुरुवात केली. मी नेहमी सुधाकरला दारू पाजायचो पण तो त्या दिवशी आढेवेढे घेऊ लागल्यामुळे माझ टाळक सटकल आणि रागाच्या भरात मी सुधाकरच्या पोटात चाकू मारला असे पोपटने सांगितले. साहेब त्याला ठार मारायचं नव्हतं पण रागाच्या भरात सर्व घडल. त्याचा मला पश्चाताप होते असे म्हणत हात जोडून पोपट सांगू लागला. केवळ दारुसाठी मित्राचा जीव घेतला आता कर्माची फळं भोग अस सांगत पोपटला लॉकअपमध्ये टाकायचा आदेश इन्स्पेक्टर पाटील यांनी दिला.



# झोपमोड

यशचे लग्न आठवड्यावर येवून ठेपले होते. दळवी चा एकुलता एक मुलगा यश. सून घरात येणार म्हटल्यावर यशच्या आईचा उत्साह सोसायटी मधील प्रत्येकजण पाहत होता.

दळवी पतिपत्नीची धावपळ सुरु होती. तरी बरं हळदीपासून लग्नाचा सर्व विधी हॉलवर ठेवल्यामुळे अर्धअधिक कामाचा भार कमी झालेला. दळवीचा मुलगा यश कंपनीत चांगल्या हुद्यावर होता. रात्रपाळी करून आल्यामुळे दमलेल्या यशने चांगली ताणून द्यायची ठरवली होती.

"बाबा आणि तू पत्रिका वाटायला जाणार आहात ना? यशने आईला विचारले.

"आम्ही तासाभरात परत येतोच जवळपासच्या पत्रिका दयायच्या राहिल्यात " असे आईने यशला उत्तर दिले.

" कंपनीत रात्रभर जागरण झालंय मला निवांत झोपायचं असे यशने आईबाबांना सांगितले



यशचं डारडूर झोपणं आईला माहिती होतं. त्यामुळे तासाभरानी परत आल्यावर यश दार उघडायला येईल याची खात्री नव्हती. दमलेल्या यशची झोपमोड करणे आईला पटत नव्हतं

"यश मी दरवाजा बाहेरून लॉक करते तुला त्रास नको आईने यशला सांगून दरवाजाला बाहेरून टाळे लावले.

थकलेल्या यशने एसी सुरु केला आणि पाच मिनिटातच गाढ झोपी गेला.

करवतीने कापण्यासारख्या आवाजाने झोपमोड झालेला यश वैतागला. आईबाबा परत आले असतील आणि बाबांचा काहीतरी उदयोग चालला असेल असे समजून यशने डोक्याखालची उशी काढून कानावर घेतली. परंतु तरी सुद्धा करवतीची कर.. कर.. कानात घुसत होती. 'बाबाना पण आताच काम करायचं होतं? झोपेचं पार खोबरं केल " असं पुटपुटत वैतगलेला यश बेडरूम मधून बाहेर आला.

बाबाना डायरेक्ट बोलण्यापेक्षा आईला सांगू म्हणून यश किचनकडे वळला. परंतु आई किचनमध्ये नव्हती. आईबाबांच्या बेडरूममधून करवतीची आवाज ऐकू येत होती यशची पावले त्या दिशेने वळली. आणि क्षणातच यशच्या डोळ्यावरची झापड उडाली. एक अनोळखी तरुण कपाटाजवळ उभा होता. हातात



करवत, फरशीवर हातोडा आणि बरंचस सामान असताव्यस्त पडलेलं. आपल्या पाठीमागे कोणीतरी उभं आहे याची चाहूल कपाटाजवळ असलेल्या तरुणाला लागली. त्याने मागे वळून पाहताच दारात ऊभ्या असलेल्या यशला पाहून भूत पहिल्यासारखा त्या तरुणाचा चेहरा झाला. क्षणभर दोघांची नजरानजर झाली. यशला काही सुचत नव्हते. त्याचक्षणी कपाट तोडण्याचा प्रयत्न करत असलेल्या चोरट्यानी जमिनीवर पडलेला हातोडा उचलून यशवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. हातोड्याचा फटका कसबासा चुकवत यशने चोरट्यावर झडप घातली. प्रतिकार होईल याची जराही कल्पना नसलेला चोरटा यशचा प्रतिकार बघूनच चांगलाच गडबडला. यश आणि चोरट्याची झटापट झाली. चोरटा तरुण अंगपिडाने मजबूत असल्यामुळे आपल्याला आटपणार नाही याची कल्पना आलेल्या यशने बिल्डींगमधील शेजाऱ्यांना मदतीसाठी आरोळी ठोकली. चोर.. .. चोर.. असा आवाज देताना यशचा चोरट्याला पकडून ठेवण्याचा प्रयत्न सुरु होता.

आता आपली खैर नाही. बिल्डींलमधली रहिवाशी आले तर आपण पकडले जावून हे ओळखून चोरट्याना उरलीसूरली ताकद एकवटून यशला जोराचा हिसडा मारला. यश मागे भिंतीवर जावून आदळला. तेवढी संधी मिळताच चोरट्यानी सर्व सामान टाकून



पळ काढला. स्वत:ला सावरत यश कसाबसा उठला आणि चोरट्याच्या मागे धावत निघाला.

"चोर.. चोर.. पकडा.. .. "असा आवाज देत यश बिल्डिंगच्या खाली आला. चोरट्याचा साथीदार बिल्डिंगच्या खाली मोटारसायकल टेहळणी करत उभा होता. साथीदाराला कोणीतरी पकडण्याचा प्रयत्न करतोय हे पाहून दुचाकी सोडून दुसऱ्या चोरट्यानीपण पळ काढला. सराईत चोरटे काही सेकंदातच दिसेनासे झाले. टोळी असणार मागे जाण्यात काही अर्थ नाही त्यामुळे यश परत फ्लॅटमध्ये जाण्यास निघाला.

तेवढ्यात आईबाबांना कारमधून येताना पाहून यश थांबला. कारमधून उतरताना घामाघूम यशला पाहून आश्चर्य वाटले..

"काय रे झोपणार होतास ना? का लग्न जवळ आलंय म्हणून झोप उडालेय आईने हसत मारलेला टोमणा आणि त्याला बाबानी दिलेली टाळी यावर यश स्तब्धच ऊभा होता.

यशला शांत पाहून आईने पुन्हा यशला विचारल्यावर.. काही मिनिटापूर्वी घडलेला प्रकार यशने आईबाबाना सांगितला. यशनी सांगितलेली हकीकत ऐकून दोघाना धक्काच बसला. घरात लग्न असल्यामुळे कपाटात लाखो रुपयाचे दागिने व रोख रक्कम आणून ठेवलेली. यशच्या बाबानी तडक फ्लॅट गाठला. कपाट फोडण्यात



चोरटा अयशस्वी झाला होता. दागिने, पैसा राहू दे साबाईमातेच्या कृपेने पोराला काही झालं नाही हे नशिब असे म्हणताना आईचे डोळे भरून आले. बंद दरवाजा आड राहणाऱ्या शेजाऱ्यांना आपल्या बिल्डिंगमध्ये काय प्रकार घडलाय याची थोडीसुद्धा भनक नव्हती. याचा फायदा घेत चोरट्यानी दळवीच्या दरवाजाला लॉक पाहून चोरी करण्याचा प्रयत्न केला होता परंतु यशच्या शौर्यामुळे लाखोच्या चोरीचा डाव फसला होता.



# लोभ

जेमतेम आठवडा शिल्लक राहिला होता इम्रान च्या लग्नाला. रंगरंगोटीसह बहुतेक सगळी कामे आटपत आलेली. तरीसुद्धा इम्रानची अम्मी व अब्बूची धावपळ काही कमी झाली नव्हती. एकुलता एक लाडक्या छोकऱ्याच्या लग्नकरिता दोघांनी आयुष्यभर पै पै करून साठवलेली जमा पुंजी खर्च करायची ठरवल. परिस्थिती बेताचीच. घरची थोडी शेती व जोडधंदा म्हणून पिठाची गिरण यावर गुजराण सुरू होती. घरात येणाऱ्या सुनेला पाच लाखाचे दागिने बनवले होते. संध्याकाळी सातच्या दरम्यान इम्रान

घरी परतला. बहुतेक सर्व मित्रमंडळींना आमंत्रण देऊन झाले होते. आता फक्त गावात आमंत्रण द्यायचं बाकी होतं. बेटा थक गये हो चाय बनाती असं म्हणत अम्मी किचनमध्ये गेली. तेवढ्यात पीठाने माखलेल्या अवतारात अब्बाना पाहून इम्रान वैतागला. अब्बा कितनी बार कहा है आराम करो. मदत के लिये नोकर रखा फिर भी आप क्यू मेहनत करते हो.. बेटा सही कहा इम्रानच्या सुरात सूर मिसळून आत मधून अम्मी चहाचा कप घेऊन आली. अब्बाना पाठीचं दुखणं होतं म्हणून इम्रानने महिनाभरापूर्वी जवळच्या वाडीतला बाबूला कामाला ठेवला होता. गिरणीतील साफ-सफाई



तसेच अम्मीला कामात मदत करणार बाबू महिनाभरातच रूळला होता.

काम आटपून बाबू दारात हजर झाला. शेठ घरी जातो काय काम असेल तर सांगा. बाबू चाय पिऊन जा असे इम्रानने सांगताच आज्ञाधारक बाबू दारातच गुडघ्यावर बसला. रात्रीचे जेवण आटपले होते. इम्रान टीव्ही पाहत बसला होता तर अब्बू केव्हाच झोपी गेले होते. अम्मी माग पडवीत भांडी घासत बसली होती. भांडी घासून उरकली तशी अम्मीनी आवाज देताच इम्रान उठला दोघांनी भांडी आतमध्ये आणून ठेवली. टीव्ही बंद करून झोपायला गेला. अम्मी मात्र फळीवर भांडी लावण्यात गुंतलेली. रात्रीचे साडेअकरा वाजत आलेले. उद्यापासून नातेवाईक, पाहुणेमंडळीचा राबता सुरू होणार त्यामुळे दिवस कसा जाणार हे कळणार सुद्धा नाही असा विचार करत दमलेली अम्मीनी सुद्धा अंग टाकले.

सकाळी सात वाजता शेजारची शबाना दळणाचा डबा घेऊन आली. चक्कीचा दरवाजा अद्याप बंद पाहून तिला आश्चर्य वाटले. नेहमी सातच्या आधी चक्कीचा पट्टा सुरू होतो पण आज गिरण बंद पाहून जवळच असलेल्या इम्रानच्या घराकडे तिची पावले वळली. घराचा दरवाजा बंद होता. पाच मिनिट आवाज देऊन सुद्धा कोणीच दरवाजा उघडायला आला नाही. तशी शंकेची पाल शबानाच्या मनात चुकचुकली. दळणाचा डबा हातात घेऊन ती



पाठीमागच्या दरवाजात गेली. मागचा दरवाजा अर्धवट उघड्या अवस्थेत होता. दरवाजाची अर्धवट फळी ढकलताच शबानाच्या हातातील दळणाचा डबा जमिनीवर पडला आणि तिच्या तोंडातून जोरात किंचाळी बाहेर पडली. सकाळच्या शांततेत शबानाची किंकाळी ऐकून शेजारीपाजारी धावले. समोरचे दृश्य पाहून गावकरी सुद्धा गडबडले. रक्ताच्या थारोळयात पडलेला इम्रान त्याची अम्मी आणि अब्बूना पाहून धक्काच बसला. अल्ताफ पढे सरसावला. इम्रानचा श्वास सुरू होता तर अम्मी आणि अब्बूच्या डोक्यात जबरदस्त मार लागल्यामुळे दोघांचा मृत्यू झाला होता. घरातले कपाट अस्ताव्यस्त होत. एव्हाना संपूर्ण पंचक्रोशीत इम्रानच्या

घरावर दरोडा पडल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली. संपूर्ण गावच इम्रानच्या घराभोवती जमा झाल होत. अल्ताफने इम्रानला तातडीने हॉस्पिटला हलविले. तेवढ्यात पोलिसांची जीप गावात शिरली. कधी कोणाच्या अध्यात ना मध्यात कुटुंबावर आलेली वेळ पाहून जमाव संतप्त होता. पोलिसांना पाहताच जमाव आणखी प्रक्षुब्ध झाला. परिस्थिती गंभीर होती. जमावाला आवरणे कठीण जात होते. पोलीस अधिकारी सुजाता पाटील जातीने घटनास्थळी आल्या होत्या. दरोडेखोरांनी अत्यंत निर्दयीपणे दोन खून केले होते. घरातील दागदागिने आणि रक्कम लांबविल्याचे सुरुवातीच्या तपासातून समोर येत होते. लग्नकार्य आहे त्यामुळे



घरात दागिने रक्कम आहे याची माहिती मिळवून दरोडा टाकण्यात आलाय देशमुख ? अशी शंका पाटील मॅडम यांनी व्यक्त करताच मला सुद्धा तसेच वाटते मॅडम अस बोलत इन्स्पेक्टर देशमुखने मॅडमच्या बोलण्याला दुजोरा दिला. काम माहितीगाराच दिसतय असा विचार सुजाता पाटील यांच्या मनात आला परंतु भडकलेला जमाव पाहून सावध तपास करावा लागणार होता. जमावातील सुलेमान मामुची पोलिसात नेहमी ऊठबस होती. त्यामुळे इन्स्पेक्टर देशमुखनी मामूला बाजूला घेत माहिती घेण्यास सुरुवात केली. साहेब पुढच्या हप्त्यात इम्रानच लग्न होत. तीनही माणसं स्वभावाने गरीब होती. तीन माणसा व्यतिरिक्त आणखी कोणाची जास्त ये-जा असायची का? देशमुख साहेबांनी विचारला. साहेब गिरण असल्यामुळे कितीतरी जणांची ये-जा असायची. माहिती मामुनी पुरवली. नंतर काहीतरी आठवल्यासारखं करून मामूने साहेब महिनाभरापासून एक गडी ठेवला होता कामाला. जवळच्या वाडीतला बाबू सकाळपासून दिसत नाही. एवढा भयंकर प्रकार घडून बाबूचा पत्ता नव्हता. देशमुख साहेबांना सुद्धा ही बाब खटकली. सुजाता मॅडमच्या कानावर देशमुखानी मिळालेली माहिती घातली. बाबूचा शोध घ्या पण जमावाला कुणकुण लागू देऊ अशा सूचना सुजाता मॅडमनी देशमुख ला दिल्या. अर्ध्या तासांनी डॉग स्कॉड घटनास्थळी आले. दरोडेखोरांनी मागच्या



दरवाजाचा वापर केला होता. डॉबरमॅन जातीचा कुत्रा घरभर फिरला आणि थेट वाडीकडे निघाले. त्याबरोबर सुलेमान मामुनी व्यक्त केलेली शंका खरी ठरते असं पाटील मॅडम आणि देशमुखांना वाटू लागल. बाबूच्या झोपडीकडे पाहून भूकंणाऱ्या डॉबरमॅन ला पाहून एव्हाना दरोडा आणि खुनात बाबूचा सहभाग आहे हे गावकऱ्यांना समजल. जिता सोडायचा नाही बाबुला भेटला तरी आमच्या हवाली करा जमाव बेकाबू झाला होता. बाबूच्या झोपडीत कोण नव्हतं. पण जमाव ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. बिकट प्रसंगी ओढवलेला. आम्ही बाबूला पकडू तुम्ही सहकार्य करा अशी विनंती पाटील मॅडम जमावाला करत होत्या. वाडीच्या मागच्या जंगलातील ओढ्यापर्यंत जाऊन डॉबरमॅन घुटमळू लागला. याचा अर्थ बाबू जंगलात लपून बसला असेल असा अंदाज इन्स्पेक्टर देशमुखनी व्यक्त केला. दहा-बारा पोलीस आणि शंभर दीडशेचा जमाव जंगलाच्या दिशेने निघाला. वाटेत दागिन्याची रिकामी पेटी पडलेली दिसतात बाबू नक्कीच जंगलात बसलाय याची खात्री पोलिसांना पटू लागली. पोलीस आपल्यापर्यंत पोहोचणार नाहीत या भ्रमात असलेल्या बाबुला दूरवरून येणाऱ्या जमाव आणि पोलिसांचा फौजफाटा पाहून दरदरून घाम फुटला. त्याही परिस्थितीत असेल नसेल तेवढी ताकद एकवटून बाबू पळू लागला. जेमतेम अर्धा किलोमीटर पळल्यानंतर



धाप लागलेल्या बाबू जमिनीवर कोसळला. पोलिसांनी गराडा घालताच बाबूचे अवसान गळाले. संतप्त जमाव बाबुला खाऊ का गिळू अशा नजरेने पाहत होता. साहेब मी आणि माझा साथीदार दोघांनी मिळून दरोडा टाकला. इम्रानच्या लग्नाकरिता बनवलेली पाच लाखाचे दागिने मोठ्या हौसेने मला दाखविले होते. पण दागिने बघून माझी नियत फिरली. मग प्लान केला बाबू सांगत होता. रात्रीच्या वेळेस मागच्या दरवाजाने आत शिरलो. कपाट उघडताना इम्रान जागा झाला. आता बिंग फुटणार म्हटल्यावर कुऱ्हाडीचा वार घातला. त्या आवाजाने अम्मी आणि अब्बू उठली नाईलाजाने दोघांना मारावे लागले असे बाबू निर्लज्जपणे सांगू लागला. जोडीदार कुठे आहे? असा प्रश्न इन्स्पेक्टर देशमुखांनी करताच पहाटे पनवेलला गेलाय अशी माहिती बाबूनी दिली. एवढा वेळ संयम धरून असलेल्या जमाव बाबुच्या तोंडातून गुन्ह्याची कबुली बेकाबु झाला. पोलिसांना न जुमानता बाबू वर तुटून पडला. पोलिसांना जमाव आवरणे कठीण जात होते. जमावाने अक्षरशः बाबुला तुडवून काढले. काहि मिनिटातच बाबू गतप्राण झाला. विश्वासघातकी बाबूचा संतप्त जमावाने अखेर निकाल लावला होता. पोलिसांनी बाबूच्या साथीदारांना काही दिवसातच अटक केली परंतु चांगल्या कुटूंबाचे वाताहत झाली.



# छकुली

*पशूला देखील लाजवेल अस कृत्य वासनेतून घडल होत. अंगावर काटा आणणारा प्रकारामुळे पोलीसांवर देखील आरोपीला पकडण्याचे आव्हान होते.*

धनराजने टॅक्ट्रर वस्तीबाहेर मोकळ्या जागेत ऊभा केला. स्टेअंरीग जवळ असलेली पिशवी अलगद उचलली. पिशवीत त्याच्या लाडक्या छकुलीसाठी बांगड्या आणि खाऊ होता. उद्या छकुलीचा पाचवा वाढदिवस. त्यामुळे तिला आवडणाऱ्या रंगीबेरंगी बांगड्या धनराज घेवून आला होता. नेहमी टॅक्ट्रर येण्याच्या अगोदरच येवून बाबाची वाट पाहणारी छकुली आज न आल्यामुळे धनराजला देखील आश्चर्य वाटले. खेळणाऱ्या मुलांमध्ये नजर टाकून कुठे छकुली दिसते का? पहात धनराज झोपडच्या दिशेने चालू लागला. छकुलीची आई आशा जेवण बनविण्यात मग्न होती. धनराज दमून आल्यावर त्याला लगेच जेवण तयार लागायच. छकुली झोपडीत पण नव्हती. कुकर गॅसवर ठेवणाऱ्या छकुलीच्या आईला धनराजने हातामध्ये असलेली पिशवीतून बांगड्या काढून दाखवत खुणेने छकुली कूठाय अस विचारल. आशा जन्मतःच मुकी आणि बहिरी होती. दिसायला



सुंदर. गरिबीची फाटकी वस्त्र अंगावर असली तर नजर खिळून राहिल अस सौंदर्य होत आशाच. धनराजच्या नात्यामध्ये होती. धनराजने देखील आशाच रूप पाहून व्यंगाकडे दुर्लक्ष केल होत. छकुली बाहेर खेळत असेल अस खुणेनेच आशानी धनराजला सांगितल. पण छकुली बाहेरपण दिसली नाही धनराजने खुणेने आशाला सांगितल. चहा देते निवांत बसा येईल छकुली असा आशाचा इशारा धनराजला समजला आणि तो चटईवर बसला.

एव्हाना अंधार पडायला लागला. रात्रीचे आठ वाजत होते. आता मात्र धीर सुटलेल्या धनराज आणि आशाने आख्खी वस्ती पायाखाली घातली पण छकुलीचा काहि पत्ता नव्हता. वस्तीत अठरापगड जातीचे आणि परराज्यातून आलेली कुटूंब होती. छकुली सर्वांचीच आवडती. शेजारीपाजारी देखील छकुलीच्या झोपडीसमोर जमली. पुलिस थाना में कंप्लेट देना पडेगा. पुलिस की मददसे ढूंढने में आसानी होगी शेजारी राहणारा पांडेने सल्ला दिला. धनराजला देखील पटला. छकुलीचा फोटो घ्या सोबत कूणीतरी गर्दितून सूचना केली.

धनराजनी दिलेल्या माहितीप्रमाणे अंमलदार सावंतने तक्रार नोंदवून घेतली. छकुलीचा फोटो ठेवून घेतला. आम्ही लगेच सर्वत्र हा फोटो पाठवतो. काहिना काहि तरी तपास लागेल. तुम्ही घरी जा माहिती मिळाली कि फोन करू असे आश्वासन सावंतने दिला. परंतु



धनराजचा पाय पोलीस ठाण्यातून निघत नव्हता. साहेब कायपण करा माझ्या छकुलीला शोधा उद्या तिचा वाढदिवस आहे असे सांगताना धनराजला रडू कोसळल. सावंतने समजूत काढत धनराजला घरी जाण्यास सांगितल.

आशा आणि धनराजने रात्र जागून काढली. कुठे गेली असेल छकुली. अनेक वाईट विचार एकाच वेळी धनराजच्या मनात येवून गेले. मनाची समजूत काढत छकुली सापडल अस स्वतःलाच समजावत होता. त्याचवेळी

वस्ती बाहेर मात्र हल्लकोळ उडाला होता. धनराजच्या टॅक्ट्रजवळ कुत्र्यानी आणूण टाकलेल मुंडके पाहून एकच गोंधळ उडाला होता. सलीम पटेल यांनी पोलीस ठाण्यात फोन केल्यानंतर इन्स्पेक्टर विजय जगताप आणि स्टाफ घटनास्थळी पोहचला होता. साहब कुत्ते के मुह मे था मुझे लगा मुर्गी रहेगा लेकिन बाल देखा तो... असे म्हणत सलीम बोलताना थांबला. प्रकार गंभीर होता. शीर आहे म्हणजे धड सुद्धा मिळायल हव सावंत अजून स्टाफ बोलावून घ्या परिसरात शोध घ्या असे आदेश इन्स्पेक्टर जगताप यांनी दिले. संपूर्ण वस्तीत कुणाच तरी मुंडके सापडलय ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. शेकडोचा जमाव जमा झाला. आशाला न सांगताच धनराज देखील जमावात होता. पोलीसानी छिन्नविछिन्न मुंडके ताब्यात घेतल होत. गर्दित नरबळीची चर्चा रंगली होती.



तेवढ्यात वस्ती पलीकडे असलेल्या रानातून तरूण धावत आला. दरदरून घाम फूटलेला. साहब उधर किसी कि बॉडी है.. मुंडी नहि असे तरूणानी सांगितले. जगताप सावध झाले त्यानी वस्तीतील मोजकी लोक आणि स्टाफ सोबत घेत तरूण दाखवत असलेल्या दिशेनी चालायला सुरवात केली. साहब मेरा नाम प्रसाद पांडे है. मै शौच के लिए गया था तभी बॉडी देखा. अतिशय क्रूर पद्धतीने फक्त धड असलेल प्रेत पडलेलं दृश्य अंगावर काटा आणणार होत. इन्स्पेक्टर जगतापनी जवळ जावून पाहिल. अंदाजे पाच ते सहा वर्षाच्या मुलीचा मृतदेह होता. भयानक पद्धतीने मारण्यात आल होत. सावंत पंचनामा करा आणि लवकर बॉडी पोस्टमार्टेम करिता जावू दे इन्स्पेक्टर जगताप जलद हालचाली करित होत.

प्रकरणाचे गांभीर्य वाढत होते. एव्हाना चॅनेलवर ब्रेकींगच्या नावाखाली बातमी झळकली होती. रात्री दाखल केलेल्या मिसिंगची सावंतला आठवण झाली. साहेब कालच या वस्तीमधून पाच वर्षाची मुलगी मिसिंग झाल्याची तक्रार दाखल आहे अशी माहिती सावंतने साहेबाना दिली. तिच्या आईवडिलाना बोलावून घ्या बॉडीची ओळख पटतेय का पहा. कुत्र्यानी लचके तोडलेल मुंडके ओळखू न येण्या पलीकडे. त्यातच अंगावर देखील जागोजागी खुणा होत्या. मात्र अंगावरच कफन काढताच धनराज कोसळला. त्याची छकुली होती. धनराजने मोठा हंबरडा फोडत



साहेब माझी छकुली आहे तिचा वाढदिवस आहे सांगताच सर्वांना अश्रू अनावर झाले. धनराजने आशाला सोबत आणले नव्हते. जगताप साहेबानी धनराजच्या खांद्यावर हात ठेवत धीर दिला. जो कोणी असेल त्याला शोधून काढू. पोलीस खात्यात अनेक गुंतागुंतीच्या केस हाताळलेल्या जगतापाना अवघड अस काहि नव्हत. परंतु नरबळीची चर्चा सुरू झाल्याने तपासाला वेग देण गरजेच आहे ओळखून वरिष्ठाना फोन करून  डॉग स्क्वाड पाठविण्याची विनंती केली.

वस्ती हादरून गेली होती. लाडकी छकुलीला कोणी तरी क्रूर पद्धतीने मारलय ही बातमी आशा पर्यंत पोहचली होती. डोळयातील अश्रू शिवाय ती दुःख व्यक्त करू शकत नव्हती. डॉग स्क्वाड मदतीला पोहचले होते. ज्याठिकाणी धड होत त्या भागात जॅकी  डॉग बराच वेळ घुटमळला. गर्दिच्या दिशेने भुंकत होता. प्रत्यक्षदर्शी सलीम आणि प्रसाद यांचेकडून माहिती घेण्याच काम सुरू होत. सलीमने सकाळी सांगितलेली माहिती तंतोतत तशीच होती. परंतु प्रसादच्या जबानीत फरक पडत होता. इन्स्पेक्टर जगतापानी हेरल. प्रसादची खबऱ्याकडून माहिती घ्या अशा सूचना जगताप साहेबानी सोबतच्या स्टाफला दिल्या. प्रसाद खुन्या पर्यंत नेवू शकतो अशी पुसटशी कल्पना इन्स्पेक्टर जगताप यांना वाटत होती. त्यानी प्रसादला सोबत घेत वस्ती गाठली. धनराजच्या



झोपडी बाहेर प्रचंड गर्दि जमली होती. आशा जवळ साध्या वेशातली महिला पोलीस हेमा राणे होती. काहितरी माहिती मिळेल म्हणून हेमाला साहेबानी साध्या वेशात ठेवली होती. छकुलीला शेवटची कधी पाहिली हे देखील आशाकडून काढून घेण अवघड होत. धनराज देखील माहिती देण्याच्या मनस्थितीत नव्हता. पोलीस आलेले पाहून झोपडी बाहेरिल गर्दि पांगली. पोलीसांसोबत असलेला प्रसादला पाहून आशाच्या चेहऱ्यावरिल भाव बदलले तिने कडकडा बोट मोडली. आशाचे बदलले भाव आणि हालचाल इन्स्पेक्टर जगताप यांनी क्षणात टिपली. पाणी कुठतरी मुरतय हे ओळखायला जगताप याना वेळ लागला नाही. प्रसादबद्दल खबऱ्याकडून माहिती आली होती. गांजाच व्यसन अद्याप लग्न न झालेला प्रसाद वस्तीत बदनामच होता. आशाकडून माहिती घेण गरजेच होत.. पण कस शक्य आहे जगतपानी अमंलदार सावंत कडे विचार बोलून दाखविला. साहेब मूकबधिर संस्थेशी संबधित कोणाला तरी बोलावू या. सावंतचा सल्ला जगतापना पटला. तासाभरात मूकबधीर शाळेतील शिक्षिका किर्ती पाटील पोहचल्या. हेमा त्यांना घेवून आशा जवळ बसली. सुरवातीच्या खाणाखुणातून काहि विशेष हाती लागल नाही. अखेर मुद्‌्याचा प्रश्नाला किर्ती पाटील यांनी हात घातला. प्रसाद बद्दल राग का? त्याची नजर वाईट आहे. धनराज घरी नसला कि सारखा येवून शरिरसुखासाठी मागणी



करतोय अशी धक्कादायक माहिती आशाकडून मिळाली. माहिती महत्वाची होती. हेमानी तात्काळ इन्स्पेक्टर जगतापना कळवली. प्रसाद जगताप साहेबांसोबत होता. सावंत याला पोलीस ठाण्यात घेवून चला जगताप साहेबानी आदेश दिले. साहब मै क्यू मारूंगा ? मेरी क्या दुश्मनी प्रसाद तोंड उघडायला तयार नव्हता. गांजाचे व्यसन असलेला प्रसाद लवकर तोंड उघडणार नाही यांची खात्री होती. चौदाव रत्न दाखवून पण फायदा नाही हे जगताप साहेबांनी ओळखल.

सावंत हा आपला गुन्हेगार नाहि याला वस्तीतील लोकांच्या ताब्यात देवू या तेच फैसला करतील जगताप यांनी खडा टाकून पाहिला. तसा प्रसाद गडबडला. साहब ऐसा मत करो सब सच बताता हू. आशा मुझे बहोत पसंद है. लेकिन मुझे भाव ही नहि देती. बहोत ट्राय किया आखिर उसको सबक सिखाने के लिए उसकि लडकी को मारने का प्लान किया. प्रसाद सांगत होता. उस दिन छकुली को चॉकलेट के बहाने पास के जंगल मे लेकर गया और गला काट दिया. निर्विकारपणे प्रसाद सांगत होता. वासनेपोटी निष्पाप पोरीचा जीव घेणाऱ्या क्रूरकर्मा प्रसादला अवघ्या चोवीस तासातच जगतापानी अटक केली होती.



# खदखद

*खालापूर तालुक्यात घडलेली सत्यकथा असून पात्रांची नावे बदलण्यात आलेली आहे.*

कांचन बॉक्स मधली फळ बाहेर काढून ठेव. शेठच्या फार्महाऊसवर झाडाना पाणी देवून तासाभरात येतो असे म्हणत रघुनाथ शर्टाची बटणे लावतच घराबाहेर पडला. अहो चहा तर घेवून जा. असे म्हणत कांचन हातात चहाचा कप घेवून ओसरीवर आली परंतु तो पर्यंत रघुनाथ पुढे निघून गेला. रघुनाथची धावपळ कांचन पाहत होती. वर्षभरापूर्वी रघुनाथची कंपनी बंद पडलेली. दोन मुलांचे कॉलेजच शिक्षण यामुळे रघुनाथ आणखी खचला. त्यातच पाठीच्या आजारपणाने डोक वर काढल. ऑपरेशनसाठी होत नव्हता तेवढा दागिना कांचनने विकून ऑपरेशन केल. आजारपणातून सावरताच मेहनती रघुनाथने फळ विक्रीचा व्यवसाय सुरू केला. परंतु घरखर्च चालवताना नाकीनऊ येत असल्यामुळे मित्राच्या ओळखीने गावाबाहेर फार्म हाऊसवर



सकाळी माळी काम नंतर दिवसभर फळांची गाडी लावायची असा दिनक्रम रघुनाथचा सुरू होता.

मार.. दिया.. चाकू से मार दिया अशी ओरडत एक बाई कडेवर मुल घेवून गावात आली. तशी सलून मध्ये दाढी करायला बसलेला सुनिल पटकन उठला. सुनिल पाठोपाठ दुकानात बसलेली चारपाच पोर देखील बाहेर आली. काय प्रकार आहे समजेना. अजून ती बाई मार दिया... खून.. असे ओरडत होती. तो पर्यंत गावातील आणखी मंडळी जमली. गावचा पोलीस पाटील देखील होता. त्याने बाईला ओळखली. अरे ही धनराज शेठच्या फार्म हाऊसवर असते गंगा असे पाटील बोलले. तो पर्यंत सुनिलने तिला ग्लासत पाणी आणून दिले. बाई काय झालय सांग. परंतु भेदरलेल्या गंगा केवळ फार्म हाऊसकडे हात दाखवून खून... खून एवढेच ओरडत होती. तसे सर्वजण फार्महाऊसकडे निघाले. फार्महाऊसमधील शेठच्या बंगल्याच्या मागे गंगाने हाताने इशारा केला तसेच सर्व बंगल्याच्या मागे आले. रघुनाथ रक्ताच्या थारोळयात पडलेला. पोलीस पाटील आणि सुनिल धावतच पुढे गेले. रघुनाथच्या छातीवर वार करण्यात आला होता. जिव्हारी वार लागल्यामुळे रघुनाथ जागीच ठार झाला होता. रघुनाथवर कोणीतरी चाकूचा हल्ला झालाय आणि त्यात तो ठार झाला ही बातमी संपूर्ण



गावात पसरली. पोलीस पाटलाने तात्काळ ही घटना फोन करून इन्स्पेक्टर विजय जगताप यांना कळविली.

आख्ख गाव फार्म हाऊसवर जमा झाल. साधा सरळमार्गी रघुनाथला कोण मारल ? याचीच चर्चा जो तो करू लागला. अर्ध्या तासातच इन्स्पेक्टर विजय जगताप पोलीस पथकासह घटनास्थळी पोहचले. पोलीस जिप पुढे जायला वाट नव्हती एवढी तोबा गर्दि झाली होती. इन्स्पेक्टर जगताप जिप मधून खाली उतरताच रघुनाथचे नातेवाईक आक्रोश करित आले. साहेब कोणाच्या अध्यात ना मध्यात माझ्या काकाला कोणी मारल त्याला शोधा असा टाहो राकेशने फोडला. पोलीस पाटील आणि गावकऱ्यानी राकेशला समजूत काढीत बाजूला नेल. इन्स्पेक्टर जगताप रघुनाथच्या बॉडी जवळ आले. मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला होता. शेवते पंचनामा करा आणि हत्यार कुठे सापडतय का पहा अशा सूचना जगताप यानी दिल्या. पाटील त्या घटना पाहणाऱ्या बाईला बोलवा असा आदेश जगताप यानी दिले. गंगा पोराला घेवून आली. गंगा अजूनहि घाबरलेली होती. साहेबानी गंगाला न्याहळले. जेमतेम वीस वर्ष वयाची गंगा दिसायला बऱ्यापैकी होती. गंगा काय प्रकार घडला ते साहेबांना सांग पोलीस पाटलानी गंगाला सांगितले. साहब मेरा मर्द काम पे जाने के बाद दस मिनिट मे यह हादसा हुआ. बच्चे के गिले कपडे सुखाने के लिए मै खोली



से बाहर आयी. देखा तो एक रघुनाथजी पौधौ में पानी डालने के लिए पाईप का जुगाड कर रहे थे. उसी टाईम फार्म मे पीछे के रास्ते एक लडका मोटरसाईकल लेके आया. मोटरसाईकलसे उतरते ही उसने रघुनाथजीको पीटना शुरू किया. लडकेने रघुनाथजीका सिर जोर से दिवार पटक दिया. मै मदत के लिए दौडी तो उसने झटसे चाकू निकाला. तुम हमारे बीच मे मत आना नहि तो तुझे भी मार दूंगा ऐसी धमकी उसने दि तो मै डर गयी. एवढ सांगताना गंगाला चांगलीच धाप लागली. जगताप साहेबानी पाण्याचा ग्लास तिच्या पुढे धरला. एका घोटात सर्व पाणी गंगाच्या घशाखाली गेल. आगे बताओ जगताप साहेबानी गंगाला हातानी इशारा केला. साहब लडका मजबूत था. उसके साथ रघुनाथजी मुकाबला भी नहि कर पाए. लडके ने चाकू रघुनाथजीके छाती में घुसेड दिया. खून देखकर मै डर के मारे बच्चे के लेकर गाव में भाग आयी. गंगानी खुन्याला प्रत्यक्ष पाहिलं होत. त्यामुळे तपासातील मुख्य अडचण दूर होणार होती. जगताप साहेबानी म्हात्रे हवालदाराला तातडीने रेखाचित्र काढणाऱ्याला बोलावून घेण्याचे आदेश दिले.

कामावर गेलेला गंगाचा नवरा श्याम घटना कळल्यावर तो आला. श्यामचा अवतार पाहून तो मवाली वाटत होता. फार्महाऊसवर गंगा एकटी. कधी रघुनाथने छेड काढली असेल आणि त्यातून श्यामनी काटा काढला नसेल अशी शंकेची पाल



जगताप साहेबांच्या मनात चुकचुकली. त्यांनी पोलीस पाटलाला बाजूला घेत रघुनाथच चारिञ्य कसे होते अशी विचारणा केली. साहेब रघुनाथ एकदम देव माणूस.. कोणाच्या भानगडीत नसायचा अशी माहिती मिळाली. त्यामुळे प्राप्रटीचा वाद आहे का अशी चौकशी केली तेव्हा तसा प्रकार देखील नव्हता. त्यामुळे खुनाचे नेमके कारण काय असेल ? जगताप साहेब मनातल्या मनात शक्यता पडताळून पाहत होते.

साहेब गंगानी सांगितल्या प्रमाणे रेखाचित्र तयार झालय असे सांगताच खुर्चीत विचारमग्न इन्स्पेक्टर जगतापांची तंद्री भंगली. पोलीस पाटलाना रेखाचित्र दाखविले. पाटलांच्या चेहऱ्यावरचा हावभाव बदलले. पोलीस खात्यात उडत्या पक्षाची पिसे मोजणारी नजरेने जगताप साहेबानी बदलेले भाव टिपले. पाटील काय झाल... ओळख पटतेय का? तसे सावरत साहेब चेहरा थोडाफार गौरव सारखा दिसतोय. कोण गौरव? जगतापानी प्रश्न केला. साहेब गावातला आहे. रघुनाथच्या दोन घर पुढ राहतो. मुंबईला सरकारी नोकरीत असतो. कालच सुट्टीचा आला होता. म्हात्रे दोन कर्मचारी घ्या तात्काळ गावात परिसरात शोध घ्या हायवेला नाकाबंदी करा अशी ऑर्डर जगताप साहेबानी दिली. पाटील गौरव कशाला मारेल रघुनाथला असा तिरकस प्रश्न जगतापानी केला. साहेब कळत नाही.. चांगला शिकलेला पोरगा,चांगली नोकरी आहे. गौरवचा



शोध घेतोय कुठे वाच्यता नको अशी तंबी पोलीस पाटलाना देखील देण्यात आली.

खुन होवून जवळपास दहा दिवस उलटून गेले. गौरव फरार होता. मोबाईल देखील बंदच होता. गावात देखील आता चर्चा रंगत लागली होती. पोलीस साध्या वेषात गावात,परिसरात फिरून खबऱ्यांकडून मिळेल तशी माहिती गोळा करित होते. एके रात्री अचानक जगताप साहेबांना म्हात्रेनी माहिती दिली. साहेब गौरवचा मोबाईल थोड्या वेळाकरिता सुरू झाला होता. लोकेशन सांगलीचे दाखवत होता. गौरवच्या आईला चौकशीला बोलवा. सांगलीत कोण नातेवाईक आहेत का चौकशी करा आणि ताबडतोब निघा अशा सूचना जगताना साहेबानी दिल्या. गौरवची मावशी सांगलीला असते अशी माहिती मिळाली होती. त्या आधारे पोलीस पथक रात्रभर प्रवास करून उजाडण्यापूर्वी सांगलीत पोहचले. सांगली कुंभारवाड्यात मिळालेल्या माहितीप्रमाणे दरवाजा पोलीसानी ठोठावला. एका मध्यमवयीन बाईंनी दरवाजा उघडला. गौरवची मावशी असावी असा तर्क बांधत म्हात्रेनी मावशी गौरव कुठाय? असा प्रश्न केला. आत झोपलात.. पण तुम्ही कोण. साध्या वेशातील पोलिसांना मावशींने ओळखलं नाही. म्हात्रेनी आम्ही पोलीस आहोत गौरवला चौकशीसाठी न्यायला आलोत सांगत घरात प्रवेश केला. डारडूर झोपलेल्या गौरवच्या



अंगावरची चादर पोलीसानी ओढताच गौरवने कुशी बदलत झोपण्याचा प्रयत्न केला. पोलीस आहोत तुला न्यायला आलोत असे म्हात्रेनी सांगताच गौरवची झोप खाडकन उडाली.

जगताप साहेबांच्या समोर गौरव खाली मान घालून बसला होता. गंगाला लांबून गौरवचा चेहरा दाखविण्यात आला. तिने देखील खून करणारा हाच होता याची पुष्टी दिली. का मारलस साध्या सरळ माणसाला.. जगताप साहेबानी प्रश्न केला परंतु गौरवच्या तोंडातून काहिच शब्द बाहेर पडेना. बराच वेळ झाला तरी गौरव तोंड उघडेना म्हणून शेवटी म्हात्रे याला थर्ड डिग्री दाखवा असे जगताप यानी सांगताच गौरव धायमोकलून रडू लागला. रडून शांत झालेला गौरव सर्व सांगेल याची जगताप साहेबाना खात्री होती. कसला साधा सरळ माणूस एक नंबरचा लुच्चा होता. माझ्या आई बरोबर त्याचे अनैतिक संबंध होते. मी लहान असल्यापासून गावातील टारगट पोर रघुनाथचा पोऱ्या म्हणून चिडवायचे. मला कळत नव्हत. पण वयात आल्यावर यांची थेर कळायला लागली. मी मुंबईला असलो कि हा रघुनाथ आमच्या घरी येतो असे समजल्यावर माझ डोक सणकल. काहि करून याला धडा शिकवायचा असा निश्चय केला आणि साहेब विषय संपवला असे सांगताना गौरवला पुन्हा हुंदका फुटला. अरे पण तुझं आयुष्य देखील संपवला ना कायद्यापुढे तू आता गुन्हेगार



आहेस आता आयुष्य कोठडत काढाव लागणार. पण जगताप साहेबांच्या बोलण्याकडे लक्ष नसलेला गौरव एवढ्या वर्षाची खदखद बाहेर पडल्याने शांत दिसत होता.



# भंगार

रमेशने सायकलला पिशवी अडकवली आणि सायकलवर टांग टाकतानाच हातातल्या घड्याळाकडे नजर टाकली. सात वाजून पंधरा मिनिट झाली होती. सातची ड्यूटी, जोडीदार आकेश वैतागणार. पंधरा मिनिट ऊशीर झाल्यामुळे रमेशने पॅडल वेगाने मारायला सुरवात केली. कंपनीच्या गेटवर पोहचला. गेटचा छोटा दरवाजा उघडून सायकल आत घेतली. कंपनी वर्षभरापासून बंद होती. रमेश आणि आकेश दोघांची वॉचमन म्हणून ड्यूटी होती. कंपनीचा मालक बंद झाल्यापासून फिरकला नव्हता मात्र मॅनेजर शिंदे महिन्यातून एकदा फेरी मारायचा. रमेश वॉचमन केबिन पर्यंत पोहचला तरी आकेशचा पत्ता नव्हता. केबिनचा दरवाजा ढकलतात डारडूर झोपलेला आकेशला पाहून रमेशने कपाळावर हात मारत अजून झोपा काढतोयस तुला ऊशीर झाला असेल म्हणून जीव काढत आलो. तसा अंग मोडतच आकेश उठला. अरे रात्री जरा जास्ती झाली म्हणून झोप लागली अस म्हणत आकेशने बिछाना उचलला.



आकेश निघून गेल्यावर रमेशने नेहमीप्रमाणे कंपनीतून फेरफटका मारायला सुरवात केली. कंपनीचे आवार छोटे असल्याने पंधरा वीस मिनिटात कंपनीत राऊंड व्हायचा. कंपनीच्या ऑफिस जवळून जाताना रमेश थांबला. ऑफिसच लॉक तुटून खाली पडलेल आणि दरवाजा उघड होता. मॅनेजर शिंदे आले का फक्त दरवाजा उघडायचे. हा काय प्रकार आहे असे स्वतःशी पुटपुटत रमेश दरवाज्याजवळ पोहचला. दरवाजा कडी बेंड झालेली लॉक तुटलेल पाहताच रमेशच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. चोरट्यानी डाव साधला होता. रमेशने खिशातून मोबाईल काढून मॅनेजर शिंदेना फोन लावला. घडलेला प्रकार सांगितल्यावर कोणत्याहि वस्तुला हात लावू नका मी पोलीसाना घेवून येतो सांगत फोन ठेवला. रमेशने आकेशला फोन करून कंपनीत चोरी झाल्याचे सांगताच आकेशची रात्रीची होती नव्हती तेवढी उतरली. बायकोने आणलेला चहा देखील तसाच टाकून आकेश कंपनीकडे निघाला.

फौजदार संतोष भासे आणि दोन कर्मचारी कंपनीत पोहचले. सोबत मॅनेजर शिंदे आणि मागे मागे वॉचमन रमेश आणि आकेश होते. रात्री कोण होत ड्यूटीवर? फौजदारांच्या प्रश्नानी आकेश गडबडला. साहेब मी होतो अस म्हणत आकेश पूढे आला. साहेब पहाटे डास जास्त चावायला लागले म्हणून केबिन मध्ये आलो आकेश बोलला. फौजदारानी आकेश कडे नजर टाकली. त्याचे



तारवटलेले डोळे पाहून फौजदार भासे समजून गेले. ऑफिसच दार उघडन सर्वजण आत आले. शिंदेच्या केबिनलगत असलेला स्टोअरचा दरवाजा उघडा होता. स्टोअर मधील लाखो रूपये किंमतीची टूल आणि डाय जागेवर नव्हती. साहेब महत्वाच्या वस्तुच चोरीला गेल्यात शिंदे बोलले. सोबत असलेल्या पोलीस कर्मचारी कांबळेनी पंचनामा करून शिंदे आणि दोन्ही वॉचमनचे जबाब घेतले.

जिप पोलीस ठाण्याकडे निघाली होती. फौजदार भासेंचा संशय आकेशवर होता. पण आकेश एकटा एवढ्या वस्तु नेईल याची शक्यता नव्हती. साहेब बंद कंपनीत लहानसहान चोऱ्या करणारी काहि स्थानिक पोर आहेत त्यांच्या मागावर राहिला पाहिजे कांबळे माहिती दिली. कांबळे तुम्ही खबरे कामाला लावा. तस असेल तर लाखो रूपयांचा माल शेवटी भंगारात जाणार. चार दिवस उलटून गेले तरी काहिच थांगपत्ता लागत नव्हता. कांबळेनी सगळीकड खबरे पेरले होते. एक दिवस कांबळेचा मोबाईल वाजला. पलीकडून बिअर शॉपीचा मालक निलेश बोलत होता. साहेब तीन दिवस झाले चंदू रोज बिअर घेवून जातोय. पाचशेची नोट असते प्रत्येक वेळी. कांबळेकरिता माहिती महत्वाची होती. चंदू चोरी झालेल्या कंपनीपासून जवळच्या वाडीत राहणारा. कामधंदा नसलेला बेकार तरूण. कांबळेनी फौजदाराना चंदूबद्दल



माहिती दिली. कोणालाहि संशय न येता चंदूला उचला अशा सूचना फौजदार भासेनी दिल्या.

फौजदारांच्या पुढ्यात चंदू बसलेला. कांबळेनी बिअर शॉपीवरून चंदूला उचलला होता. सायेब मी काय नाय केल. मला का पकडल. चंदू रोज पाचशेची नोट लॉटरीबिटरी लागली काय तुला? तसा चंदू चपापला. सावध होत सायेब पेटींग कामाचे पैसे मिळाले होते असे उत्तर चंदूनी दिल. कांबळे चंदूला सोडा फक्त कूठ पेटींग केली ते बघा नाहितर टायर मध्ये टाका. फौजदाराच्या वाक्यानी चंदू गडबडला. चंदू खरं बोललास तर तुला साक्षीदार बनवू फौजदारानी सापळा टाकला. पण चंदू हू का चू बोलायला तयार नाही पाहून कांबळेनी टायर आणताच चंदू घाबरला. सायेब सगळ खरं सांगतो. मी आणि वाडीतील पाच जणांनी चोरी केली आणि भंगारवाल्याला माल विकला. किती पैसे मिळाले फौजदारानी प्रश्न केला. दहा हजार रूपये अस उत्तर चंदूनी दिल. फौजदारानी कपाळावर हात मारत अरे तुम्ही चोरलेला मालाची किंमत माहित आहे क? लाखो रूपये किंमत आहे. सायेब आम्हाला काय चार दिवस दारू मटणाची सोय झाली तरी बस्स अस निर्लज्ज उत्तर चंदूनी दिल. एवढा जड माल कसा नेलात कांबळेनी चंदूला विचारताच चंदू चाचरायला लागला. तसे फौजदार भासे पुढे येताच सायेब भंगारवाल्या मामूची गाडी होती.



त्यातून माल नेला. कांबळे भंगारवाला मामू आणि चंदूच्या दोस्ताना पाहुणचारासाठी घेवून या असे आदेश दिले. खबरयाच्या चाणाक्ष नजरेने मोठ्या चोरीचा उलगडा झाला होता.



# डॉक्टर तुम्ही सुद्धा

*सोन्याचा मोह भल्याभल्यांना गुंडाळतो. खोपोलीतील ही सत्य घटना.*

सर पेशंट संपलेत,मी निघू का ? शितलच्या आवाजाने डॉक्टरांची तंद्री भंगली. समोरच्या घड्याळावर नजर टाकली तर रात्रीचे नऊ वाजत होते. तु जा घरी मी थोडा वेळ क्लिनिक मध्ये बसतो असे डॉक्टर रणजित यांनी शितलला सांगितले. शितलने निघून गेली. डॉक्टर रणजित मात्र अस्वस्थ होता. खिशातून मोबाईल काढला. पुन्हा जयदासच्या नंबरवर कॉल केला. संध्याकाळ पासून पंधरा ते वीस कॉल केले परंतु जयदासचा नंबर कव्हरेज क्षेत्राच्या बाहेर दाखवत होता. काय झाल असेल ? जयदास आणि त्याचे वडिल शांतीलाल आज तपासणी करिता येणार होते डॉक्टर पुन्हा विचारात गढून गेले. तेवढ्यात मोबाईलची रिंग वाजली. पत्नी विशाखाचा फोन होता. रणजितने फोन घेतला. किती वेळात येणार आहात. आज माझा ऊपवास आहे तुम्ही आलात कि सोडणार आहे. विशाखा आपण गेल्याशिवाय जेवणार



नाही हे रणजितला माहित होत. त्यानी निघायच ठरवल. कारला स्टार्टर मारताना देखील परत एकदा जयदासला कॉल केला. परंतु पुन्हा मोबाईल बंद.

विशाखानी जेवणाच ताट वाढून आणल. परंतु रणजितच लक्ष नव्हत. रणजित अरे कसला विचार करतोयस? जेवण वाढलय. विशाखाच्या समाधानासाठी कसेबसे दोन घास रणजितने पोटात ढकलले. नक्कीच काहितरी बिनसलय पण रणजित स्पष्ट बोलत नाही हे विशाखाने ओळखल. जेवल्यावर पुन्हा रणजित गॅलरित मोबाईल घेवून बराच वेळ ऊभा होता. विशाखाला राहवल नाही. काय झालय,काही पेशंटचा प्रॉब्लेम आहे का? रणजितने नुसती नकारार्थी मान हलवली. पण विशाखाला चैन पडत नव्हती. रणजित स्पष्ट बोलला नाहिस तर मला काहि कळणार नाही रणजितचा हात हातात घेत विशाखा बोलली. तुला दोन दिवसापूर्वी दिलेले सोन्याचे मणी आण जरा. आता एवढ्या रात्री कशाला पाहिजेत असा प्रश्न विशाखाच्या मनात आला परंतु रणजितची अवस्था पाहून ती निमूट कपाटाकडे गेली. कपाटातून बॉक्स काढत रणजित समोर धरला. रणजितने सोन्याच्या मणी परत हातात घेतले सोन्याची चमक पाहून परत बॉक्समध्ये ठेवले. बॉक्स ठेव कपाटात आणि कुठे बोलू नको याविषयी विशाखाकडे पाहत रणजित बोलला.



आठ महिन्यापूर्वी जयदास वडिलाना रणजितच्या क्लिनिकमध्ये घेवून आला होता. जयदास पस्तीशीचा तर शांतीलाल साठीकडे झुकलेले. वयोमानाने प्रकृतीच्या तक्रारी यामुळे वडिलाना घेवून जयदासच  डॉक्टर रणजितकडे येणजाण वाढल. जयदास आणि शांतीलाल यांच बोलण, राहण टापटीप. बोलण्यात लाघवीपणा यामुळे रणजितचे आणि जयदासचे घनिष्ठ संबध जुळले. आठवड्यापूर्वी जयदास आणि शांतीलाल क्लिनिकमध्ये आले तेव्हा दोघांच्या चेहऱ्यावरिल तणाव रणजितला जाणवला. रणजितने खोदून खोदून विचारल्यावर शांतिलालने गावाकडे भावबंदकित जमीनीचा सुरू असलेला अनेक वर्षाचा वाद मिटतोय पण त्यासाठी दहा लाख रूपये लागणार असल्याचे सांगितले. एवढी रक्कम तातडने कशी ऊभी करणार असा जयदास बोलला. घरात सोन भरपूर आहे पण ते गावी बांधकाम करताना गुप्तधन स्वरूपात मिळाल होत अस शांतिलाल बोलले. गुप्तधन सरकारची प्रापर्टी त्यामुळे बोभाटा झाला तर जमा कराव लागल हताश होत जयदास बोलला. डॉक्टर तुम्ही बघा ना कोणी ओळखीचा असेल तर थोड फार सोन स्वस्तःत विकता येईल. कमी भावात देवू पूर्वजांच सोन आहे अस म्हणत शांतिलालने बटव्यातून दोन सोन्याची मणी काढून  डॉक्टर रणजितच्या हातावर ठेवले. चमकाणारे टपोरे मणी पाहून रणजित



चक्रावला. डॉक्टर हव तर खात्रीच्या सोनाराला दाखवा शंभर नंबरी सोन आहे. रणजितच्या मनात विचार चमकून गेला. जर आपणच मदत केली तर जयदासच काम होईल आणि कमी किमंतीत सोन भेटल. ठिक आहे माझा मित्र आहे त्याला विचारतो असे म्हणत रणजितने मणी स्वतःकडे ठेवून घेतले. क्लिनिक बंद केल्यावर पेढीवर रणजितने पारख करायची ठरवली. डॉक्टर साहेब एकदम अस्सल आहे. दागिना बनवायचा काय वहिनीना! सोनारानी पावती दिली. नाहि सध्या नाही थोड थांबा असे म्हणत रणजितने मणी ताब्यात घेत घर गाठल.

विशाखाला सरप्राईज देवू असा विचार करित रणजितने जयदासला फोन लावला. डॉक्टर दहा तोळ सोन आहे. अर्जंट आहे कमी भावात देवू असे जयदास बोलला. अकांऊटला सहा लाख रूपये आहे. जेवढे आहे तेवढे देवू नाहितरी जयदासची अडचण आहे रणजितने विचार पक्का केला.

दुसऱ्या दिवशी क्लिनिकमध्ये शांतिलाल आणि जयदास आले. डॉक्टर देवा सारखे मदतीला आलात. असे म्हणत शांतिलालने सोन्याचे मणी ठेवलेला बॉक्स डॉक्टर रणजित समोर धरला. बॉक्स मधील सोन पाहून रणजितचे डोळे विस्फारले. जवळचे सहा लाख रूपये जयदासच्या हातात दिले. मोजून घ्या



रणजित बोलला. डॉक्टर साहेब एवढा विश्वास नाहितर मैत्री कसली असे म्हणत जयदासने सहा लाख रूपये बॅगेत ठेवले. उद्याच गावी जातो सगळा निपटारा करून येतो असे म्हणत जयदास आणि शांतिलाल गेले. तो प्रसंग पुन्हा रणजितच्या डोळयासमोर ऊभा राहिला. त्यानंतर पंधरा दिवस उलटले तरी दोघांची काहिच खबरबात नाही म्हणून रणजित सारखा जयदासच्या मोबाईलवर कॉल करण्याचा प्रयत्न करित होता. आठवड्याला न चुकता तपासणी करायला येणारे शांतिलाल अचानक बंद झाल्यामुळे रणजितला काहिच समजेना. मनात हजारो विचार घोळत होते.

रात्र कशीबशी तळमळत घालवली.

सकाळी क्लिनिकला जाताना रणजितने विशाखाला न सांगताच कपाटातून सोन्याचे मणी ठेवलेला बॉक्स काढला. पुन्हा दोन मणी नेले तर सोनाराला संशय येईल म्हणून बटव्यात मणी काढले. किती तोळ्याचा चपला हार होईल सांगता का? रणजितने बटवा सोनाराकडे दिला. एक दोन मणी घासून झाल्यावर सोनाराने डॉक्टर रणजितकडे पाहत काय वहिनीना नकली हार देता काय? संबधा मणी खोटे आहेत. बेन्टेक्स हाय. हे ऐकून रणजितच डोक गरगरायला लागला. नीट बघा परत असे म्हणत रणजित कारकडे धावत गेला. कारमधाला बॉक्स सोनारासमोर ठेवला. एक एक मणी



तपासून  डॉक्टर साहब सगळा खोटा सोना आहे अस सोनारानी सांगताच रणजितला दरदरून घाम फुटला. बॉक्स कसाबसा हातात घेत क्लिनिक गाठल. दिवसभर फोन लावून सुद्धा जयदास आणि शांतिलालचा काहि तपास नाही. त्यात दोघ कूठ राहतात हे देखील माहित नाही. आपल्याला सहा लाखाला चुना लावलाय याची रणजितला खात्री पटली. अखेर रणजितने पोलीस ठाणे गाठले. पोलीस निरिक्षक जगताप यांना रणजितने सर्व हकिगत सांगितली. कूठ राहत होते? दोघांचा एखादा फोटो जगतापानी विचारल. नाही काहिच माहिती नाहि क्लिनिकमध्ये यायचे. कुठे राहतात एवढ नव्हत विचारल. डॉक्टर रणजितच उत्तर ऐकून जगतापानी कपाळावर हात मारला. सोन्याच्या मोहापायी  डॉक्टर देखील भूलला याच जगतापाना अचंबा वाटला. खराडे डॉाॅक्टरांची तक्रार लिहून घ्या असे आदेश जगताप साहेबानी दिले.

जयदास आणि शांतिलाल नवीन सावजाच्या शोधात निघाले होते.



# काळी

*शारिरिक व्यंगवरून मारलेले टोमणे सहन करण्यापलीकडे झाले कि व्यक्ती कोणत्याही थराला जावू शकते. क्रूरतेची परिसीमा म्हणजे ही रायगड जिल्ह्यात घडलेली सत्यकथा.*

वार्ड मध्ये राऊंड मारून डॉक्टर विश्वजीत विश्रांती करता त्यांच्या रूमकडे निघाले. घड्याळाने देखील

बाराचे ठोके देत दुसरा दिवस सुरू झाल्याची वर्दी दिली होती. दिवसभर पेशंटच्या गराड्यात वेळेवर जेवण नाही त्यामुळे डॉक्टराना कधी एकदा बेडवर अंग टाकतोय असे झाले होते. मोबाईल उशीजवळ ठेवत डॉक्टर बेडवर बसले तेवढ्यात रूम मधील इंटरकॉमची रिंग वाजली. रात्री अपरात्री येणाऱ्या कॉलची सवय असल्यामुळे विश्वजीतनी फोन उचलला. सर.. इमर्जन्सी आहे. आठ वर्षाचा मुलाला आणलय. पलीकडून निशा नर्सचा आवाज होता. पायात स्लिपर चढवली आणि विश्वजीत जिने उतरून ओपीडीकडे आला. डॉक्टरसाहेब दोन तासापासून पोरग उलट्या करतय उलट्या थांबायच नाव नाही. पाणी बी थांबत नाही



पोटात मुलाच्या आईने रडत रडतच माहिती दिली. रात्री काय जेवला होता? विश्वजीतने मुलाच्या आईला विचारले. यश रात्री नाही जेवला. संध्याकाळी नातेवाईकांकडे पूजा होती तिथच आम्ही सर्व जेवलो. बाहेर नंतर काय खाल्लय का? डॉक्टरांच्या प्रश्नावर नाय काय माहित नाही अस उत्तर दिल. वेळेवर आणलत आणखी पंधरा मिनिट ऊशीर झाला असता तर माझ्याकड उपचार झाले नसते डॉक्टर विश्वजीतच बोलण ऐकून मुलाच्या आईबापानी हात जोडत डॉक्टर पोराला वाचवा अशी विनवणी केली. डॉक्टरांच्या सूचनेनुसार निशा पटापट कामे करित होती. तेवढ्यात आणखी दोन मुलाना घेवून त्यांचे आईवडल आले. यशचे मित्रच होते. आठ ते दहा वर्षाची मुलांना अचानक उलट्या सुरू झाल्या होत्या. दोन्ही मुलांची परिस्थिती गंभीर होती. यश सारखी परिस्थिती होती. तेवढ्यात विश्वजीतच्या मनात शंका आली. शहाड गावातले हे पेशंट पूजेच्या ठिकाणी जेवलेत आणि त्रास होतोय याचा अर्थ काहितरी गडबड आहे. पेशंटची संख्या वाढू शकते.

रात्रीचे साडेबारा वाजत होते विश्वजीतनी मदतीसाठी चोवीस तास तत्पर व्हॉट्सअप ग्रुपवर पुढील संकटाची कल्पना देणारा मेसेज टाकत शक्य तेवढ्या डॉक्टर व रूग्णवाहिकानी त्यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले. तो पर्यंत विश्वजीतच्या रूग्णालयात पेशंटचा आकडा दहाच्या वर गेला. विश्वजीतच्या



मेसेजला तात्काळ प्रतिसाद मिळाला शहरातील  डॉक्टरांची टिम आणि पोलीस,सामाजिक कार्यकर्त्यासंह सर्व मदतीसाठी पोहचले. रूग्णालयाबाहेर गर्दि वाढत चालली होती. शहरातील सेजरीवाल डॉक्टरकडे सुद्धा असे तीन पेशंट ॲडमिट झाले असल्याची माहिती गर्दित एकाने दिली. शहाड गावातील जवळपास पन्नासपेक्षा जास्त गावकऱ्याना जेवणातून विषबाधा झाल्याची बातमी व्हॉट्स्पवर पसरली. काहि पेशंटना तातडने पुढे हलविण्याच्या व्यवस्था करावी लागेल याची कल्पना  डॉक्टर विश्वजीतनी नातेवाईक आणि मदतीसाठी आलेल्या तरूणांना दिली. तेवढ्यात  डॉक्टर सेजरीवाल कडीचे तीन मुल दगावल्याची बातमी आली सर्वांची धावपळ उडाली. किती जण जेवलेत आकडा कितीवर जाणार कोणास ठाऊक याचीच चिंता सर्वांना सतावत होती. मोठ्या शहारातील हॉस्पिटला ॲॅब्युलन्स भरून पेशंट जात होते.

दुसरा दिवस उजाडला तोच सुतकी छाया घेवून शहाड गावातील पाच मुल आणि साठ वर्षीय वृद्धाचा रात्रीच्या घटनेत मृत्यू झाला होता. शहाड गावातील काळूराम पाटील यांचे वास्तुशांती कार्यक्रमाला हा प्रकार घडला होता. जेवणातून विषबाधा झाली होती. पोलीस यंत्रणा कामाला लागली. पोलीस निरिक्षक अजय भोसले यांनी प्रकरणाच गांभिर्य ओळखून स्वतः काळूराम याच्या घराला भेट दिली. जेवणाची भांडी,शिल्लक



जेवण तसेच काळूरामच्या घरातील कोणत्याहि वस्तूला स्पर्श करू नका अशा सूचना दिल्या. साहेब घराच्या माग शेगडीवर जेवण बनविले होत अस सांगत काळूरामने घराच्या मागे असलेली मोकळी जागा भोसलेना दाखवली. एक उग्र दर्प नाकात घुसला. शेतात वापरण्यात येणाऱ्या जहाल फोरेटचा वास भोसलेनी ओळखला. बापरे फोरेट जर जेवणात मिसळले असेल तर ? भोसलेच्या मनात आलेला विचाराने एक भंयकर शहारा अंगावरून गेला. शहाड गाव पत्रकार आणि टिव्ही रिपोर्टरने भरून गेल. ब्रेकींग न्यूज सुरू झाली होती. पत्रकारानी भोसले साहेबांना गराडा घातला. अद्याप प्राथमिक तपास सुरू आहे त्यामुळे तुम्हाला सांगण्यासारख काहि नाही सांगत भोसले जीप मध्ये बसले. सोबत जिपमध्ये काळूराम होता. काळूराम जेवणात कोणीतरी जाणूनबुजून विष टाकलय अस दिसतय तुमचा कोणावर संशय आहे का? भोसलेंच्या प्रश्नावर काय उत्तर द्याव हेच काळूरामला सुचेना. कालच्या घटनेनी तो पण सुन्न झालेला. तुमच गावात कोणाशी भांडण आहे का? भोसलेनी परत प्रश्न केला. तसा सावरत नाही साहेब भांडण तंटा नाही. आम्ही पडलो बाहेरगावचे. स्वस्तात जागा मिळाली म्हणून ऐपत नसताना घर बांधल. कोणाशी वैर घेणार काळूराम बोलला. तरीसुद्धा आठवून सांगा भोसलेना काळूरामला बोलत करायच होत. काळूरामला चार महिन्यापूर्वीची घटना पटकन आठवली.



त्याच्या घराला लागून असलेला चाळीचा मालक रोहिदास आणि काळूरामच जागेवरून वाजल होत. काळूरामने अतिक्रमण केल म्हणून रोहिदासने शिव्या दिल्या होत्या. घर कस बांधतो अशी धमकी काळूरामला दिली होती. दोन दिवसापूर्वीपण तुझ्या कार्यक्रमात गोंधळ घालतो असा रोहिदास बोलला होता असे काळूरामने भोसले साहेबाना सांगितले.

भोसलेनी साध्या वेशातील कर्मचारी शहाड गावात पाठवून रोहिदासला आणण्यास सांगितले. भीतीने थरथरत रोहिदास भोसलेंच्या पुढ्यात ऊभा होता. पोलीस ठाण्याची पायरी न चढलेल्या रोहिदासची गडबडन गेला होता. आपल्याला का आणल हेच त्याला कळत नव्हत. भांडणाच राग असा काढलास. किती जीव घेतलेस. भोसलेंच्या प्रश्नावर रोहिदास मटकन खालीच बसला. स्वतःच्या थोबाडीत मारून घेत साहेब एवढ वंगाळ काम नाय होणार हातानी. जीव घेण्याचा विचार पण मनात नाय यायचा अस म्हणत रोहिदासनी भोसले साहेबांचे पाय धरले. कार्यक्रमात गोंधळ घालणार होतास ना? असा घातलास गोंधळ भोसले रोहिदासला परत दमात घेतला. सायेब रागाच्या भरात बोललो होतो. मलापण पोरबाळ आहेत अस कस करेन रोहिदास



काकुळतीला येवून बोलत होता. गुन्हेगाराला एका नजरेत हेरणाऱ्या भोसलेंच्या पोलीस नजरेला रोहिदास असं करणार नाही याचा अंदाज आला. पण मग खरा गुन्हेगार कसा शोधणार. भोसलेंच्या डोक्यात विचारचक्र सुरू होते.

अचानक मनात विचार चमकून गेला. दगावलेली पाच मुलं काळूरामच्या नात्यातील होती. काळूरामच्या कुटूंबातलं कोणीतरी विष घातलं नसलं कशावरून? भोसलेनी पुन्हा काळूरामकडे मोर्चा वळविला. जेवण वाढायला कोण कोण होतं त्याची माहिती घेण्यास सुरवात केली. नात्यातील चार बायका जेवण वाढत होत्या. असा प्रसंग काळूरामवर ओढावला आणि घरातील बायकांना चौकशीसाठी बोलावणं भोसलेना योग्य वाटत नव्हतं. अखेर मनाशी विचार करून एक प्लान तयार केला. साध्या वेशातील महिला पोलीस कर्मचारी सोनम खरे आणि सोबत पोलीस शिपाई योगेश शिंदे यांना काळूरामच्या घरातील हालचालीवर नजर ठेवण्यास सांगितले. दोन दिवस उलटले आणखी पंचवीस जण सिरीयस होते. शहाड गावावर शोककळा पसरली होती. सर्व गावात व्यवहार ठप्प होते. स्मशानशांतता होती. परंतु साध्या वेशातील सोनम आणि योगेश घारी सारखी नजर ठेवून होते. काळूरामच्या घरात गडबड सुरू झाली तसे दोघे सावध झाले. काळूरामची सून हेमाला उलटी झाली आणि ती चक्कर येवून पडल्यामुळे एकच



धावपळ उडाली. हेमाला गाडीतून  डॉक्टर विश्वजीतच्या हॉस्पिटला आणले. शहाड गावातला पेशंट असल्यामुळे कसली रिस्क नको म्हणून विश्वजीतने सर्व तपासण्या करायचा निर्णय घेतला. हेमाला अॅडमिट केल्याची खबर पोलीस शिपाई योगेशने भोसले साहेबाना दिली. सर्व हालचालीवर बारिक नजर ठेवा अशा सूचना भोसलेनी दिल्या. साध्या वेषात वावरणाऱ्या सोनमने हेमासह तिची सासू आणि नणंद याची माहिती काढली. हेमाच यापूर्वी एक लग्न झाल होत. पण पहिल्या नवऱ्यानी सोडचिठ्ठी दिल्यानंतर काळूरामच्या दारुड्या पोराच्या गळयात हेमाला बांधली होती. रंगरूप नसलेली आणि कोळशागत काळी हेमाला गळयात डोरल बांधायला आधार एवढच काय ते दुसर लग्न होत. सोनमने सर्व माहिती भोसले साहेबाना सांगितली.

विश्वजीतला फोन लावून हेमाच्या तब्येतीची चौकशी भोसलेनी केली. हेमाच्या शरिरात विषाचा अंश देखील नाही. तणावामुळे तिला चक्कर आलेय अस  डॉक्टरनी सांगितल्यावर हेमाच विषबाधा प्रकरणावर उतारा देवू शकेल याची खात्री भोसलेना पटली.  डॉक्टर आणि भोसले साहेबांच बोलण झाल. हेमाला डिसचार्ज देवून चौकशी साठी ताब्यात घ्यायच ठरल. साध्या वेषात हेमावर लक्ष ठेवून असलेली सोनम आणि योगेशने हॉस्पिटलमधून हेमाला थेट पोलीस ठाण्यात आणल. घरात



घडलेल्या प्रसंगाच दडपण हेमाच्या चेहऱ्यावर स्पष्ट जाणवत होत. साहेबांच्या इशाऱ्यानंतर योगेशने हेमापूढे ज्यूसचा ग्लास धरला. परंतु हेमाने मानेने नकार दिला. तुमच्या वाईटावर कोण असेल? जेवणात विष कोणी टाकल असेल भोसलेनी थेट हेमाला प्रश्न केला. सायेब काय माहित. काय सांगू तुम्हाला. हेमाच उत्तर ऐकून पुढच सगळे मार्गच बंद झाल्यासारखे भोसलेना वाटल. पण हार मानणार ते भोसले नाही. जेवण तुम्हीच चौघी वाढत होता ना? मग तुम्हाला माहित पाहिजे भोसलेनी आवाज चढविला. पण हेमाचा चेहरा तसाच निर्विकार आणि पुन्हा तेच उत्तर. हेमाला बाजूच्या रूममध्ये घेवून जा साहेबानी सांगताच सोनम आणि योगेश पुढे आले. हेमाला बाजूच्या खोलीत बसवून योगेश पुन्हा साहेबाच्या पुढ्यात आला. साहेब माझा डाऊट हेमावर आहे योगेश ठामपणे बोलला. कशावरून वाटतय भोसलेनी विचारले. साहेब हॉस्पिटल पासून हेमाच्या बरोबर आहे. जेवणात टाकलेल्या विषाचा तो उग्र वास नाकात बसलाय. तोच वास हेमाच्या साडीला येतोय. योगेशच्या बोलण्यात दम होता. खरं होत हेमा आपल्या केबिनमध्ये आली तेव्हा आपल्याला हा वास जाणवला होता याची भोसलेना आठवण झाली.

हेमाला बोलती करायची तर पोलीस खात्याच चौदाव रत्न दाखवाव लागेल. भोसले साहेबानी महिला पोलीस सोनमवर



हेमाला बोलती करायची जबाबदारी सोपावली. अर्ध्या तासानी घामाघूम सोनम साहेबा पुढे आली. साहेब पट्ट्यानी मारली पण हू का चू नाही. मी विष टाकल नाही अस सांगतेय सोनमने दमलेल्या आवाजात सांगितल. ठिक आहे माझ्या केबिनमध्ये आणा बघतो असे भोसलेनी सांगितले. हेमा शेवटची संधी देतोय खरं सांग. तुझ्या साडीला पण फोरेटचा वास येतोय. पण भोसलेच बोलण ऐकून न ऐकल्यासारख करून हेमा निमूट होती. तेवढ्यात वीज चमकावी असा भास हेमाला झाला. भोसलेंचा पोलीसी रपाटा कानाखाली बसल्याने हेमाला काहि क्षण बधीर झाल्यासारखे वाटले. सणसणीत कानाखाली बसताच हेमा ताळ्यावर आली. हो विष मीच टाकल होत वरणात. पण मला सर्वांना नव्हत मारायच माझी सासू सासरे आणि नणंद याना ठार मारायच होत. पण घडल भलतच. हेमाच्या तोंडून विषासारख जहाल सत्य बाहेर पडत होत.

सासरी नेहमी घालून पाडून बोलायचे. मी काळी असल्याने सगळेच व्देष करायचे. आमच्या पोराला शोभत नाही. त्याला दुसरी बायको बघू असे म्हणायचे. साहेब पहिल्या नवऱ्यानी सोडल आता दुसरा संसार मोडला तर माझ आयुष्य बरबाद होणार त्यापेक्षा यांच आयुष्य बरबाद करायच ठरविल. हेमाला बोलताना दम लागला तशी थांबली. अग पण एवढ्या लोकांच्या जेवणात विष घातलस.. ते पण अशा कार्यक्रमात सोनम बोलली. पोराना नव्हत मारायच.



बाहेरची लोक जेवल्यावर घरातील जेवाला बसली तेव्हा वरणात विष टाकल. पण नंणदेची पोर परत जेवायला बसली. मी वरणाच पातेल लाथ मारून सांडविण्याचा प्रयत्न केला तेव्हा सासू भडकली. डोळे फूटलेत का अशी बोलली. त्यामुळे संशय नको म्हणून तेच वरण वाढल हेमा डोळयात एक अश्रूचा टिपूस न आणता सांगत होती. सायेब सर्व असह्य झाल होत रोजरोज रंगावरून टोमणे म्हणून संपवायच ठरवल पण जीव गेला पोरांचा.

हेमा बोलताना थांबली. बदला घेण्यासाठी हेमानी घेतलेला निर्णयाने लेकुरवाळी कुटूंब उध्वस्त झाली होती पण त्याचा पश्चाताप हेमाच्या चेहऱ्यावर नव्हता.



# प्रेयसी

*रायगड जिल्ह्यातील घडलेली सत्यघटना. प्रियकराने फसविल्या-नंतर प्रेयसीने मित्राच्या मदतीने काटा काढला.. स्थळ व पात्रांची नावे बदलली आहेत.*

क्रिकेट ग्राऊंड तयार करण्यासाठी बच्चे कंपनी तहान भूक विसरून महिनाभर राबत होती. पीच तयार झालेलं आता आजूबाजूच वाढलेल गवत पेटवून दिल म्हणजे बाऊंड्री तयार होईल. गण्या बच्चे कंपनीत वयाने मोठा. आठवीतून शाळा सोडून दिलेला थोडी मिसरूड फूटत असल्याने क्रिकेट टिमचा कॅप्टन. गवत पेटवण्यासाठी गण्यानी खिशातली माचिस काढली. काडी ओढताच ऊन्हाचा भर असल्याने सुकलेलं गवत भरभर पेटू लागलं. गण्यानी ऑर्डर सोडली. चार वाजता परत ग्राऊंडवर या. तो पर्यंत गवत जळून जाईल. तसे सर्व घरी निघाले.

चार वाजता सर्व पोर पुन्हा जमली. बरचस गवत जळून गेलं होत धूर निघत होता. काठीने जळलेल गवत ढोसळताना गण्याला



क्षणभर थांबला. जळलेल्या गवतात अर्धवट जळलेला माणूस पाहून गण्याची पाचावर बसली. हातातली काठी टाकून गण्या गावाच्या दिशेने धावत सुटला पाठोपाठ गण्याचे फंटर.

एव्हाना गावात बोंबाबोंब झाली होती. गावाबाहेर एकाचे प्रेत आहे समजल्यावर हातचं काम सोडून गावकरी ग्राऊंडवर पोहचले. चेहरा पूर्ण विद्रूप झालेला पुरूषाचा मृतदेह होता. पोलीस पाटलानी चौकीला खबर केली होती. बघ्यांची गर्दी वाढत होती. दूरून पोलीसांची जीप येताना पाहून पाठीमागे लचांड नको म्हणून हौशेनवशे मागे पळाले. जीप थांबताच पोलीस पाटील पुढे झाले. पोलीस इन्स्पेक्टर ज्योती गायकवाड आणि सोबत आणलेले पंचाना घेवून पोलीस पाटील प्रेताजवळ आले. चेहरा ओळखू न येण्या इतका विद्रूप होवून कवटी दिसत होती. बॉडी बऱ्याच दिवसाची दिसते इन्स्पेक्टर ज्योतीने पोलीस पाटलाकडे पाहत अंदाज बांधला. व्हय पण आज पोरानी ग्राऊंडसाठी गवत जाळल तेव्हा दिसून आली. ओळखीचा पण वाटत नाय पोलीस पाटलानी माहिती दिली. मृतदेहाचे जागेवर पोस्टमार्टम करावे लागेल पंचनामा करून घ्या अशा सूचना इन्स्पेक्टर ज्योतीने हवालदार सावंतला दिल्या.



पाटील बॉडी पहिली कोणी पाहिली त्या पोराला बोलावून घ्या. काहि अजून माहिती मिळते का पाहू असे इन्स्पेक्टर ज्योतीने सांगतिल्यावर पाटलानी गण्याच्या आणण्यासाठी माणूस पाठविला. गण्याच्या अंगाला थरकाप सूटलेला. त्याला वतरताना पाहून ज्योती मॅडमनी खांद्यावर हात ठेवत घाबरू नकोस तू फक्त काय पाहिलस ते सांग. परंतु घाबरलेल्या गण्याच्या तोंडातून शब्दच फूटेना. सावंतने पाण्याचा ग्लास गण्याला आणून दिला. घोटभर पाणी प्यायल्यानंतर गण्या थोडा सावरला. ग्राऊंड बनविण्याची हकिगत सांगितली. ग्राऊंड बनवताना कधी कोणाची गाडी या भागात यायची का? या इन्स्पेक्टर ज्योतीच्या प्रश्नावर गण्याला आठवल्यासारखे झाले. मोटारसायकलवरून दोन माणसं नेहमी यायची. अर्धातास थांबून सिगारेट ओढायचे आणि निघून जायचे. मोटारसायकलचा नंबर पाहिलाय का? या प्रश्नावर गवताच्या पलीकडे गाडी ऊभी करायचे असे उत्तर गण्याने दिल. पुन्हा पाहिलस तर ओळखशील का गण्या हवालदार सावंतने विचारले. हो ओळखू शकतो असे उत्तर गण्याने दिले.

बॉडीजवळ ओळख पटेल असा काहिच पुरावा सापडला नाही. ठरवून केलेला मर्डर आहे सावंत शून्यातून सुरवात करायचे कामाला लागा असे आदेश इन्स्पेक्टर ज्योतीनी दिले.



दोन दिवस उलटले तरी काहिच सुगावा लागत नव्हता. विचारमग्न ज्योतीची तंद्री सावंतने सॅल्यूट ठोकताच भंगली. मॅडम रसायनी पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार आहे. आपल्याला सापडलेली बॉडीच वर्णन मिळतजुळत आहे. त्यांच्या नातेवाईकांना बोलावून घेतलय. मोहपाडा येथील अजित राऊत महिनाभरापासून बेपत्ता होता. मित्रांना भेटून येतो असे सांगून गेलेला अजित दोन दिवस झाले तरी परत न आल्याने अखेर अजितच्या पत्नीने पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. अर्धवट जळलेला चेहरा ओळखू न येण्यापलीकडे बॉडीची अवस्था झालेली त्यामुळे ओळख पटेल कि नाही अशी शंका होती. परंतु अजितच्या भाऊ रोशनने मृतदेह पाहताच हंबरडा फोडला. अजितच असल्याचे त्याने ओळखले. अवघ्या दोन महिन्यापूर्वी अजितचे लग्न झाले होते. नुकताच कुठे संसार सुरू झाला होता.

सर्व सोपस्कार झाल्यानंतर इन्स्पेक्टर ज्योतीनी रोशनला बोलावून घेतले. अजितची कोणाशी दुश्मनी, पैशाचे व्यवहार याबाबत चौकशी केली परंतु अजित सरळमार्गी होता. त्यामुळे कोणाशी भांडण तंटा नव्हता अशी माहिती रोशनने दिली. अजितच नुकतच लग्न झाल होत त्यामुळे लग्नामुळे कोणी दुखावल असेल तर अशी शंका इन्स्पेक्टर ज्योतीच्या मनात आली. सावंत अजितच्या सासुरवाडीत त्याच्या पत्नीचा पूर्व इतिहास तपासा



आणि अजितबद्दलपण खबऱ्याकडून माहिती गोळा करण्याच्या सूचना ज्योती मॅडमने दिल्या. अजितची पत्नीबद्दल विशेष काहि नव्हत. परंतु अजितचं गावातल्या सविता बरोबर गेली चारपाच वर्ष प्रेमप्रकरण होत. गावात दोघ लग्न करणार अशी चर्चा असताना दोघांच अचानक बिनसल होत. अजित लग्न करून मोकळा झाला होता. तर सविताने अजितचा मित्र दिलीपला गळाला लावला होता. अजितच्या खुनामागे प्रेमाची भानगड असावी अशी पुसटशी शंका इन्स्पेक्टर ज्योतीच्या मनात येत होती. अखेर दिलीपला चौकशीसाठी बोलाविण्यात आले. माझा जिवाभावाचा मित्र होता लहानपणापासून एकत्र वाढलोय असे दिलीप रडत सांगत होता. परंतु पोलीस खात्यात राहून मगरमछ आसू ओळखण्यात तरबेज इन्स्पेक्टर ज्योतीला पाणी कुठेतरी मुरतय याची खात्री वाटत होती. जिवाभावाच मित्र म्हणून त्याची प्रेयसी तू पटवलीस का? या प्रश्नावर दिलीप गडबडला. सविताने विचारल म्हणून होकार दिला अस जुजबी उत्तर दिलीपने दिल. त्याचक्षणी ज्योती मॅडमना गण्याची आठवण झाली. दोन माणस मोटारसायकल घेवून यायची अशी माहिती गण्यानी दिली होती. दिलीपला पोलीस ठाण्यात बसवून ठेवून गण्याला बोलाविण्यात आले. गण्याला बाजूच्या खोलीत बसलेला दिलीपचा चेहरा खिडकीतून दाखवताच हाच माणूस होता. याचे सोबत आणखी एक जण यायचा असे गण्यानी



सांगितले. सावंत याला चौदाव रत्न दाखवा तरच खरं सांगेल इन्स्पेक्टर ज्योतीचा रूद्रावतार पाहून दिलीप लटपटायला लागला. हवालदार सावंतला त्याचे सहकारी पण जल्लाद बोलायचे. जल्लादाच्या तावडीत सापडलेला दिलीप पाच मिनिटात सुता-सारखा सरळ आला. सगळ खरं सांगतो अस म्हणून हातापाया पडू लागला. सविताच्या सांगण्यावरून अजितला मारल्याचे दिलीप सांगू लागला. सविताने ओढणीने दिलीपचा गळा आवळला आणि मी आणि बबनने अजित मेल्याची खात्री करण्यासाठी डोक्यात दगड घातला.

खुनाची सूत्रधार सविता पोलीस ठाण्यात इन्स्पेक्टर ज्योतीच्या समोर खाली मान घालून बसली होती. केलेल्या कृत्याचा अजिबात पश्चाताप तिच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता. का मारलस तुझा प्रियकर होता ना? इन्स्पेक्टर ज्योतीच्या प्रश्नाला उत्तर देताना कुत्सितपणे हसत प्रियकर होता म्हणून तर मारला असे सविताने बोलली. त्याच लग्न झाल होत. तू सुद्धा लगेच दिलीप बरोबर सूत जमवल होतस मग मारायची काय गरज होती हवालदार सावंतने एक घाव दोन तुकडे केले. अजितचा काटा काढण्यासाठी दिलीप बरोबर प्रेमाचे नाटक केले. चारवर्ष माझे सर्वस्व देवून दुसरी बरोबर लग्न करणाऱ्याला कस सुखाने जगेन देईल. बोलताना सविताच्या चेहऱ्यावरचे भाव बदलत होते. बदल्याची आग



चेहऱ्यावर दिसत होती. अजितचा काटा काढण्यासाठी कोणाची तरी मदत पाहिजे होती म्हणून दिलीपला जवळ केला. आणि मी दिलेल्या वस्तु परत घेण्याच्या बहाण्याने अजितला बोलावून त्याचा काटा काढला. सविताच्या तोंडून बाहेर पडणारे विषारी फुत्कार ऐकताना दिलीप गारच झाला. आपला वापर करून घेत नाहक अडकवले गेल होत याची भांडाफोड सविता करत होती. दर दोन दिवसानी दिलीप आणि बबन ॲसिड घेवून अजितचा मृतदेह नष्ट करण्यासाठी जायचे. अजितच हाड सुद्धा घरच्याना मिळू नये असा सवितानी प्लान आखला होता. परंतु गावाबाहेर क्रिकेटसाठी ग्राऊंड बनविताना गण्याच्या नजरेत दिलीप आला आणि पोलीसाना खुनाचा उलगडा करता आला.



# तोतया

****महाराष्ट्रातील जळगाव येथे घडलेली सत्यकथा. पात्रांची नावे बदलली आहेत.*

टाळयांचा प्रचंड कडकडाट. सभागृहातील तरूणांमध्ये उत्साह संचारला होता. व्यासापीठावरून बोलणारा आयपीएस अधिकारी आपल्या सारखाच सामान्य कूटूंबातून संघर्ष करित पोहचला याचा सभागृहातील तरूणांना अभिमान वाटत होता. आयपीएस अधिकारी प्रशांत आळंदेला प्रशासकिय क्षेत्रात जाण्याची इच्छा असलेल्या तरूणांना मार्गदर्शन करण्यासाठी बोलाविण्यात आले होते.

सभागृह खच्चून भरले होते. समोरिल गर्दितून मिळणारा प्रतिसाद पाहून प्रशांतला देखील चेव चढला होता. अंगावर वर्दि चढवली कि पहिले प्राधान्य देशहिताला. प्रचंड टाळया. कोणत्याहि ठिकाणी काम करा पण आपल्या मातीला विसरू नका. पुन्हा प्रचंड टाळया. जशा जशा टाळया वाढत होत्या तसतसा आयपीएस अधिकारी प्रशांतच्या बोलण्याला धार येत होती. मी



आज एवढ्या मोठ्या हुद्द्यावर आहे पण तुमच्यात येताना माझा वेष बघा.. मी बावळा वाटेन. कारण पायात कोल्हापूरी चप्पल साधा शर्ट पण वेष महत्वाचा नसून कर्तृत्व महत्वाच आहे. प्रशांतच्या या वाक्यावर सभागृह टाळ्यानी दणाणूण गेल. व्याख्यान आयोजन केलेले दिपस्तंभ क्लासचे अनिल जळगावकरचा चेहरा खुलून गेला.

परंतु त्याचवेळी व्यासपीठावर असलेले एपीआय जयदिप काईनकरन मात्र अस्वस्थ होते. एपीआय प्रशांतचे मार्गदर्शन योग्य असले तरी देहबोली पोलीस अधिकाऱ्यांची वाटत नव्हती. रोमारोमात पोलीसी खाक्या असलेल्या जयदिपला प्रशांतची देहबोली खटकत होती. जयदिप काईनकर एक डॅशिंग पोलीस अधिकारी म्हणून अल्पावधीत वचक बसविला होता.

आभाराचे भार कशाला या वाक्याने जयदिप भानावर आला. कार्यक्रम संपत आलेला. जयदिपच्या मनातले विचारचक्र थांबले नव्हते. कार्यक्रम संपला तसा विद्यार्थ्यांनी आयपीएस अधिकारी प्रशांतला गराडा घातला. सही घेण्यासाठी,हात मिळविण्यासाठी एक चढाओढ तरूणांची चालली होती. थोडी गर्दि ओसरताच जयदिप पुढे सरसावला. त्याने प्रशांतला एक कडक सॅल्यूट ठोकला. सर खुप छान मार्गदर्शन केलत. आजपर्यंत असे व्याख्यान



ऐकले नव्हते. जयदिप भारावल्यासारखा बोलत होता. प्रशांत मनोमन सुखावला होता. सर एक विनंती आहे.. चहासाठी चला. अजिबात वेळ नाही आता पुण्याला निघायच. संध्याकाळी व्याख्यान आहे अस म्हणत प्रशांत गाडीच्या दिशेने निघाला. परंतु जयदिप मागे हटणारा नव्हता. आपण व्याख्यानाने किती भारावलो हे दाखवत परत भेट कधी होईल सर तुमचे पाय माझ्या पोलीस ठाण्यात कधी लागतील चला अशी विनवनी केली. ठिक आहे येतो पण फक्त पाचच मिनिट थांबेन असे म्हणत पोलीस जिपच्या मागे प्रशांतची कार निघाली. पोलीस ठाण्याच्या आवारात दोन्ही गाड्या येताच जिपमधून घाईघाईने उतरत जयदिपने पुन्हा एकदा प्रशांतला सॅल्यूट मारत सर माझ्या केबिनमध्ये बसा चहा आणण्यासाठी शिपाई पाठवतो. प्रशांत जयदिपच्या केबिनमध्ये आला. जयदिपच्या खुर्ची समोर मांडून ठेवलेल्या खुर्च्यातील दुसऱ्या रांगेत बसत प्रशांतने पुन्हा त्याचा साधेपणा दाखवायचा प्रयत्न केला. जयदिपला पुन्हा खटकले. पोलीस ठाण्यात अधिकाऱ्याचा वावर साधा नसतो. पण हे अति होतय अस त्याला वाटल. सर तुमची सध्या पोस्टींग कुठे आहे. मेघालय एवढेच पण थोड गुर्मीत उत्तर प्रशांतने दिल. सर कोणत्या वर्षाची बॅच होती. या प्रश्नावर प्रशांत रागावून चहा कुठे आहे? असा प्रश्न केला. तसा जयदिपने देखील आरडाओरड करित शिपायाला धारेवर धरल. अरे चहा आणा



लवकर. पण चहा येणार नव्हता हे जयदिप आणि शिपायाला माहिती होत. सर सांगा ना कोणत्या वर्षी होतात. 2010ला होतो एवढ उत्तर देत जयदिप मोबाईल काढून बोलू लागला. दिपस्तंभचे अनिल सोबत होतेच. सराना ऊशीर होतोय चहाच लवकर बघा असे त्यांनी जयदिपला सांगितले. हो बघतो असे म्हणत जयदिप केबीन बाहेर आला.

बोलताना जयदिपच्या नकळत त्यांनी काढलेला फोटो 2010मध्ये आयपीएसच्या बॅचला असलेला त्याचा मित्र अंकुश मोरेला पाठविला. थोड्या वेळाने अंकुशचा रिप्लाय आला. 2010ला नसेल पुढेमागे असेल. अंकुशच्या उत्तराने जयदिपला मघापासून त्याच्या मनात उठलेले शंकाच वादळ खरं असल्याचे खात्री पटत होती. परंतु जर अंदाज चुकला तर. तर या खात्यात वरिष्ठांची नाराजी आणि परत हेटाळणी ठरलेली. स्वतःवर ठाम विश्वास असलेला जयदिप केबिनमध्ये शिरला तोच उग्र अवतारात. त्याने खुर्चीत बसलेल्या आयपीएस अधिकारी प्रशांतच्या सणसणीत कानाखाली दिली. तसा प्रशांत खुर्चीतून खाली कोसळला. प्रशांत सोबत असलेल्या दिपस्तंभ क्लासचे अनिल जळगावकर समोर काय घडतय हेच कळेना. एका मोठ्या



ऑफिसरला साधा अधिकारी कानाखाली मारतोय पाहून अनिल गडबडला. जयदिपचा उग्र अवतार पाहून अनिलची वाचा बसली होती तर प्रशांत अजून जमिनीवर पडलेला. जयदिपने पट्ट्याला हात घातला तसा प्रशांत गुढघ्यावर बसत मारू नका सगळ खरं सांगतो असे म्हणत हात जोडू लागला. आयोजक अनिल जळगावकर समोरच दृश्य पाहून शॉक झाला होता.

प्रशांतने बोलायला सुरवात केली. आयपीएस अधिकारी होण्याच स्वप्न होत. पदवीनंतर खुप मेहनत केली. परंतु दरवेळी अपयश यायच. शेवटी कंटाळून नाद सोडला. अभ्यासाने थोडी माहिती झालेली आणि मनातील सुप्त इच्छा स्वस्थ बसू देत नव्हती. त्यामुळे आयपीएस बनल्याचे माझ्या छोट्याश्या गावात सांगितले. सर्वांनी विश्वास ठेवला. हळूहळू सवय होत गेली. दिपस्तंभ क्लासचे अनिल सर्व ऐकत होते. त्याचा देखील कानावर विश्वास बसत नव्हता. समोरचा अधिकारी तोतया आहे. जयदिपने अनिलकडे पाहताच त्याला सुद्धा घाम फुटला. साहेब देवा शप्पथ माहित नव्हत हा तोतया आहे. इंटरनेटवर फोटो पाहिले. तरूण अधिकारी आपल्या मातीतील तरूणाना चांगल मार्गदर्शन करेल म्हणून बोलावला कपाळावरचा घाम पुसत अनिल बोलला. जयदिपने पुन्हा मोर्चा प्रशांतकडे वळविला. साहेब कोणाची फसवणूक केली नाही कि कोणाला लुटल नाही. अधिकारी म्हणून मिरविण्याची



हौस होती त्यातून केल काकूळतीला येवून प्रशांत बोलत होता. ठिक आहे पाहू सद्या चहा बाकी आहे आणि पुढचा पाहुणचार घ्या असे म्हणत एपीआय जयदिपने प्रशांतला गाठोड उचलाव तस उचलून कोठडीकडे नेण्यास सांगितल. तोतया अधिकाऱ्याच डोळया देखत बिंग फुटलेल पाहणाऱ्या अनिलने पोलीसी नजरेची चुणूक अनुभवल्यावर जयदिपला वाकून नमस्कार करित काढता पाय घेतला.



# दानव

रात्रीचे साडेआठ वाजत होते. हजेरीची वेळ झाली होती. ठाणे अंमलदार कांबळेनी शिट्टी मारली तशी कर्मचाऱ्यांची धावाधाव झाली... नव्याने बदली होवून आलेले इन्स्पेक्टर प्रतापराव देशमुख कडक शिस्तीचे असल्याने शिट्टी वाजताच सर्व स्टाफ पोलीस ठाण्याच्या आवरात जमला. तेवढ्यात एक रिक्षा पोलीस ठाण्याच्या गेटवर थांबली. रिक्षातून उतरलेल्या इसमाचा चेहरा प्रचंड भेदरलेला,अंग थरथरत होत. कसाबसा हजेरी सुरू असलेल्या ठिकाणी आला. कंप्लेट देना है... पिस्तुल दिखाकर तीन जण मेरा टॅक्सी लेकर भागे.. पिस्तुल शब्द ऐकताच अंमलदार कांबळेना प्रकार गंभीर असल्याची जाणवले. काबंळेनी तडक त्या इसमाला देशमुख साहेबांच्या केबिन मध्ये नेले. साहब मेरा नाम श्याम तिवारी है. भाडे पे टॅक्सी चलाता हू. टोल नाका से थोडी दूरी पर तीन जण खडे थे. पॅसेंजर समज के टॅक्सी रोका तो एक ने कनफटी पर पिस्तुल रखा मुझे टॅक्सी से बाहर खिचकर तीनो टॅक्सी लेकर खोपोली कि ओर भागे. कांबळे तात्काळ वायरेलसवर मेसेज पाठवा नाकाबंदी करा असे आदेश इन्स्पेक्टर देशमुखानी सोडले.



श्याम अजूनहि थरथरत होता. तीनो का हुलिया कैसे था ? देशमुखानी श्यामला प्रश्न केला. साहब दो टपोरी जैसे लग रहे थे. लेकिन जिसके पास पिस्तुल था वो तो एकदम राक्षस दानव था. टोल नाक्यापासून काहि फूटावरून टॅक्सी पळविण्यात आली होती म्हणजे टोल वरिल सीसी टिव्ही फूटेज मध्ये सगळी घटना असेल असा विचार इन्स्पेक्टर देशमुखांच्या मनात आला. देशमुख तडक उठले. श्याम देखील बरोबर चलण्याचा इशारा केला. कांबळे जीप काढायला सांगा आम्ही टोल नाक्यावर जावून येतो.

घटना घडून अर्धा तास होत आला होता. टोल नाक्यावर घडलेल्या प्रकाराची काहिच कल्पना नव्हती. इन्स्पेक्टर देशमुख सीसी टिव्ही फूटेज पाहत होते. फूटेज मध्ये पाचशे मीटर अंतर पर्यंत दिसत होत. श्यामची टॅक्सी टोल नाक्यामधून बाहेर पडताना स्क्रिनवर दिसू लागताच साहब यहि है मेरा टॅक्सी. इसके बाद तीन बदमाश मिले श्याम बोलला. टॅक्सीला हात करणारे तिघे जण कॅमेऱ्याच्या तिसऱ्या डोळयात कैद झाले होते. तिघांमधील उंचपुरा आणि मजबूत देहयष्टीच्या इसमाला पाहून इन्स्पेक्टर देशमुखांचे डोळे विस्फारले आणि तोंडातून अरे हा तर अन्वर खत्री.

अन्वरने गेल्या काहि महिन्यापासून सर्वत्र धुमाकूळ घातला होता. पोलीसांवर देखील अन्वरने गोळीबार केल्यामुळे अन्वरची



दहशत प्रचंड वाढली होती. मोक्का मधील मोस्ट वॉण्टेड अन्वर मोठा गुन्हा करायच्या तयारित असल्याचा अंदाज देशमुखाना आला. साहब मेरी टॅक्सी मे जीपीआरएस सिस्टम है. श्यामच्या या वाक्याने इन्स्पेक्टर देशमुखांचा चेहरा एकदम खुलला. त्यांनी ताबडतोब वरिष्ठ अधिकार संपत कदम यांना फोन करून अन्वर बद्दल माहिती दिली. देशमुख पूर्ण तयारिनीशी जाव लागेल अन्वर खतरनाक आहे स्पेशल टिम तुमच्या मदतीला पाठवतो असे कदम यांनी सांगितले.

घटना घडून दोन तास उलटत होते. श्यामच्या टॅक्सीचे लोकेशन मुंबई पूणे हायवेलगत दांडवाडी गावाजवळ दाखवत होते. अन्वरला पकडण्याची व्यूह रचना आखण्यात आली. पस्तीस जणांची टिम निघाली. बुलेटप्रूफ जॅकेट, श्वान पथक घेवून दांडवाडीच्या दिशेने खाजगी गाड्याचा ताफा निघाला. देशमुख वरिष्ठांच्या संपर्कात होते. रात्रीचे बारा वाजत होते अन्वरच लोकेशन अद्याप दांडवाडी दाखवत असल्याचा मेसेज देशमुखाना मिळाला. याचा अर्थ अन्वर दांडवाडीत मुक्कामाला होता. अगोदरच सर्व सूचना टिमला दिल्याप्रमाणे दांडवाडी पासून काहि अंतरावर असलेल्या ढाब्यावर गाड्या थांबल्या. थोडी जरि कुणकुण लागली तर हातच सावज निसटेल याची कल्पना असल्यामुळे सावधगिरी बाळगण्यात येत होती. दांडवाडी जेमतेम



चाळीस घरांची वस्ती असल्याची माहिती पोलीसानी मिळवली होती परंतु वाडीला लागून डोंगर भाग असल्याने अन्वर पळून जाण्याची शक्यता होती. रात्रीच्या अंधारात अन्वरला पकडणे म्हणजे वाघाच्या जबड्यात हात टाकणे याची कल्पना इन्स्पेक्टर देशमुखाना होती. थोडी जरि चाहूल लागली तरी अन्वर निसटणार. त्यामुळे तो सावध होण्यापूर्वी त्याच्यावर झडप टाकायची वेळ पडली तर शूट करा असे आदेश होते.

पोलीसांची चाहूल लागताच वाडीतील कुत्र्यांचे भुंकणे वाढले. संपूर्ण दांडवाडीला पोलीसानी वेढा टाकला. श्यामची टॅक्सी वाडीच्या मध्यभागी होती. त्यामुळे अन्वर नक्की कोणत्या घरात आहे याचा अंदाज येत नव्हता. टॅक्सीच्या चारहि चाकाची हवा सोडण्यात आली. संपूर्ण वाडी झोपेच्या अधीन होती. देशमुखानी रिस्क घेत एका घराच्या ओसरीवर झोपलेल्या म्हातारबाला उठवला. तराट म्हातारबाने झोपेतच शिव्याची लाखोली वाहिली. म्हातारा असा उठणार नाही याची खात्री देशमुखाना होती. खिशातली सिगारेट काढून लायटरने पेटवली. सिगारेटचा धूराच्या वासाने म्हातारा उठला. म्हाताऱ्यासाठी अगोदरच एक सिगरेट देशमुखानी काढून ठेवली होती. म्हाताऱ्याने सिगारेट देणाऱ्याचा चेहरा देखील न पाहता अधाशा सारखी सिगारेट खेचली. उशी खालची माचिस काढून जाळ करित सिगारेट



पेटवली. देशमुख साध्या वेशात आणि बुलेटप्रूफ जॅकेट यामुळे वाडीत पोलीस आलेत याची म्हाताऱ्या कल्पना आली नाही. सिगारेटचा झुरका घेतला. म्हातारबा गाडी कोणाकड आली.. म्हाताऱ्याने देखील वेळ न लावता गाडी व्हय... कैलाशकडे आली असे उत्तर दिल. कूठल घर कैलासच असा प्रश्न देशमुखानी केला. माझ्या घराच्या मागच हाय अस म्हणून म्हाताऱ्याने हाताने इशारा केला. कैलासच घर वीटा मातीच होत. घराला सर्व बाजूनी घेरण्यात आल. अन्वरला पळण्याची संधी द्यायची नव्हती त्यामुळे देशमुख स्वतः पुढे होते. परंतु रात्रीच्या अंधारात अन्वरला पकडण्याची जोखीम घेण अवघड होत. इन्स्पेक्टर देशमुखानी सर्व टिमला दिवस उजाडण्याची वाट पाहू अशा सूचना दिल्या.

घडयाळाचा काटा पुढे सरकत होता. पहाटेचे सहा वाजत होते. तेवढ्यात कैलासच्या पडवीतील लाईट लागली. दबा धरून बसलेली सर्व टिम सावध झाली. गरज पडली तर गोळीबार करा अस ठरल होत. दरवाजा उघडून डुलतच तरूण बाहेर आला. चड्डी बनियनवर असलेला तरूणाने घराच्या भिंतिंजवळच लघवी केली. हा अन्वर नव्हता बहुतेक कैलास असेल असा तर्क देशमुखानी बांधला. कैलास नशेतच होता. घरात शिरताना दरवाजा न लावताच कैलास पहिल्या खोलीत आडवा झाला. चांगली संधी होती इन्स्पेक्टर देशमुखानी इशारा केला. देशमुखाच्या पाठोपाठ



चार पोलीस आत शिरले. कैलासला काहि कळायच्या आतच गोधडीत त्याची गठडी वळली. खोलीत कैलास एकटाच होता. आपल्या उरावर पिस्तुल रोखून पोलीस बसलेत या जाणीव होताच कैलाशची दारू उतरली. देशमुखानी कैलास डोक्यावर पिस्तुल रोखत अन्वर कूठाय? विचारले. तसे बंद दरवाजाकड हात दाखवत आतल्या खोलीत झोपलाय असे सांगितले. देशमुख सावध झाले. कैलासला अन्वरला उठवण्यास सांगून सर्व जण भिंतीआड लपले. अन्वर भाई कैलासने दरवाजा ठोठावला. आतून काहिच प्रतिसाद आला नाही. कैलासने परत आवाज दिला. यावेळी कडी काढल्याचा आवाज आला. इन्स्पेक्टर देशमुखांचा पिस्तुलच्या ट्रिगरवर हात होता. परंतु दरवाजा उघडणारा अन्वर नव्हता. देशमुखानी विजेच्या चपळाईने दार उघडणाऱ्या तरूणावर झडप टाकली. तेवढ्यात दोन फायरिंगचा आवाज झाला. सावध झालेल्या अन्वरने देशमुखांवर फायरिंग केली. सुदैवाने बुलेटप्रूफ जॅकेटामुळे देशमुख बचावले. या गडबडीत देशमुखाच्या पकडीत आलेला तरूण निसटला. गोळीबाराच्या आवाजाने बाहेर दबा धरून बसलेली पोलीस टिम सावध झाली. इन्स्पेक्टर देशमुखानी अन्वरच्या दिशेने फायरिंग केली. देशमुखाचा नेम अचूक लागला होता. दोन गोळ्या अन्वरच्या मांडीत घुसल्या आणि एक गोळीने अन्वरच्या साथीदाराची पोटरी फाडली. राक्षसी ताकद असलेल्या



अन्वरने जखमी अवस्थेत खिडकिची ग्रील हाताच्या कोपऱ्याने तोडली. जखमी साथीदार सलीमला खिडकीतून बाहेर टाकत स्वतः उडी मारली. आतून फायरिंगचा आवाज बंद झाला म्हणून देशमुख आत शिरले. तुटलेल्या खिडकीतून बाहेर नजर गेली तर जखमी अवस्थेत अन्वर सलीमला खांद्यावर घेवून पळताना दिसला. बाहेर दबा धरून बसलेल्या तीस पोलीसाना गुंगारा देत अन्वर वाडीच्या जंगलात दिसेनासा झाला.

हातात आलेला क्रूरकर्मा एवढ्या सहज निसटल याची देशमुखाना देखील कल्पना नव्हती. अन्वरचा जंगलात शोध घेण जिकरिचे होत. पण इन्स्पेक्टर देशमुख हिम्मत हरणारे नव्हते. पळताना अन्वरचे सांडलेले रक्त त्याच्या पर्यंत घेवून जाईल श्वान पथकाला बोलवा अशा सूचना देशमुखानी दिल्या. तो पर्यंत संपूर्ण दांडवाडी गोळीबाराच्या आवाजानी जागी झाली होती. सांडलेल रक्ताच्या डागाचा मागोवा घेत जात असताना देशमुखाचा चेहरा खुलला. पळताना अन्वरच पिस्तुल पडल होत. त्यामुळे जखमी अन्वर जास्त हुलकावणी देवू शकत नाही याची खात्री पटली. पोलीसाचा जॅकी श्वान वेगाने धावत होता. जॅकीचा भुंकण्याचा आवाज वाढला होता. जखमी अवस्थेत दिड किलोमीटर पळालेला अन्वर आणि सलीम झाडाखाली बसलेले होते. धावत येणार पोलीसांचा श्वान आणि मागून येणारे पोलीसाना पाहून सलीमने



अगोदर हात वर करून शरण येत असल्याची कबुली दिली. पोलीसांच्या रडारवर असलेला अन्वरला

देखील जीव वाचविण्यासाठी पोलिसांना शरण जाण्याशिवाय पर्याय नव्हता. मोस्ट वॉन्टेड अन्वरला

पकडण्यात देशमुख आणि त्यांच्या टीमने जिवाची बाजी लावली होती.



# वर्दीतील पोलीस दादा

*पोलीस खात्यात नोकरी करताना संवेदना हरवून जातात असा समजा आहे. परंतु अंगावर असलेल्या खाकी वर्दीत देखील माणुसकी दडलेली असते याची ही कथा.*

दोन दिवसांपासून सुरू असलेला पाऊस मिनिटभर देखील थांबायचे नाव घेत नव्हता. टेकडीवर वसलेली ठाकुरवाडी कोंबडीनी पिलांना पंखाखाली घेतल्यावर जसा चिवचिवाट बंद व्हावा तशी शांत झालेली. टेकडीखाली ओढ्याला पाणी असल्यामुळे येजा करण्याचा रस्ताच बंद झालेला. ठाकूरवाडी जणू काय या जगापासून आलिप्त झालेली. पावसाळी अंधारलेल्या वातावरणामुळे घड्याळाचे काटे देखील सुस्तावलल्या सारखे पुढे सरकत होते.

महादुने भिंतीवरच्या घड्याळाकडे नजर टाकली सकाळचे दहा वाजत आले होते. महादू त्या भागातलं पोलीस पाटील होता. आज काहीही करून पोलीस चौकी गाठावी लागणार. खुनातला आरोपी रवी पॅरोलवर सुटून वाडीत आलाय. त्याची माहिती



पोलिसांना द्यावी लागणार होती. पण पाऊस थांबायचं नाव घेत नव्हतं. महादूने खिडकी उघडून नजर बाहेर टाकली. तसा पावसाचा सपकारा चेहऱ्यावर बसला. खिडकीची एक झडप अर्धी बंद करत महादू बाहेर न्याहळू लागला. ओढ्याचं पाणी शेतात घुसल होतं. ओढ्याचा पलिकडचा रस्ता देखील रस्ता देखील निर्मनुष्य झालेला. पाऊस थांबला तरच दोन तासात ओढ्याचे पाणी ऊतरंल आणि मग पलीकडे जाता येईल असा विचार करुन महादुने खिडकीची झडप ओढुन घेतली.

क्षणात पुन्हा खिडकीची झडप ऊघडली. टेकडीखाली काहीतरी पाहिल्याचा भास महादूला झाला. महादू कोसळणाऱ्या पावसातून पुन्हा त्याच दिशेला पाहू लागला. एक मानवी आकृती ओढ्याजवळ बसलेली. एवढ्या पावसात कोण असेल? महादूला राहवेना. घराचं दार ऊघडून हातात छत्री सांभाळत महादू अंगणाच्या कोपऱ्यात आला. टेकडीवरून ओढ्याजवळ दिसलेली मानवी आकृती थोडी स्पष्ट दिसू लागली. कोणीतरी स्त्री मुसळधार पावसात ओढ्याजवळ शेतात बांधावर बसलेली होती.

महादू ला राहवेना त्याने पत्नीला आवाज दिला. "लता, ओढ्यापाशी जाऊन येतो. काहीतरी गडबड आहे... "असं म्हणत



महादूची पावलं टेकडीवरच्या निसरड्या वाटेने ओढ्याच्या दिशेने निघाली.

शेतात गुडघाभर चिखल झालेला. महादू कसाबसा वाट काढत बांधाजवळ पोहोचला. बांधावर पावसात भिजत बसलेली स्त्री वाडीतली नव्हती. साधारण पस्तीशीच्या आसपास. लुगडं भिजून अंगाला चिकटलेलं. केस विस्कटलेल. मळकटलेला चेहरा थोडाफार पावसात धुवून गेलेला. नजरेत शून्य भाव, स्त्रीची अवस्था पाहून महादुला वाईट वाटले. छत्री सांभाळत महादू तिच्यासमोर उभा राहिला.

" बाय कुठल्या वाडीतली? वाट चुकलेय का? " महादूच्या प्रश्नामुळे स्त्री एकदम भेदरली.

" घाबरू नकोस मी पोलीस पाटील आहे या वाडीतच राहतो " असं सांगत महादूने तिला धीर दिला. थोडाफार समजल्यासारखं भाव तिच्या चेहऱ्यावर दिसत होतं.

" तुझं नाव काय? "महादुच्या प्रश्नावर काहीतरी आठवण्याचा प्रयत्न करत तिने बोलण्याचा प्रयत्न केला, परंतु तोंडातुन शब्दच फुटेना. कित्येक दिवसापासून ही बाई उपाशी असावी असा विचार महादूच्या मनात आला. घरातून काहीतरी खायला आणून द्याव



म्हणून महादू परत टेकडीच्या दिशेने निघाला. दारात लता उभीच होती. महादूने सगळा प्रकार लताला सांगितला.

"अहो खायला देते पण त्या बापडीला पावसात भिजत ठेवण्यापेक्षा घराकडे घेऊन यायचं गारठून जीव जाईल कि तिचा. " लताच बोलणं खरं होतं... अंगावरचं लुगडं भिजून बिचारी कुडकुडत बसली होती. महादू पुन्हा मागे वळला. यावेळी लतापण बरोबर होती. लताला बघताच माहेरवाशीन भेटल्याची चमक तिच्या डोळयात आली. तिची अवस्था बघून लताला गहिवरून आलं. महादू आणि लताने आधार देत तिला घराच्या पडवीत आणल. लताने ताटात भाकरी आणि भाजी आणून तिच्या पुढ्यात ठेवली. कित्येक दिवसाची उपाशी असल्याने ताटातली भाकरी मिनिटात संपवली.

महादूने लताला खुणेच इशारा केला तशी लता पुन्हा आत गेली. एक आणखी भाकर तिच्या ताटात वाढली. समोर ठेवलेल्या तांब्यातील पाणी अर्धेअधिक अंगावर सांडवत प्यायल्यावर चेहऱ्यावर तरतरी आलेली पाहून लताला समाधान वाटलं. तिच्या बाजूला बसत "नाव काय बाई तुझं? " असा प्रश्न केला.

"सुनंदा " एवढेच शब्द तिच्या तोंडातून बाहेर पडले.



" कुठल्या वाडीतली पत्ता काय" विचारल्यावर सुनंदाचा गोंधळ उडाला. तिला काहीच आठवत नव्हतं.

" अग नंतर विचारपूस कर.. .. अगोदर एखाद जुन लुगडं दे तिला भिजून काय अवस्था झालेय बघ " असं महादूने सांगताच लतानी सुनंदाला आतल्या खोलीत नेलं. सुनंदा तरणीताठी होती. मनावर परिणाम झालेला दिसत होता. त्यातूनच घर सोडलं असावं असा अंदाज महादू मनाशी बांधत होता. तसं असेल तर पोलिसांना माहिती द्यावी म्हणजे तिच्या घरातल्या मंडळीचा पोलीस शोध घेतील या विचारांनी महादूने पोलीस ठाण्यात फोन लावला.

ठाणे अंमलदार कदम याने फोन उचलला. पोलीस पाटलांचा आवाज कदमनी ओळखला. " बोला पाटील.. .. काय खबर? "असं कदमने विचारल्यावर महादूने सुनंदाची हकीगत सांगितली.

"अहो डोक्याला ताप करताय.. अगोदरच काय कमी भानगडी आहेत काय? आली तशी जाईल आपल्या वाटेने. " हवालदार कदमचे उत्तर एकूण महादूच्या हिरमोड झाला. सुनंदा एकटी कुठे जाईल. शिवाय तरणीताठी असल्यामुळे काय वाईट प्रकार घडला तर या विचाराने महादूला काहीच सुचेना.

तीन दिवस उलटून गेले होते. पावसाने उघडीप दिली होती आणि तीन दिवसात पाहुणचार घेऊन सुनंदा बरीच सावरली होती.



सुनंदा पूर्ण नाव सांगत होती. रागाच्या भरात घर सोडून आलो. एवढच सांगत होती. पण कधीही चार भिंती बाहेर न पडलेल्या सुनंदाला गावाच नावाच आठवत नव्हतं. फक्त नावावरून सुनंदाची नातेवाईक कसे शोधायचे असा विचार करत महादू पडवीत बसला होता. तेवढ्यात समोरून येणाऱ्या हवालदार महेश करमरकरना पाहून झटकन ऊठला. साहेब बरं झालं आलात असे म्हणत खुर्ची पुढे सरकवत करमरकरना खुर्ची बसायला दिली. पाटील वाडीतल्या बाबूच वॉरंट घेऊन आलोय घरी आहे का? असा प्रश्न हवालदार करमरकरना विचारला.

"साहेब पाऊस होता तर दोन दिवस बाबू घरीच होता. पण आता हुडकायला लागलं ".

"पोलीस पाटील म्हणून तुम्ही मदत करा "

करमरकरनी महादूला सांगितले. साहेब मदत करतो पण मलापण एक मदत करा असे म्हणत महादूने सुनंदा ची सर्व हकीगत हवालदार करमरकरना ऐकवली. पोलीस चौकीत फोन केल्यावर कदमने दिलेले उत्तर देखील सांगितले.

महादुची वाडी करमरकरांच्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत नव्हती. आरोपी बाबू ला केवळ वॉरंट बजावण्याकरिता ते आले होते. महादूचं आणि करमरकरांच बोलणं सुरु असताना लता



सुनंदाला घेऊन बाहेर आली. पोलीस पाटील महादू सांगत होता ते खरं होतं. माणुसकी दाखवत जर महादूचं कुटुंबे एवढी मदत करत असेल तर आपलं देखील कर्तव्य आहे या भावनेने करमरकरानी मदत करण्याची तयारी दाखवली.

पोलीस खात्यातील अनुभवाच्या जोरावर करमरकरानी सुनंदा बोलत करण्याचा प्रयत्न केला. सुनंदाला एकेक गावाची नाव सांगत असताना नागोठणे ऐकताच तिचा चेहरा फुलला. सुनंदाच गाव तरी कळलं होतं. नागोठणे ठाकुरवाडीपासून साठ किलोमीटर एवढ्या दूर सुनंदा आली कशी या विचाराने लता आणि महादू एकमेकाकडे पाहू लागले. आता प्रश्न होता फक्त तिच्या नातेवाईकांचा शोध लावण्याचा. हवालदार करमरकरानी नागोठणे पोलीस ठाण्यात फोन लावला. सुनंदाच पूर्ण नाव सांगत मिसिंग दाखल आहे का याची विचारणा केली. परंतु या नावानी कुठलीच मिसिंग नसल्याचे उत्तर पलीकडून मिळाले. नाव, आडनाव आणि गाव यापलीकडे सुनंदा काहीच आठवत नव्हते. तिची मानसिक स्थिती बिघडलेली त्यामुळे तिच्या नातेवाईकांपर्यंत पोहोचणे अवघड होतं.

" सुनंदाला तिच्या घरी पोहोचतं करू " असं आश्वासन देऊन हवालदार करमरकर ठाकुरवाडीतुन निघाले खरे परंतु सुनंदाला



तिच्या घरी कसे सोडता येईल याच विचारचक्र त्यांच्या डोक्यात सुरू होतं. अचानक त्यांना नागोठण्याचा त्यांचा मित्र प्रभाकरची आठवण झाली. काही वर्षापूर्वी कोर्टात ओळख झालेली. प्रभाकर त्या भागातील एका पक्षाचा कार्यकर्ता होता. भानगडीच्या केसमध्ये कोर्टाच्या फेऱ्या सुरू होत्या. प्रभाकर मदत करू शकेल या विचाराने करमरकरानी प्रभाकरला फोन लावला. सुनंदा विषयी त्यांना सांगितली.

एवढ्या मोठ्या नागोठाण्यात सुनंदाचे नातेवाईकचा शोध घेण म्हणजे दिव्यच होतं. परंतु हवालदार करमरकरासाठी प्रभाकर कामाला लागला. प्रभाकर त्या भागातला राजकीय नेता असल्यामुळे ओळखी होत्या. दोनच दिवसात सुनंदा च्या घराचा पत्ता मिळाला. प्रभाकरने हवालदार करमरकरांना फोन केला.

" साहेब सुनंदाचा पत्ता मिळालाय. वर्षभरापासून घर सोडून गेली आहे. घरात नवऱ्याबरोबर भांडण करून बाहेर पडली होती. पाच मुलं आहेत सुनंदाला. ती गेल्यानंतर दारुडा नवरा पण गेलाय घर सोडून. बिचारी लहान पोरं आई-बाप असून अनाथ झालीत".

प्रभाकरच बोलन ऐकून हवालदार करमरकरना वाईट वाटलं. करमरकरानी पोलीस पाटील महादूला फोन करून सुनंदाची हकिगत सांगितली.



"पाटील, आता जबाबदारी वाढली. सुनंदाला कोणी नातेवाईक नाही. लहान पोरच आहेत. तिला घरी सोडण्याची जबाबदारी आपली आहे. " हवालदारच बोलण सुरू असताना लता देखील बाजूला होती.

" वर्षभर सुनंदा भटकतेय. नशीब काही बरं वाईट झालं नाही. देवानेच आपल्याकडे धाडली सुनंदाला" असे लताला बोलली. लताने पिशवीत दोन नवी लुगडी आणि एका पिशवित खाण्याच्या वस्तू भरून महादूच्या हातात दिल्या.

ओढा ओलांडून महादू सुनंदाला घेऊन रस्त्यावर आला. महादुला नागोठण्याला कस जायचं माहिती नव्हतं. हवालदार करमरकर स्वतः आलेलं. पुढच्या स्टापवरून एसटी पकडली. सुनंदाला मागच्या सीटवर बसवली. महादू शेजारी बसला होता. नादात सुनंदा पटकन एसटीतून उतरेल या विचारानी करमरकर देखील लक्ष ठेवून होते. एसटी पेण पर्यंतच होती. पुढे दुसरी पकडून नागोठणे गाठावे लागणार होते. ओळखीचा परिसर दिसतात एसटीच्या खिडकीतून सुनंदाची नजर भिरभरू लागली. वेगळाच आनंद सुनंदाच्या चेहऱ्यावर दिसत होता.

एसटी नागोठण्याला पोहचली. प्रभाकर खाली वाट पाहत होता. हवालदार करमरकर, महादूच्या पाठोपाठ सुनंदा खाली



उतरली. प्रभाकरच्या गाडीत बसून सर्वजण निघाले. मुख्य रस्त्यावरून गाडी कच्च्या रस्त्याला लागली. कच्ची वाट सुनंदाला ओळखीची वाटू लागल्यावर पोरांच्या आठवणीने तिचा कंठ दाटला. नामू, पऱ्या पटापट मुलांची नावे घेऊन सुनंदाला रडू कोसळले. प्रभाकरने गाडी मोहाची वाडी समोर थांबवली. तशी सुनंदाने वाऱ्याच्या वेगाने गाडीतून उतरत समोरच्या कुडाच्या घरात शिरली. आई शिवाय पोरकी झालेली पोरं सुनंदाला बिलगली.

हलवालदार करमरकराकडे पाहत " साहेब तुमच्यामुळे आज ताटातूट झालेली माय लेकरं भेटली " असं म्हणताना महादूच्या डोळ्यात तरळले. पोलीस खात्यातील ड्यूटी च्या पलीकडे जात महेश करमरकर करमरकरनी वर्षभरापासून ताटातूट झालेल्या मायलेकरांची भेट घडवून आणली होती.



# सापळा

सिपरान कारखान्यातील सर्व प्लॉन्ट सुपरवायझरची तातडीची बैठक मॅनेजर शेवतेनी बोलावली होती. सिपरान औषध उत्पादनात अग्रगण्य कारखाना होता. एवढी तातडीची मिटींग कशाला बोलवली असेल याचा विचार करत सर्व जण मिटींग हॉल मध्ये जमा झाले. शेवते साहेब येताच सर्वजण उठून उभे राहिले. साहेबांचा नेहमीचा प्रफुल्लित चेहरा गंभीर दिसत होता. हाताने सर्वांना बसण्याचा इशारा करत शेवते त्यांच्या खुर्चीत बसले. डायरेक्ट विषयाला हात घालत शेवतेनी बोलायला सुरुवात केली. गेल्या सहा महिन्यापासून कारखान्यात येणारा कच्चामाल आणि त्यापासून तयार होणारी औषधी पावडर याचा ताळमेळ बसत नाही. लाखो रुपये किमतीची पावडर घट येत असल्यामुळे कारखाना तोट्यात जात होता. नक्की काय कारण आहे याचा तपास लागावा म्हणून आजची मिटिंग बोलावली असल्याचे शेवते साहेबांनी सांगताच सर्वजण एकमेकाकडे पाहू लागले.

सर्वात सिनियर सुपरवायझर खेडेकरांनी बोलायला सुरुवात केली. साहेब बॅच रेकॉर्ड प्रमाणे कच्चामाल आणि उत्पादित माल



यामध्ये तफावत नाही. गेल्या सहा महिन्यात तर एकही बॅच फेल गेली नाही. त्यामुळे नेमकी घट कुठे येत आहे याचा शोध लावला पाहिजे. खेडेकरांच्या बोलण्याला इतर सुपरवायझरनी मान डोलावून सहमती दर्शवली. ठीक आहे सर्व बॅच रेकॉर्ड पाठवा असे सांगत मॅनेजर शेवतेनी मिटिंग आटोपती घेतली. सर्वजण प्लांटमध्ये जाण्यास निघाले. खेडेकर मात्र तिथेच घुटमळत उभे राहिले. काही बोलायच का? शेवते साहेबांनी विचारताच खेडेकर पुढे झाले. साहेब एक शंका आहे मनात. महागडी औषधी पावडरची चोरी तर होत नसेल. खेडेकरांच्या बोलण्याने शेवते चमकले. पण काही झाले तरी खेडेकर अनुभवी होते. त्यामुळे त्यांचे बोलणे गांभीर्याचे होते. तुमच्या बोलण्यात तथ्य असू शकत प्रकरण वेगळ्या पद्धतीने हाताळावे लागेल सांगताच खेडेकर निघाले मात्र मॅनेजर शेवते शून्यात नजर लावून बराच वेळ विचार करत बसले.

कामगारांची बारा ते साडेबारा जेवणाची वेळ. त्या दरम्यान कॅन्टीनमध्ये पाय ठेवण्यास जागा नसायची. त्यानंतर मात्र दिवसभर कॅन्टीन रिकामी असायची. मग कॅन्टीन वर राज्य असायचं कंत्राटी कामगारांच. सफाई कामगार, माळी काम करणारे सर्व एकत्र जमले की गप्पांचा फड रंगायचा. त्यातच आठवड्यापासून सफाई कामगार म्हणून कामाला लागलेले जयराम मोठा अवलिया होता. नकलाकार, बोल बच्चन बारा गावचं पाणी प्यायलेला जयरामचा



सर्वांना लळा लागला होता. जयराम बोलू लागला की त्याचा एक सोन्याचा दात चमकायचा. दारू पितो, जुगार खेळतो म्हणून बापाने घराबाहेर काढलं अस जयरामने सांगितलं होत. पण लवकर श्रीमंत होऊन दाखविन अशी बढाई मित्रांमध्ये मारायचा. एके दिवशी जेवणानंतर जयराम च्या सोबतीला सफाई कामगार असलेले सुनिल, संदिप आणि विशालने त्याला कारखान्याच्या मागच्या बाजूला नेले. झटपट श्रीमंत व्हायचय ना अस म्हणत सुनिलने पॅन्टच्या खिशात हात घालत छोटी पिशवी काढली. कसलीतरी पांढऱ्या रंगाची पावडर पिशवीत होती. संदीप आणि विशालने देखील तशीच पुढे काढून कारखान्याच्या कंपाऊंडला लागून असलेल्या सांडपाणी वाहून नेणाऱ्या गटारात टाकल्या. जयराम सुट्टी झाली का कारखान्याच्या मागे जावून पावडरची पुडी काढायची. एका पुडीचे पाच हजार मिळणार सुनिलने सांगितले. पाच हजार आकडा एकताच जयराम शॉक झाला. अरे सगळी सेटिंग आहे. मुंबईचे पार्टी येते माल न्यायला सांगत सुनिलने जयराम ला सामील व्हायची ऑफर दिली. पैसा कमविण्याचा झटपट मार्ग पाहून जयराम गोंधळला.

त्याच रात्री सुनिल, संदिप आणि विशालला सीआयडी च्या पथकाने उचलले. पोलीस ठाण्यात बाकड्यावर बसलेले तिघेजण आपण काही केलं नसताना पोलिसांनी का पकडले या गुर्मीत बसले



होते. सीआयडी इन्स्पेक्टर दिवेकरानी तिघांवर नजर टाकली. किती माल विकलात आतापर्यंत? या प्रश्नांनी तिघे गोंधळले. साहेब कसला माल? आमचा काही संबंध नाही. तिघांनी एका सुरात उत्तर दिले. ठीक आहे खरं खोटं कळेल असं म्हणत दिवेकरानी सब इन्स्पेक्टर काशिदला बोलवा असा निरोप पाठविला. काही मिनिटात एक कडक सॅल्यूट ठोकत काशिद दिवेकर साहेबासमोर ऊभा राहिला. काशिदला पाहताच सुनिल, संदीप व विशाल जागचे ऊडाले. सफाई कामगार म्हणून सोबत काम करणारा जयराम सब इन्स्पेक्टर. आपण एखादी फिल्म पाहतोय अस तिघांना वाटल. आता तरी खरं बोलला ना? दिवेकर साहेबांच्या वाक्याने तिघे भानावर आले. साहेब सफाईच्या बहाण्याने पॅकिंगला आलेली पावडर काढायचो. एजंट मार्फत विकायचो अशी कबुली तिघांनी दिली. दिवेकर साहेबानी मॅनेजर शेवतेना फोन करून तुमचे गुन्हेगार सापडलेत अशी माहिती दिली. खेडेकरानी व्यक्त केलेल्या संशयावरून शेवतेनी सीआयडीत तक्रार देवून सापळा रचला होता. काशिद इन्स्पेक्टरने जयराम बनून हातात झाडू घेत चोख कामगिरी बजावत मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश केला होता.



# नराधम

सूर्य मावळतीला गेला होता. जेमतेम पन्नास घरांची वस्ती असलेल्या वाल्मिक वाडीत बायांची स्वयंपाकाची लगबग सुरू होती. तर पुरुष मंडळी दिवसभराची काम आटापून ओसरीवर गप्पा मारण्यात रमलेली. चुलीवर तापलेल्या तव्यात भाकरी टाकताना दोनदा लक्ष्मीच्या हाताला चटका बसला. भाकरी टाकताना लक्ष्मीच सर्व चित्त दाराकडे लागल होतं. संध्याकाळ झाली तरी कॉलेजला गेलेली पोर संगीता घरी आली नव्हती. एवढा उशीर कधी व्हायचा नाही. एव्हाना संगीता यायला पाहिजे होती. मनात चाललेली घालमेल थांबायच नाव घेत नाही म्हटल्यावर लक्ष्मी चुलीसमोरून उठली. भाकरीची टोपली बाजूला सारत ओसरीवर आली. अहो ऐकलत का? संगीता अजून आली नाही. तुम्हाला काय काळजी वाटते की नाही पोरीची अस म्हणत विडी ओडताना गुंग झालेल्या बजरंगला तिने आवाज दिला. बायकोचा चिंताग्रस्त चेहरा पाहून अग मैत्रिणीकडे थांबली असेल येईल. उगाच काळजी करू नकोस असे सांगत बजरंगने लक्ष्मीची समजूत काढली. तशी लक्ष्मी पुन्हा चुलीसमोर येऊन बसली. नवसाने झालेली पोर.



समाजात वयात आलेली पोर शिकवण्याच्या भानगडीत न पडता लग्न लावून देण्याची रित. परंतु संगीता दहावीला चांगले मार्क मिळून पास झाल्यावर लक्ष्मीने नवऱ्याकडे हट्ट धरला. काय बी झालं तरी पोरीला कालेजात पाठवायचं. परिस्थिती गरिबीची असताना देखील बजरंगचे लक्ष्मीच्या हट्टापुढे काय चालेना. संगीताने शिकून सरकारी अधिकारी व्हाव अस स्वप्न लक्ष्मी पाहत होती. आठ वाजले बजरंगचा आवाज कानी पडताच लक्ष्मीची तंद्री भंगली. रात्रीचे आठ वाजेपर्यंत संगीता कधी घराबाहेर राहिली नव्हती. त्यामुळे बजरंगला सुद्धा काळजी वाटू लागली. संगीताच्या मैत्रिणीच्या घरी जाऊन येतो सांगून हातात टॉर्च आणि पायात चप्पल सरकवत घाईने बजरंग निघाला. वाडीपासून रोज अर्धा तास पायपीट करत चौक येथून एसटीने खोपोली कॉलेजला संगीता जात असे. वाडीतली एकही मैत्रीण कॉलेजला नसल्यामुळे चौक गावातील मैत्रिणीजवळ संगीता थांबली असावी असा विचार करत बजरंग चौक गावात पोहोचला. तीन-चार मैत्रिणीकडे चौकशी केल्यानंतर काका संगीता चार वाजता आमच्या बरोबर कॉलेजमधून आली. आम्ही एकत्रच होतो. एसटीतून उतरल्यावर संगीताने सरळ घरचा रस्ता पकडला असे उत्तर सर्वच मैत्रिणीने दिल्यावर बजरंगची चिंता आणखी वाढली. उशिरा घरी केली असेल या भाबड्या आशेने बजरंगने परत वाडीची वाट पकडली.



मनात देवाचा धावा करत दारात उभी असलेली लक्ष्मी बजरंगला एकटाच येताना पाहून झटकन पुढे सरसावली. संगीता कुठाय? कुठे गेली पोर अशा प्रश्नांचा भडीमार तिने बजरंग वर केला. गांगरलेल्या बजरंगला काय सुचेनासे झाले. मैत्रिणीकडे चौकशी केली. संगीता चार वाजता घरी निघाली असे मैत्रिणी सांगतात. एवढा वेळ संयमाचा बांध ठेवलेल्या लक्ष्मीच्या डोळ्यातून अश्रूच्या धारा लागल्या. पोलिसात जाऊ या. पोलीस शोध लावतील पोरीचा. लक्ष्मीचा सल्ला बजरंगला पटला.

एसटीचा पाससाठी संगीताने काढलेला फोटो घेऊन दोघांनी चौक पोलिस ठाणे गाठले. तो पर्यंत रात्रीचे दहा वाजत आलेले. ठाणे अंमलदार कुंभार खुर्चीत रेलून बसलेले. हवालदार कुंभारने दोघांना समोरच्या वर बाकड्यावर बसायला सांगितले. संगीता हरविल्याची तक्रार लिहून घेत फोटोवर नजर टाकत पोरीच कुठ प्रेमबिम होत का ? असा सवाल कुंभारने विचारला. साहेब माझी पोर साधी हाय... घर आणि कॉलेज शिवाय काय बी माहित नाही तिला असं रडवेल्या आवाजात लक्ष्मीने सांगितले. तक्रार लिहून घेतलेय काय तपास लागला का तुम्हाला कळवतो असे सांगत हवालदार कुंभारने दोघाना घरी जाण्यास सांगितले. आख्खी रात्र बजरंग आणि लक्ष्मीने जागून काढली. पहाटेच कोंबड आरवताच बजरंग संगीताला शोधायला बाहेर पडला. हवालदार कुंभारने



मिसिंग दाखल झाल्याचे इन्स्पेक्टर देशमुखांना सांगितल्यावर सर्व पोलीस ठाण्यात फोटो माहिती पाठवा आणि खबऱ्यामार्फत चौकशी करा अशा सूचना देशमुख साहेबांनी दिल्या. एव्हाना वाडीत संगीता हरवल्याची बातमी पसरली. वाडीतल्या बायका जमा होऊन लक्ष्मीला धीर देवू लागल्या. दरम्यान आठवडा उलटला तरी संगीताचा काहीच तपास लागत नव्हता. संगीता चांगल्या चालीरितीची होती अशी माहिती खबऱ्याने हवालदार कुंभारला दिली होती. त्यामुळे आता तपासाचा रोख बदलावा लागणार असा विचार कुंभार करत होते. संगीताच्या आईने अन्नपाणी सोडले होते. बाराव्या दिवशी खबऱ्याने महत्त्वाची माहिती हवालदार कुंभारना फोनवरून दिली. सांगिताला वाडीतील जन्या उर्फ जनार्दनच्या मोटरसायकलवरून जाताना एकाने पाहिले होते. त्या दिवसापासून संगीता गायब होती. त्यामुळे जन्याकडून सर्व उलगडा होणार होता. जन्या वाघमारेला चौकमधील देशी बारमधून उचलून पोलीस ठाण्यात आणले. संगीता कुठाय? असा प्रश्न हवालदार कुंभार यांनी विचारल्यावर आपण त्या गावचे नाहीत असे दाखविण्याचा जन्या भासवू लागला. पाणी कुठेतरी मुरतय याची जाणीव कुंभारला झाली. पोलिसी हिसका दाखवताच वळणावर आलेला जन्या पोपटासारखा घडाघडा बोलू लागला. साहेब बरेच दिवस माझी संगीतावर नजर होती. पण हाताला लागत



नव्हती. त्या दिवशी रस्त्याने एकटीच घरी चाललेली. मी मोटरसायकलवरून घरी सोडतो असे सांगितले तरी गाडीवर बसायला तयार नव्हती. तुझ्या भावासारखा आहे बस अस बोलल्यावर कशीबशी मोटरसायकलवर संगीता बसली. रस्त्याला कोणी नाही पाहून मी आडवाटेला गाडी घातली. संगीताने घाबरून गाडीवरून उडी मारली. मी तिला पाठलाग करून पकडले. शरीर संबंधाची मागणी केल्यावर संगीताने मला शिव्या देत तिच्या बापाला सर्व प्रकार सांगण्याची धमकी दिली असे सांगताना जन्या थांबला. हरामखोरा पोरीच काय केलस? कुंभार हवालदाराने विचारल्यावर साहेब वाडीत माझ बिंग फुटणार, माझ्या बायकोला कळणार या भीतीने संगीताला खाली पाडून तिच्या डोक्यात दगड घालून ठार मारल. समोर बसलेल्या नराधम खुनाची कबुली देत होता हे ऐकून क्षणभर संगीताच्या आई-वडिलांचा पोरीसाठी तळमळत असलेला चेहरा कुंभार हवालदाराच्या डोळ्यासमोर आला. संगीताच्या प्रेताची विल्हेवाट कशी लावलीस असा सवाल जन्याला केल्यावर माळरानात झुडपात मृतदेह लपवून ठेवल्याची माहिती पोलिसांना दिली. जन्याला घेऊन पोलीस घटनास्थळी पोहचले. झुडपातून सडलेला संगीताचा मृतदेह पोलिसांनी ताब्यात घेवून शवविच्छेदनासाठी पाठविला. संगीताचा खून झाल्याची बातमी वाडीत पसरली. लक्ष्मी आणि बजरंगला पोलीस ठाण्यात



बोलावून घेतले. पायातली सॅंडल, कॉलेजची सॅक या वस्तू समोर दाखवताच लक्ष्मीने हंबरडा फोडला. वासना शमविण्यासाठी उमलत्या कळीला कुस्करताना तिच्या आई-वडिलांच्या स्वप्नांचा चुराडा देखील जन्यासारख्या नराधमाने केला होता.



# बनाव

साहेब मुख्यालयातून महत्वाच्या वायरलेस आहे एसपी साहेब आहेत. वेळे मॅडमनी निरोप देताच जगताप साहेब लगोलग उठले. पलीकडे एसपी म्हटल्यावर काहीतरी गडबड झाली हे जगताप यांनी ओळखले. जय हिंद सर पोलीस निरीक्षक विजय जगताप खालापूर पोलीस ठाणे. जगताप तातडीचा मेसेज आलाय, मुंबई पुणे हायवेवरून एसटीतून दोन अतिरेकी पुण्याच्या दिशेने निघालेत. मुंबई सोलापूर एसटीत दोघे जण असून त्यांच्याकडे शस्त्र आहेत. एसटीत चाळीस प्रवासी असून पाच मिनिटापूर्वी पनवेल बस स्थानकातून एसटी निघालेय. खालापूर फाट्यावर नाकाबंदी करा. प्रवाशांच्या जीवीताशी खेळ नको. अतिरिक्त कुमक घेऊन जा असा आदेश एसपीनी दिला. वायरलेस कट झाला. बिनतारी संदेश यंत्रणा रूममध्ये क्षणभर शांतता पसरली. वीस-पंचवीस मिनिटात एसटी खालापूर फाट्यावर येईल. वेळ न दवडता हालचाल करणे गरजेचे आहे ओळखून जगताप साहेबाना भराभर कर्मचाऱ्याना सज्ज राहण्यास सांगितले. कमरेच रिव्हाल्वर काढून बुलेट भरल्या. शस्त्रागारात धूळ खात पडलेल्या बंदुका पटापट बाहेर आल्या. वीस



जणांचा फौजफाटा घेऊन जगताप साहेबांनी खालापूर फाटा गाठला. प्रवाशांच्या जिविताला धोका नको अशा स्पष्ट सूचना मिळाल्या होत्या. त्यामुळे पोलीसांना पाहून एसटीतील अतिरेकी प्रवाशांना वेठीस धरण्याचा शक्यता होती. पोलिस ठाण्यातून निघतानाच जगताप साहेबांच्या डोक्यात कल्पना आली होती. हवालदार सदा लांगेला एसटी कर्मचाऱ्याचा गणवेश आणि हाती एसटी कर्मचाऱ्याची हिरवी नेहमीची बॅग घेऊन हायवेवर ऊभा करायचा. एसटी महामंडळाच्या कर्मचारी म्हटल्यावर एसटी थांबणारच. त्यामुळे एसटीतील प्रवाशांना देखील शंका येणार नव्हती. ठरल्याप्रमाणे पोलीस दबा धरून बसले. लांगे हवालदार हातात हिरवी बॅग घेऊन हायवेवर उभा होता. पंधरा मिनिटे झाली होती. त्या दरम्यान पुण्याकडे जाणाऱ्या पाच जलद गाड्या लांगेनी दाखवलेल्या बॅग पाहून एसटीचा कर्मचारी समजून थांबल्या होत्या. सोलापूर गाडीची वाट बघतोय असे सांगितल्यावर पाठीमागे आहे पाच मिनिटात येईल असे उत्तर एसटी ड्रायव्हर कडून मिळत होते. लांबून येणारी एसटी दिसताच लांगेनी पुन्हा बॅग उंचावली. एसटी जवळ येताच मुंबई सोलापूर पाटी स्पष्ट दिसू लागली. एसटी जवळ येऊन थांबली दरवाजा उघडला गेला. त्याबरोबर लांगेनी इशारा करताच जगताप साहेब हातात रिव्हाल्वर ताणून लांगेच्या पाठोपाठ एसटीत चढले. बाकी पोलीसांनी एसटीला गराडा घातला.



जागेवरून कोणी हलू नका नाहीतर गोळी घालीन जगताप आणि पोलिसांनी पोझिशन घेतली. एसटीत एकच गोंधळ सुरू झाला. परंतु समोर पोलीस हातात रिव्हाल्वर देऊन म्हटल्यावर कोणीच जागचे हलेना. लांगेनी एसटी ड्रायव्हरला इशारा करत गाडी पोलीस ठाण्यात घेऊन चल असे सांगितले. नक्की काय चाललेय कोणालाच कळत नव्हते. कंडक्टर सुद्धा भांबावला. एसटीतील प्रत्येक चेहरा जगताप साहेब निरखत होते. संशयास्पद हालचाल दिसल्यास सरळ ट्रीगर दाबणार होते. परंतु पोलिस ठाण्यात येईपर्यंत ती वेळ आली नाही. चाळीस प्रवाशांमध्ये दहा ते बारा महिला बाकी पुरुष मंडळी होती. सामानाला हात न लावता एकेकाने खाली उतरा असा संदेश जगताप साहेबाने सोडला. एसटीच्या दरवाजात प्रत्येकाची झडती सुरू झाली. दोन पोलिसांनी एसटीतील प्रवाशांच्या सामानाची झडती घेण्यास सुरुवात केली. साहेब काय प्रकार आहे ? काय घडलय? कंडक्टर आणि ड्रायव्हरने एका सुरात विचारताच एसटीत अतिरेकी असल्याची पक्की खबर मिळालेय असे जगताप साहेबांनी सांगताच दोघांच्या पायाखालची वाळूच सरकली. एव्हाना सर्व प्रवाशांची व सामानाची तपासणी पूर्ण झाली होती. परंतु काहीच आक्षेपार्ह हाती लागले नव्हते. जगताप यांनी एसपीना माहिती दिली. कोणतीही जोखीम पत्करू नका. एसटीतून प्रवास करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यानी खबर दिलेय अशी माहिती



एसपीनी जगतापना दिली. साहेबांची आज्ञा प्रमाण मानून प्रत्येक प्रवाशांची चौकशीला सुरुवात झाली. तेवढ्यात पनवेल पोलीस ठाण्याची जीप खालापूर पोलीस ठाण्याच्या आवारात शिरली. जीपमधून पनवेलचे पोलीस निरीक्षक घाडगे सोबत चार पोलीस व एक इसम उतरला. घाडगेनी जगताप साहेबांजवळ जात सोबतच इसमाची ओळख करून दिली. हे सोलापूर पोलीस ठाण्याचे हवालदार अशोक लोखंडे. यांनीच एसटीत अतिरेकी असल्याची माहिती दिली. जगताप साहेबांनी लोखंडे वर नजर टाकत नीट न्याहळले. लालसर तारवटलेले डोळे, कमरेला खाजगी पॅन्टवर लावलेला पोलीसी पट्टा दिसत होता. त्याची अवस्था पाहून एक तर लोखंडेचे झोप झाली नसावी किंवा याला जास्त झाली असावी असा अंदाज जगताप साहेबांनी बांधला. लोखंडेला घेऊन पुन्हा प्रवाशांची ओळख परेड करावी असे ठरले. यामध्ये कोणी नाही बहुतेक मध्येच उतरले असावेत असे लोखंडे सांगू लागला. कंडक्टरने लोखंडेकडे पाहुन हा प्रवाशी एसटीत होता

मधेच गायब झाला अशी कुजबुज ड्रायव्हर जवळ केली. परंतु पनवेल पासून कोणीच प्रवाशी एसटीत चढला अगर उतरला नाही अशी माहिती



कंडक्टरने जगताप साहेबांना दिली. कुठेतरी पाणी मुरतंय. लोखंडे खोट बोलतोय हे जगताप साहेबांनी जाणल. परंतु सत्य बाहेर येणे आवश्यक होत. पोलीसांची दिशाभूल केल्याचा गुन्हा दाखल करा लोखंडेवर अशी ऑर्डर जगताप यांनी लांगेला दिली. गुन्हा दाखल झाला तर पोलीस खात्याची नोकरी गमवावी लागणार. त्यामुळे लोखंडे गळपटला. हात जोडतो साहेब गुन्हा दाखल करू नका. खरं सांगतो अशी विनवणी लोखंडे करू लागला. साहेब मुंबईतून सोलापूर एसटी पकडली. सोलापूरपर्यंत तिकीट काढलेल. पनवेला एसटी थांबल्यावर टॉयलेटला गेलो. जवळ देशी बार पाहून उभ्या उभ्या क्वार्टर मारली. येऊन पाहतो तर एसटी जागेवर नाही. माझी सणकली. कंडक्टर, ड्रायव्हरचा राग आला. त्यांची जिरवावी म्हणून एसटीत अतिरेकी असल्याचा बनाव रचला. बसस्थानकातील पोलिसाला माझ ओळखपत्र दाखविल्यावर त्याचा देखील माझा बोलण्यावर विश्वास बसला आणि सर्व रामायण घडल. हे ऐकून जगताप साहेबांनी कपाळावर हात मारून घेतला. एसटी जावू दे. लोखंडेला स्पेशल गाडीने सोलापूरला सोडू असे जगताप साहेबानी सांगताच एकच हास्यकल्लोळ उडाला आणि एवढा वेळ तंग असलेल वातावरण निवळले.



# संशयाचे भूत

वाचवा... माझ्या टिनाला वाचवा कोणीतरी वाचवा... रात्रीचे साडेअकरा वाजत आलेले. तांबट आळी केव्हा झोपेच्या आधीन झालेली आणि त्या दरम्यान जयंतानी मदतीसाठी फोडलेली किंकाळी ऐकून सर्वांची झोपमोड झाली. काही मिनिटातच सर्व तांबट आळी जागी झाली. चोर शिरले असावेत समजून आळीतल्या चार पाच तरुणांनी हातात मिळेल ते काठी, टिपरा घेऊन आवाजाच्या दिशेने धाव घेतली. आवाज जयंताच्या घरातून येत होता. तसा सर्वांनी मोर्चा जयंताच्या घराकडे वळवला. दार सताड उघड होत आणि आतून जयंताच्या ओरडण्याचा आवाज येत होता. आळीतले तरुण जयंताच्या घरात शिरले. समोरच दृश्य पाहून सर्वांचीच पाचावर बसली. जयंताची बायको टिना संपूर्ण पेटली होती. जयंता हातातली घोंगडीने तिला विझवण्याच्या प्रयत्न करत होता. परंतु आग आटोक्यात येत नव्हती. काही तरुणानी लगेच पुढे सरसावत घरातील पाण्याचा हंडा टिनाच्या अंगावर ओतला. बाजूच्या घरातून पटापट पाण्याच्या घागरी आणून ओतल्यावर आग आटोक्यात आली. परंतु टिना प्रचंड भाजली



होती. गाडी काढा हॉस्पिटलला न्यायला लागेल सदूमामाने पुढे सरसावत आळीतल्या तरुणांना सांगितले. तोपर्यंत संपूर्ण आळी जागी झाली होती. आळीतल्या चार-पाच महिलाच पुढे आल्या. जळलेली साडी टीनाच्या संपूर्ण शरिराला चिकटली होती. कपडा ओढून काढू नका... जखम जास्त खोल होईल असा सल्ला सदूमामाने दिला. कुणीतरी गर्दीतून ओढणी आणून दिल्यानंतर टिनाच्या भाजलेल शरीर ओढणीने झाकले. टिनाची तडफड सुरू होती. संपूर्ण शरीर भाजलेले तरी चेहरा सुरक्षित होता. तिच्या डोळ्यातून वेदना प्रकट होत्या. जयंताचे हात सुद्धा टिनाला विझवताना भाजलेले. स्टोव्हचा भडका उडाला आणि त्यात टिनाच्या साडीने पेट घेतला असे जयंता शेजाऱ्यापाजऱ्यांना सांगत होता. आईला भाजलेली पाहून टीनाच्या दोन लहान मुली सारख्या रडत होत्या. तोपर्यंत गाडी आली. कशीबशी टिनाला उचलून गाडीत ठेवली आणि गाडी हॉस्पिटलच्या दिशेने निघाली. एवढ्या रात्री टिना काय करीत होती स्टोव्हवर... नक्कीच काहीतरी वेगळा प्रकार आहे अशी चर्चा एव्हाना आळीत रंगू लागली. टिनाच्या लहान मुलीना शेजारच्या मोरे काकू सोबत घेऊन गेल्या. दोघी मुली सर्व प्रकाराने भेदरल्या. जयंता आणि टीनाचा चौदा वर्षांपूर्वी प्रेमविवाह झालेला. टिना दिसायला खूपच सुंदर होती तर जयंता तिच्यापुढे गडी वाटत होता. टिनाच्या सौंदर्याला एक पडती बाजू



होती. टीना जन्मत :च मुकी होती. पण प्रेम आंधळ असत. टिनाच्या सौंदर्यावर भाळून जयंताने लग्न केल होतं. दोघांचा संसार सुखाने चालला होता. दोन गोंडस मुली देखील झाल्या होत्या. परंतु काही महिन्यापासून जयंतीचे वाढलेली दारूचे व्यसन आणि रात्री-अपरात्री येवून टिनाला मारझोड, शिव्या देण्याचे प्रकार सुरू झाले होते.

टिनाच्या भाजण्यामागे काहीतरी काळबेर आहे याचा संशय आळीतील प्रत्येक जण व्यक्त करीत होता. पहाटेचे पाच वाजत आलेले संपूर्ण तांबट आळी जागी होती. त्याच वेळी सदूमामा आले तेच टिनाच्या मृत्यूची बातमी घेवून. दोन सोन्यासारख्या मुली आणि संसार अर्धवट सोडून गेल्यामुळे सर्वजण हळहळत होते. डॉक्टर आणि पोलिस ठाण्यात फोन करून माहिती दिली होती. ठाणे अंमलदार सुभाष पाटील यांनी हॉस्पिटलमध्ये येवून पंचनामा करण्यास सुरुवात केली. तू नवरा काय? कशी भाजली तुझी बायको रडत असलेल्या जयंताकडे पाहत पाटील यांनी प्रश्न विचारला. साहेब मी रात्री अकरा वाजता कामावरून आलो. मला जेवण गरम करून देण्यासाठी स्टोव्ह पेटवत होती. स्टोव्हचा भडका उडाला आणि टिनाच्या साडीने पेट घेतला. मी तिला वाचविण्यासाठी ब्लँकेट अंगावर घातले पण तोपर्यंत ती बरीच भाजली होती. हवालदार पाटीलने जयंताचा जबाब लिहून घेतला. सकाळचे आठ



वाजत आले होते. टिनाचे नातेवाईक हॉस्पिटलमध्ये जमू लागले होते. रडारड सुरू होती. पाटील यांनी पंच घेऊन जयंताचे घर गाठले. दोन खोल्याचे घर. आतल्या खोलीत टिना भाजली होती. जयंता हवालदार पाटीलला दाखवत होता. स्टोव्ह आडवा पडलेला. जळलेल्या साडीचे तुकडे पडलेले तसेच संपूर्ण लादीवर रॉकेल पसरलेले. पोलीस खात्यात पंचवीस वर्ष काढलेल्या सुभाष पाटील यांना एक गोष्ट खटकली. टिना जेवण गरम करत होती मग जेवणाचे एकपण भांडे जवळपास दिसत नव्हते. हवालदार पाटलांनी जयंताकडे एक कटाक्ष टाकला. जयंता नक्कीच खोटं बोलत होता. परंतु प्रत्यक्ष साक्षीदार नसल्यामुळे सावध पावले टाकायची पाटीलने ठरविले. टिनाच्या दोन मुली एक अक्षता आठ वर्षाची तर दुसरी जागृती पाच वर्षाची. आई देवाघरी गेली याची कल्पना सुद्धा नव्हती. हवालदार पाटीलने महिला शिपाई सावंत हिला टिनाच्या दोन मुलीजवळून रात्री काय घडल याचा अंदाज घेण्यास सांगितले. टिनाच्या दोन्ही मुलींना जवळ घेत सावंतने चौकशीला सुरुवात केली. परंतु दोघीही रात्रीच्या प्रकाराने घाबरल्या होत्या. मम्मीला भेटायच ना.. मला सांग रात्री काय झालं. मम्मी जेवण बनवत होती का? सावंत मॅडम मम्मीला भेटायला नेणारा म्हटल्यावर दोघींची कळी खुलली होती. मोठी अक्षता सांगू लागली. पप्पा मम्मीच भांडण झाल. रात्री खूप मारल मम्मीला.



सावंत शिपाईनी हवालदार पाटीलला टीनाच्या दोन मुलींनी दिलेली माहिती सांगितली. त्यावरून हा अपघात नसून जयंताने ठरून टिनाला जाळले असावे याची खात्री पटल्यावर पाटीलने जयंतला पुन्हा पोलीस ठाण्यात बोलावले. का जाळलीस बायकोला? असा प्रश्न विचारताच जयंत गडबडला. साहेब मी कशाला जाळू टिनाला. उलट मी तिला वाचवत होतो.. .. हे बघा माझे दोन्ही हात पाय भाजलेत. दोन्ही हात पाटील समोर धरत जयंता रडू लागला. तुझ्या मुली तर सांगतात.. .. पप्पानी मारला मम्मीला. हे ऐकताच जयंता चपापला. साहेब लहान आहेत त्या. त्यांना काय कळते असे जयंता सांगू लागला. हवालदार पाटीलने जयंता खोटं बोलतोय हे केव्हाच ओळखलं होत. तू अस खरं बोलाणार नाहीस. पोलीसी खाक्या दाखवावा लागेलर् सांगत कोपऱ्यात पडलेली लाठी उचलली. जयंताच्या दोन्ही पायाच्या तळव्यावर लाठीचा फटका बसताच जयंता कळवळला. साहेब मीच जाळली टिनाला. सांगतो सगळं खरं सांगतो, जयंताने नांगी टाकली. आमचा प्रेमविवाह होता. टिना दिसायला सुंदर असल्यामुळे येणारा जाणारा तिच्याकडे पहायचा. मला नाही आवडायच. मी तिला घरातून बाहेर पडू द्यायचो नाही. माझ्या मनात सारखा संशय यायचा. टिनाच दुसऱ्या कोणा बरोबर प्रेम असेल. त्यातूनच मी दारू प्यायचो तिला मारझोड करायचो.



संशयाच भूत माझ्या मानगुटी बसलेल. त्या रागातूनच रात्री मी टिनाच्या अंगावर रॉकेल ओतल आणि पेटवून दिल. शेजाऱ्यांना संशय येऊ नये म्हणून मी विझवताना आरडाओरड केला. टिना मुकी असल्यामुळे कोणाला काही कळले नाही असे जयंता सांगत होता. पण मुलींनी सर्व प्रकार पाहिला. त्या कुठे बोलणार नाही असे वाटत होते असे जयंत निर्लज्जपणे हवालदार पाटीलला सांगत होता. अरे कमीत कमी दोन मुलीचा तरी विचार करायचा होतास. बालवयात त्यांना पोरक केलस. शेवटी मुलींनी आईच्या खुनाला वाचा फोडली आता बस आयुष्यभर खडी फोडत तुरुंगात असे बोलत हवालदार पाटीलने जयंताची रवानगी कोठडीत केली.



# निष्कलंक

पोलीस खात्याची नोकरी म्हणजे सुळावरची पोळी. भाऊ करमरकर सारखा प्रामाणिक हवालदाराच्या नशिबी वरिष्ठाच ऐकलं नाही म्हणून बाका प्रसंग आला होता. परंतु त्या प्रसंगातून केवळ देवाची करूणा आणि दैव बलवत्तर म्हणून भाऊ सहिसलामत सुटला.

संध्याकाळचे सात वाजून गेले होते. घंटेचा आवाज आला तसा मनू, समीर आणि सीमाची पळापळ झाली. एवढा वेळ सुरु असलेल्या दंगा थांबला. कोपऱ्यात पडलेल दप्तर पुढ्यात ओढून पुस्तकात डोकं घालून तिघेही अभ्यासाला बसले. बैठी पोलीस लाईनपासून काही अंतरावर मारुतीचे मंदिर होते. संध्याकाळी सात नंतर भाऊ घरी यायच्या अगोदर मारुतीचे दर्शन घेत. वर्दळ नसलेल्या मंदिराची घंटा वाजली म्हणजे भाऊ आले हे समीकरण बनले होते. भाऊ म्हणजे मधुकर शंकर करमरकर पोलीस खात्यात हवालदार म्हणून नोकरीला. कडक शिस्तीमुळे भाऊचा पोलीस लाईनीमध्ये देखील दरारा होता. पोलीस लाईनमध्ये सर्वजण भाऊ



हाक मारत असल्यामुळे घरात देखील मुलांच्या तोंडी भाऊच बसलेल. आठ

जणांचं मोठं हसत-खेळत कुटुंब. पत्नी चंद्रकला, मोठा मुलगा मयूर दहावी होऊन घरीच होता. सुजाता कॉलेजला जाणारी समजूतदार, पण समीर, मनू आणि सीमा अद्याप लहान शाळेत जाणारी. तिघेही अवखळ. भाऊ घरात नसते की घर डोक्यावर घ्यायचे. पण काही महिन्यापूर्वी घराला दृष्ट लागली होती. भाऊवर बिकट प्रसंग ओढावला आणि भाऊला पोलीस खात्यातून सस्पेंड करण्यात आले. सस्पेंड झाल्यावर अर्धा पगार, कुठे नोकरी करायची नाही अशा कडक अटी पोलीस खात्यात. त्यामुळे आठ जणांचे कुटुंब कसं चालवावं या विवंचनेत भाऊ पडलेला. कधीही देवाला हात न जोडणारा भाऊ नित्यनेमाने देवळात जात होता. भाऊ विरुद्ध कट रचण्यात आला होता. शेजारच्या गावातील मारामारीची केस भाऊकडे आली होती. दोन्ही पार्ट्याची चूक होती. डोकी फुटली होती. भाऊनी केस दाखल केली होती. दोन्ही बाजूकडील मिळून पंचवीस आरोपी होते. त्यात एक राजकीय पक्षाचा पुढारी आणि ग्रामपंचायत सदस्य गणपत पाटील होता. इन्स्पेक्टर मानेला भेटून पाटीलची सेटिंग सुरू होती. अखेर तोडपाणी होऊन पाटीलच नाव वगळायच ठरल. पण भाऊ या गोष्टीला तयार नव्हता. मानेनी स्वतः केबिनमध्ये बोलावून भाऊला



पाटलाच नाव काढून टाकायला सांगितल्यावर भाऊंनी स्पष्ट नकार दिला. भाऊचा नकार ऐकताच माने साहेबांची आग तळपायातून मस्तकात गेली. करमरकर माझी ऑर्डर आहे. गणपत पाटलाच नाव एफआयआर मधून काढा. भाऊनी वीस वर्षे पोलीस खात्यात घालवली होती. माने सारखे कित्येक भ्रष्ट साहेब पाहिले होते. पोलीस अधिक्षकासमोर देखील ताठ मानेने ऊभा राहणारा एकटा भाऊ करमरकर होता. माने साहेब मला हे प्रकरण पोलिस अधिक्षकांना सांगावे लागेल असे भाऊ करमरकरांनी सांगताच माने साहेबांची टरकली. भाऊ पुढे काही इलाज नाही त्यामुळे मानेनी हार मानली. पाटीलना काही दिवस कोठडीत काढावी लागली. भाऊ करमरकर माने साहेब आणि गणपत पाटलाच्या डोक्यात फिट बसला होता. काही करून भाऊला धडा शिकवायचा निर्धार दोघांनी केला. तसा प्लॅनही आखला. नाईट राऊंड करून भाऊ घरी झोपलेला. दुपारी एकच्या दरम्यान तीन व्यक्ती भाऊच्या खोलीवर आल्या. सत्तरीकडे झुकलेला म्हातारा, सोबत एकतीस ते पस्तीशीची महिला आणि एक तिशीचा तरुण होता. तिशीतला तरुण पुढे झाला. साहेब गावठी दारू विक्रीचा आरोपी बाबू पकडलात त्याची बायको आणि हे वडील आहेत. बाबुला भेटायचं होत. पण तुमच्या परवानगी शिवाय भेटू देत नाहित. भाऊनी तरुणाकडे एक नजर टाकली. बेरकी वाटत होता. म्हातारा आणि



बाबूची बायको हात जोडून दारात पाहून भाऊला दया आली. ठीक आहे पोलीस ठाण्यात जा. मी येतो थोड्या वेळात असे भाऊनी सांगितले. तरी तरुण घुटमळतच राहिला. अरे वर्दी करून यायला वेळ लागेल पुढे व्हा असे सांगताच तिघेही निघाले. भाऊनी हातपाय तोंड धुवून वर्दी चढवली. चहाचा अर्धा कप जेमतेम संपविला आणि घरातून निघाला. पुढे नशिबात काय वाढून ठेवलेय याची भाऊला पुसटशी कल्पना नव्हती. भाऊ पोलीस ठाण्याच्या आवारात पोहचला. तसा मगाशी घरी आलेला तरुण पुढे आला. भाऊच्या पाठोपाठ पोलीस ठाण्याच्या पायऱ्या चढताना तरुणाने अलगद भाऊच्या पॅन्टच्या खिशात बारीक कागदाची पुरचुडी टाकली. सेकंदात घडलेला प्रकार भाऊच्यापण लक्षात आला नाही. पोलीस ठाण्यात जाताच भाऊनी कडवे शिपायाला बाबुला बाहेर आणण्याची सूचना केली. तेवढ्यात साहेबाच्या केबिनची बेल वाजली आणि बाबुला आणायला निघालेला कडवे माघारी वळून साहेबांच्या केबिनमध्ये गेला. करमरकरला आत पाठव असा माने साहेबांनी निरोप दिला. साहेबांनी आत बोलावलय. तसा भाऊ करमरकर केबिनमध्ये शिरला. साहेबाला सॅल्यूट ठोकली. केबिनमध्ये अगोदरच सफारी घातलेल्या तीन व्यक्ती हजर होत्या. करमरकर आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभागातून आलोय अशी तिघांपैकी एकाने ओळख करून दिली. पण पुसटशी कल्पना



नसलेल्या करमरकरने तिघांनाही सॅल्यूट केला. करमरकर दारू प्रकरणातील आरोपी सोडवण्यासाठी तुम्ही पाचशे रुपये लाच मागितल्याची तक्रार आलेय असे समोरच्या अधिकाऱ्यानी सांगितल्यावर भाऊ गोंधळला. नक्की काय प्रकार आहे त्याला समजेना. साहेब खोट आहे ऊलट त्याचा म्हातारा बाप आणि बायकोला भेटायचं म्हणून ते पोलिस ठाण्यात आलेत. हव तर त्याना विचारा असे भाऊ सांगू लागला. त्याना विचारूच पण तुमच्या पॅन्टच्या खिशात काय आहे ते टेबलवर काढून ठेवा असे अधिकाऱ्यांनी सांगितले. काय घडले याची अजिबात कल्पना नसल्यामुळे भाऊनी पॅन्टच्या खिशात हात घातला. उजव्या खिशातून चुरगळलेले कागदाची पुरचुडी केलेली पाचशेची नोट पाहून भाऊला धक्काच बसला. नोटेवर पांढरी पावडर लावली होती. खिशात हात घातल्यावर भाऊच्या हाताला पावडर लागली होती. साहेब ही नोट माझी नाही असे भाऊ सांगू लागला. ठीक आहे कळेल पाच मिनिटात असे बोलत अधिकाऱ्यांनी एका व्यक्तीला आत बोलावले. त्याला पाहताच भाऊच्या डोक्यात प्रकाश पडला. हाच तरूण बाबूच्या बायकोला आणि म्हाताऱ्या बापाला घेऊन घरी आला होता. साहेब करमरकर हवालदार हजार रुपये मागत होते बाबुला सोडवायला शेवटी पाचशेवर तयार केले असे तरुणांनी सांगतातच पोलीस ठाणे स्वतःभोवती फिरतय असं



वाटून भाऊच्या डोळ्यासमोर अंधारी आली. पण स्वतःला सावरत कसाबसा भाऊ टेबल पकडून उभा राहिला. हा तरुण खोट बोलतोय आजच मला भेटला असे भाऊ करमरकर जीव तोडून सांगत होता. परंतु हाताला लागलेली नोटेची पावडर, अधिकाऱ्याजवळ असलेल्या नोटेचा नंबर मेळ खात होता. सर्व पुरावे भाऊच्या विरोधात होते. भाऊला सस्पेंड करण्यात आल. न्यायालयीन लढा देण्याशिवाय भाऊच्या हातात उरल नव्हत. भाऊला आर्थिक पाठबळ पण नव्हत. अशावेळी वयात आलेला मयूर मदतीला आला. मौजमजा करण्याच्या वयात मिळेल ते काम करून भाऊचा भार कमी करण्यासाठी मयूर झटू लागला. घरावर काय परिस्थिती ओढावलेय याची जराही कल्पना लहानग्या मनू आणि सीमाला नव्हती. जिल्हा न्यायालयात भाऊच्या विरोधात निकाल गेला. शिक्षा तर झाली शिवाय नोकरीवर गंडातर येणार नाही हे नक्की. पण त्यापेक्षा निष्कलंक असताना चारित्र्यावर लागलेला डाग भाऊला पुसायचा होता. भाऊनी वरच्या न्यायालयात अपील केल. जवळ होत नव्हतं तेवढं सोनं विकल. बायकोच मंगळसूत्र, कानातल्या कुड्या शिल्लक राहिल्या नव्हत्या. नशीबानी भाऊला पुण्याचे नामांकित नांदे व नेरकर वकील मिळाले. भाऊ सच्चा हे दोघांनी पहिल्याच भेटीत ताडल. खटला आपण जिंकू असा विश्वास त्यांनी भाऊला दिला. न्यायालयात नांदे वकिलाची



साक्षीदारांची उलट तपासणी सुरू होती. भाऊनी पोलीस ठाण्याच्या बाहेर लाच स्वीकारली असे नमूद होते. याच मुद्द्यावरून नांदे वकिलांनी लाजलुचपतच्या अधिकाऱ्यांना घेरल. भाऊ करमरकरांनी जर पोलीस ठाण्याच्या बाहेर लाच घेतली होती मग त्याच वेळी त्याच्या हाताला नोटेची पावडर लागली असती. केबिनमध्ये बोलावल्यावर पहिल्यांदा पुरावा म्हणून हाताला लागलेली पावडर तपासणी ऐवजी भाऊला खिशात हात घालून नोट का काढायला लावली या प्रश्नावर अधिकारी सुद्धा निरूत्तर झाले. नांदे साहेबांनी भाऊ करमरकरांची पोलीस खात्यात नोकरीची वीस वर्षाचा लेखा-जोखा न्यायमूर्ती समोर मांडताना भाऊ करमरकरना अडकविण्याचा कट असल्याचे न्यायालय पटवून दिले. भाऊची निर्दोष सुटका झाली भाऊ करमरकराच्या अंगावर पुन्हा खाकी वर्दी आली. वरिष्ठांच्या सूडबुद्धीला बळी पडता पडता भाऊ वाचला होता. वर्दीला लागलेला डाग पुसला होता शिवाय कुटुंबाची होणारी वाताहत थांबली होती.



# कोवळी कळी

शनिवार असल्यामुळे सकाळची शाळा. नेहमी सकाळची शाळा म्हंटल्यावर एक तास अगोदर उठून बसणारी हेमा अंथरुणातच पडून होती. आईने दोन वेळा हाक मारली तरी हेमा उठायचं नाव घेत नव्हती. अगं कंटाळा आलाय का? बरं वाटत नसेल तर नको जाऊ शाळेत. शाळेत नको जाऊस म्हटल्यावर हेमाने डोक्यावरची चादर हळूच बाजूला सारली. आईची आवराआवर सुरू होती. दहा वर्षाची हेमा गावातल्या मराठी शाळेत चौथीत शिकत होती. अभ्यासात हुशार हेमा कधी शाळेत जायला कंटाळा करायची नाही. पण हल्ली वरचेवर तिचं अभ्यासात लक्ष नसायच. शाळेत जायला कंटाळा करायची. हेमाच्या आईच्या लक्षात ही गोष्ट केव्हाच आली होती. हेमाच्या अंथरुणाजवळ डोक्यावरून हात फिरवत हल्ली का कंटाळा करतेस. शाळेत भांडलीस का मैत्रिणीबरोबर? आईच्या प्रश्नाने हेमाच्या डोळ्यात पटकन

अश्रू आले. अगं रडायला काय झाल मला सांग. मी काढते समजूत रिना आणि अश्विनीची.. हेमाच्या दोन जिवलग मैत्रिणी



आईला माहिती होत्या. तिच्याच वर्गात शिकत होत्या. आई त्या दोघीपण शाळेत जायचं नाही म्हणतात. हेमाच्या उत्तराने आई विचारात पडली. काहीतरी घडलय पोरी लपवत आहे याची जाणीव झाल्यावर तिने हेमाला जवळ घेतले. अग मला सांग काय झालंय. कोणी त्रास देतेय का? आईच्या प्रश्नावर हेमाच रडू आणखी वाढल. शेवटी आईने धीर दिल्यावर हेमाने बोलायला सुरुवात केली. आई बाई शाळेत आल्या नाही का गुरुजी दुसऱ्या खोलीत नेऊन कपडे काढायला लावतात. नको नको तिथे हात लावतात. चिमुरडीच्या तोंडातून गुरुजी विषयी ऐकताच आईला धक्काच बसला. क्षणभर डोकच सुन्न झाल. हेमा खोटं बोलणारी नव्हती. आई आज शनिवारी बाई नसणार गुरुजी परत दुसऱ्या खोलीत नेणार म्हणून आज शाळेत नको हेमाच्या बोलण्याने भानावर आलेल्या आईने क्षणात निर्णय घेतला. हेमा ऊठ तयारी कर शाळेत जायची. चांगलीच अद्दल घडवते गुरुजीला. दहा मिनिटात हेमाला तयार करून आई शाळेजवळ पोहोचली. हे बघ हेमा मी आलेय कोणाला बोलू नकोस. गुरुजी सांगतील तसे वाग. आईने हेमाला सर्व समजावून वर्गात पाठवली. दोन शिक्षकी शाळा. फक्त दोनच वर्ग. शिक्षक भगवान सोनवणे पंधरा वर्षे नोकरी झालेला. दोन मोठी मुलं कॉलेजला जाणारी पण



सभ्यतेचा बुरखा पांघरून समाजात वावरणारा नराधम होता. आज गुरुजीचे खरं रुप

सर्वांसमोर आणायचं असा निश्चय हेमाच्या आईने केला होता. ती शाळेच्या

भिंतीजवळ दबा धरून बसली. दहा मिनिटात गुरुजी हेमाला घेऊन बाजूच्या खोलीत जाऊ लागला तशी हेमाची आई सावध झाली. गुरुजीनी हेमाला आत घेऊन दरवाजा बंद केला. पोरीच शब्द नि शब्द खरा आहे. हेमाच्या आईने पाच मिनिट जाऊन दिली. आतून हेमानी आई अशी हाक मारल्यानंतर हेमाच्या आईनी धाव ठोकली. दरवाजा ठोठावताच गांगरलेली गुरुजी भगवान सोनवणेची त्रेधा उडाली. हेमानी धावतच जाऊन दरवाजाची कडी काढली. पोरीला अर्धनग्न अवस्थेत पाहून संताप अनावर झालेल्या हेमाच्या आईनी पायातल्या चपलेने गुरुजीला हाणायला सुरुवात केली. एव्हाना गावात गुरुजीचा कारनामा पोहोचला. अख्खा गाव जमा झाल. गुरुजीची धुलाई झाली. हेमा बरोबर आणखी मुलींनी गुरुजींचे कारनामे सांगताच पालकांचा संताप अनावर झाला. गुरुजीची शाळेतून हकालपट्टी करण्यात आली. भगवान सोनवणेची बदली करण्यात आली. परंतु आणखी कोवळया कळयांचे बालपण भगवान सोनवणे कुस्करून टाकेल त्यापेक्षा त्याला कायमचा धडा



मिळावा म्हणून हेमाच्या आईने पोलीस ठाणे गाठत तक्रार दिली. गुन्हा दाखल झाल्यावर भगवान सोनवणे फरारी झाला. अखेर सामाजिक कार्यकर्ते व पत्रकारांनी भगवान सोनवणेला अटक करा म्हणून दबाव आणल्यावर पोलिसांनी सोनवणेला अटक केली. शिक्षणाचा पवित्र काम करताना लैंगिकतेच्या आहारी गेलेल्या गुरुजीच्या हातात खडू ऐवजी बेड्या पडल्या त्या जागरूक हेमाच्या आईमुळे.



# फसलेली गेम

रात्रीचे दहा वाजत आले होते. बार बंद करण्याची वेळ झाली होती. बहुतेक गिऱ्हाईकानी आटोपते घेत बिल मागविले. परंतु विनोद आणि मनिष मात्र हलायचे नाव घेत नव्हते. गल्ल्यावर बसलेल्या यादव अण्णाची सुद्धा दोघांना बोलायची हिंमत नव्हती. दोघेही गुंड प्रवृत्तीची होते. गावात दोघांची दहशत होती. त्यामुळे अण्णांनी वेटरला इशारा करताच वेटर दोघांच्या टेबलासमोर ऊभा राहिला. साहब बिल बनाऊ? विनोदनी हातातला ग्लास खाली ठेवत तारवटलेली नजर वेटर वर रोखली. एक बियर अजून घेऊन ये.. अशी ऑर्डर सोडत सणसणीत शिवी वेटरला घातली. तसा बिचारा वेटर मागे फिरला. यादव अण्णांनी खुणेनेच वेटरला बियर देण्यास सांगून स्वतः गल्ल्यावरून उठला. बारच शेटर अर्धवट ओढून अण्णा परत जागेवर येऊन बसला. तीनचार गिऱ्हाईक निघण्याच्या तयारीत होते. वेटरने बियरचे सील विनोदला दाखवत बियरचे झाकण खोलले. ग्लास तोंडाला लावत क्षणात रिकामा करताच विनोदचा वरचा सूर लागला. सामान आणलय. पितृ पंधरवड्यातच गेम करू. देव बसायच्या आधीच काकाला ढगात



पाठवू असा विनोद बरूळू लागला. मागच्या टेबलवर बसलेला परेशच्या कानावर ढगात पाठवू शब्द पडताच तो सावरून बसला. काहीतरी लोचा आहे. परेश कान टवकारून विनोद आणि मनीष बोलण ऐकू लागला. अरे सामान जपून ठेवलस ना? एक तर मोठ्या मुश्किलीने मिळालय अस मनीषने विनोदला विचारले. त्याची फिकीर नको. जुन्या घरात ठेवलय. काकाची तिथून ये जा असते. तिथेच गेम वाजवू आणि रात्रीत शिर्डी गाठू असे म्हणत विनोदने दोन बोटांनी गोळी मारल्याचा इशारा करताच मनीषने हसत त्याला टाळी दिली. दोघांच बोलण ऐकून परेश समजून गेला. कोणाची तरी सुपारी दोघांनी घेतलेय. दोघांना कळणार नाही अशा पद्धतीने परेश उठला. गल्ल्यावर बिलाच पैसे देत शटर खालून वाकून बाहेर येत मोटरसायकला किक मारली. परेशची मोटरसायकल पाच मिनिटात रसायनी पोलीस ठाण्याच्या आवारात पोहचली. परेश पोलिसांचा खबऱ्या होता. त्यामुळे आज मिळालेली महत्वाची खबर कधी एकदा साहेबांच्या कानावर घालतो असे त्याला झाले होते. इन्स्पेक्टर बांदेकर ड्यूटी आटपून निघण्याच्या तयारीत होते. तेव्हाच घामाघूम झालेला परेश पाहून ते क्षणभर विचारात पडले. काय परेशराव एवढ्या रात्री काय गडबड केली का? असा प्रश्न बांदेकरानी विचारताच मोठा श्वास घेत पाच मिनिटापूर्वी बारमध्ये ऐकलेली हकीगत घडाघडा ओकून परेश मोकळा झाला. प्रकरण



गंभीर आहे याची जाणीव बांदेकरांना झाली. दोन हवालदार आणि दोन पोलीस शिपाई सोबत घेत जीप काढण्याचे आदेश देत बांदेकर निघाले. निघताना महत्वाची माहिती दिल्याबद्दल परेशच्या खिशात

बक्षिसी टाकत त्याची पाठ थोपटायला बांदेकर विसरले नाहीत. पोलिस जीप बार समोर थांबली. पुढे होत हवालदार राणेनी बारच अर्धवट शटर हातानी वर ढकलताच यादव अण्णा गांगरला. गल्ल्यावरून जवळ-जवळ उडी मारून हात जोडत साहेबांच्या पुढे आले. बांदेकर साहेब आणि सगळी फौज पाहून अण्णाला काय बोलाव ते कळेना. सरकार काय सेवा कर विचारत अण्णा इन्स्पेक्टर बांदेकरांच्या मागे फिरू लागला. बांदेकर विनोद आणि मनिषच्या टेबलापाशी येऊन थांबले. परंतु दोघांवर नशेचा पुरेपूर अंमल चढल्यामुळे समोर पोलीस आहेत विसरून दोघानी शिव्या देण्यास सुरुवात केली. दोघांच्या कॉलरला पकडत खेचत काढून बांदेकरानी हरामखोरांना जीपमध्ये टाका असा आदेश देताच सोबतच्या शिपायानी दोघांची गठडी वळून जीपमध्ये कोंबले. जीप रसायनी पोलीस ठाण्यात पोहचली. थोडी नशा कमी होऊ दे मगच बोलतील असे सांगत बांदेकरांनी विनोद आणि मनीषला लादीवरच बसविले. पहाटेचे चार वाजत आले होते. सर्वांची साखर झोपेची वेळ परंतु रसायनी पोलिसांची झोप मात्र उडालेली. एव्हाना विनोद



आणि मनीषची बऱ्यापैकी उतरलेली. आजूबाजूची खाकी वर्दी, पोलीस स्टेशन दोघांना नवीन नव्हते. त्यामुळे बांदेकर साहेबांना सॅल्यूट मारून साहेब गरिबाना का आणलत? असा उलटा प्रश्न दोघानी केला. समजेल थोड्या वेळात अस म्हणत बांदेकरांनी इशारा करताच हवालदार राणेनी विनोदला दुसऱ्या खोलीत नेला. मनीष कुणाची गेम करणार.. कुठे ठेवलय सामान? असा प्रश्न इन्स्पेक्टर बांदेकरानी विचारताच मनीष गोंधळला. साहेब मला काही माहीत नाही. माझा काही संबंध नाही असे सांगत मनीष नजरेला नजर देणं टाळू लागला. बऱ्या बोलान खरं सांग नाहीतर तुला बोलता करण्याचे उपाय आहेत पोलिसाकडे असा दमच बांदेकरानी भरला. तेवढ्यात दुसऱ्या खोलीतून हवालदार राणे बाहेर आला. साहेब विनोदने सर्व माहिती दिली आहे. मनीष सूत्रधार आहे कटाचा अस तो म्हणतोय असा गुगली राणेनी टाकला. प्रकरण आपल्यावर शेकतय पाहून राणेनी टाकलेल्या गुगलीत मनीष फसला. साहेब माझा काय सबंध मी फक्त गावठी पिस्तुल आणि काडतुस आणून दिले. गेम तर विनोदच करणार होता त्याच्या काकाची असे सांगून मनीषने पोलिसांच काम सोपे केल. इन्स्पेक्टर बांदेकरांनी मोर्चा विनोदला ठेवलेल्या रूमकडे वळविला. मनीषने सर्व सांगितलय आता लपवून फायदा नाही सर्व खरं सांग का मारणार होतास काकाला? तसा विनोद गळपटला. साहेब माझा



काका एका पक्षाचा मोठा पदाधिकारी. या भागात येत असलेली सर्व बांधकामाच्या साईटमध्ये मला भागीदार घेणार होता. मला बोलला सुरुवातीला पाच लाख गुंतव. मी बायकोचे दागिने गहाण ठेवून पाच लाख रुपये काकाला दिले. आज दीड वर्ष होत आले तरी पाच रुपयाच काम मिळाल नाही. पैसे मागायला गेलो का टाळाटाळ करतो. मग साहेब टाळकच सटकलं. मनीषच्या मदतीने काकाला संपवायच ठरवल विनोद सांगत होता. मग सर्व कामे आपलीच असा प्लॅन आखला होता. पण पोलिसांना कशी कुणकुण लागली आमचा प्लॅन फसला असे सांगत विनोद दोन्ही हातानी डोक धरून जमिनीवर बसला. कायद्याचे हात लांब असतात. चला पिस्तूल कुठ लपवले दाखवा असे म्हणत इन्स्पेक्टर बांदेकरनी विनोद आणि मनीषाला जीपमध्ये बसविले. एव्हाना उजाडून आल होत. सकाळच विनोदच्या जुन्या पडक्या घरासमोर पोलीस जीप थांबली. सर्व गावकरी हातातली काम टाकून विनोदच्या घरा भोवती जमा झाली. माजघरात कपड्यात गुंडाळून ठेवलेल पिस्तूल आणि जिवंत काडतूस विनोदने साहेबांच्या हातात ठेवली. परेशच्या सतर्कतेमुळे गेम होता होता फसले होती. एक जीव वाचल्याचे समाधान इन्स्पेक्टर बांदेकरांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते.



# पार्टी

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी जंगी पार्टीचे आयोजन टेरेसवर करण्यात आले होते. दूरसंचार विभागातील कर्मचारी स्टाफ यांच्या लगत दोन बिल्डिंग होत्या. नवीन वर्षाचे स्वागत आणि भंडारी मॅडम निवृत्त होत असल्यामुळे त्यांना निरोप समारंभ असा दुहेरी बेत होता. पार्टी जोरदार रंगली होती. डिजेवर शांताबाई गाणं सुरू झालं आणि पार्टीतील महिलानी भंडारी मॅडमना पण नाचायचा आग्रह धरला. नको म्हणत असताना सर्वांच्या आग्रहापुढे त्याचं काही चालेना. त्या सामील झाल्या आणि ठेका धरताच एकच जल्लोष झाला. दोन मिनिटातच भंडारी मॅडमना धाप लागली. खुणेनच हाताने दमल्याचा इशारा करत खुर्चीवर बसल्या. रात्रीचे दोन वाजत होते. खुर्चीत बसलेल्या भंडारी मॅडमच लक्ष बाजूच्या ए विंगकडे गेल. दुसऱ्या मजल्यावरून गुरव यांच्या गॅलरीमध्ये चादर बांधुन पहिल्या मजल्यावर सोडण्यात आली होती. आणि पहिल्या मजल्यातील गॅलरीतून उतरण्यासाठी बांधलेला कपडा लोंबकळत होता. काहीतरी गडबड दिसतेय. "ए" विंगमधील सर्व पार्टीला आहेत. मग का प्रकार काय असेल? सर्व पार्टीत आहे पाहून चोर



तर शिरले नसतील? अशी शंका भंडारी मॅडमना आली. पार्टीचा बेरंग नको म्हणून त्यांनी गुरव वहिनीला सांगण्याचा निर्णय घेतला. गुरव वहिनीच्या हाताला पकडून भंडारी मॅडमने टेरेसजवळ आणून गॅलरीत बांधलेली चादर दाखवताच गुरव वहिनी देखील गोंधळल्या. मी जाऊन बघते काय प्रकार आहे, 'अस म्हणत गुरुव वहिनी निघाल्या. पण चोर असेल तर? या भीतीने भंडारी मॅडमने त्यांना थांबवले. एकट्या जाऊ नका.. सोबत कोणालातरी घेऊया. अस त्यांनी सुचवले. पार्टीत कुणकुण लागलीच. तसा डीजे बंद झाला. मानेनी पोलिसांना फोन केला. सर्वजण ए विंगकडे निघाले. गुरव वहिनी लगबगीने पुढे त्याच्या मागे कॉलनीतील सर्व बायका होत्या. पुरुष मंडळी ज्या ठिकाणी चादर लोंबकळत होती तिथे आले. मानेची नजर काळोखात पडलेल्या व्यक्तीवर गेली. अरे कोणीतरी आहे तिथे.. सावध... तसे सर्वजण थांबले. मानेनी हातातील टॉर्चचा उजेड त्या व्यक्तीच्या तोंडावर मारला आणि. अरे गुरव साहेब आहेत असे शब्द त्याच्या तोंडातून बाहेर पडले. मानेनी पुढे होत गुरव साहेबांना उचलले. डोक्याला जबर मार लागलेला. रक्त वाहत होत. एवढ्यात पोलीस जीप सुद्धा बिल्डींगच्या आवारात पोहचली. लांबे इन्स्पेकटरना पाहून मानेनी साहेब मीच फोन केला होता. चोर शिरले असावेत. गुरव साहेबांची झटपट झाली असावी. त्याना खूप मार लागलाय. पहिले हॉस्पिटलला न्या



मग बघू लांबे साहेबानी सांगताच मानेनी गाडी काढत हॉस्पिटलची वाट धरली. सोबत आलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना बिल्डिंगला घेराव घालण्याच्या सूचना दिल्या. तांबे साहेब दुसऱ्या मजल्यावर गुरुव यांच्या ब्लॉकवर पोहचले. गुरव वहिनी आणि बिल्डिंग मधील बायकाना गुरव जखमी झाल्याचे समजताच रडारड सुरू झाली. बाई रडू नका. काय चोरीला गेलय बघा. अस म्हणत चादर बांधलेल्या ठिकाणी लांबे साहेब पोहचले. पण चोरी झाल्याची काहीच लक्षणे दिसत नव्हती. नक्की काय प्रकार आहे हे लांबे साहेबांचे लक्षात येईना.

साहेब चोर नसणार. माझ्या चुकीने घडलय सर्व. गुरव वहिनी सांगू लागल्या. साहेब थर्टी फर्स्टला सकाळपासून प्यायला सुरुवात केलेली माझ्या नवऱ्यानी. दुपारी उलट्या सुद्धा केल्या. म्हणून शेवटी रात्री पार्टीत तमाशा नको म्हणून घराला लॉक करून आले होते. घरात बसून प्या असे सांगितले होते. पण हा माणूस.. असे बोलताना गुरव वहिनी थांबल्या.. बिल्डींगमधील बायकांचे कान टवकारले होते. बोला ताई... लांबे साहेबानी गुरव वहिनी सांगताच

पुन्हा सांगायला सुरुवात केली. घराला बाहेरून लॉक

केले तर दारुसाठी हा माणूस घरातील चादर गॅलरीत बांधून उतरायला गेला आणि हा सर्व प्रकार घडला असावा. गुरव



वहिनीच्या माहितीने हसाव कि रडाव हेच कळत नव्हत. पण चोर आणि चोरी मात्र नवीन विषय नव्या वर्षात बिल्डींगमधील बायकाना चर्चेला मिळाला होता.



# महागडा मोबाईल

*मानवाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र आणि निवारा असून आणखी एका वस्तूची भर पडली आहे... मोबाईल. काही वर्षांपूर्वी भारतात माहित नसलेला मोबाईल जीवनाचा अविभाज्य भाग असल्यासारखी परिस्थिती असून चांगल्या गोष्टी बरोबर वाईटही असते याचे उदाहरण म्हणजे महागड्या मोबाईलसाठी घडलेली कर्जतमधील सत्यकथा.*

जय मल्हार पाहण्यात गुंग झालेल्या वनिताचे गॅसवर ठेवलेल्या कुकरकडे लक्षच नव्हते. तीन शिट्या केव्हाच झाल्या होत्या. कामावरून आलेल्या अविनाशची साधी दखल सुद्धा वनिता घेतली नाही. अग एक ग्लास पाणी तरी आणशील का? असे म्हणत अविनाशने सोफ्यावर अंग टाकले. परंतु बानुचे काय होईल या चिंतेत असलेली वनिता जागेवरून हलली नाही.. ... शेवटी वैतागून अविनाश सोप्यावरून उठला. किचनमध्ये जात ग्लासभर पाण्याचा घोट घेताना सहज स्वातीच्या खोलीत डोकावले. खोलीत पूर्ण अंधार. लाईट चालू करत अविनाशने संपूर्ण खोलीत नजर टाकली. स्वाती कुठेच नव्हती. बारावीच महत्त्वाच वर्ष असल्यामुळे सहाच्या आत घरात अशी ऑर्डरच अविनाशने स्वातीला दिली होती. परंतु अभ्यासाला न बसता एवढा वेळ पोरगी बाहेर आणि आई टीव्ही सिरीयल पाहण्यात गुंतलेय पाहून



अविनाशचा पारा चढला. तणतणत तो हॉलमध्ये आला. टीव्हीचे बटन बंद करताच वनिता भानावर आली. अविनाशला रागावलेला पाहून वनिताने काय झाल? टीव्ही का बंद केलात असे विचारताच.. .. स्वाती अद्याप घरी आलेली नाही. तुला काही काळजी आहे का पोरीची? असेल मैत्रिणीकडे... थांबा स्वातीला फोन करते म्हणत वनिताने स्वातीचा मोबाईल नंबर डायल केला. पण मोबाईल कव्हरेज क्षेत्राच्या बाहेर सांगत होता. अहो फोन लागत नाही स्वातीचा. मैत्रिणीच्या मोबाइलवर कॉल करून बघते. स्वातीची खास मैत्रीण हर्षदाला फोन लावल्यानंतर क्लास सुटल्यावर घरी जाते असे स्वातीने सांगितले होते असे उत्तर मिळाले. आता मात्र वनिताच्या चेहऱ्यावर चिंता स्पष्ट दिसू लागली. अविनाशकडे पाहत अहो मैत्रीण सांगतेय सहालाच घरी निघालेय स्वाती. कुठे गेली असेल... सांगताना वनिताला रडू कोसळल... अविनाशला क्षणभर काय कराव काहीच सुचेना. स्वातीला काही बडबड केलीस का? असे त्याने वनिताला विचारले. अहो मी कशाला बडबड करेन उलट तुम्हीच अभ्यासाच प्रेशर टाकता जास्त असे वनिताने अविनाशला सुनावले. ही वेळ एकमेकाला दोष देण्याची नाही मी बाहेर शोध घेतो. नाहीतर पोलिसांना कळवितो असे वनिताला सांगत अविनाश घराबाहेर पडला. रेल्वे स्टेशन, बस स्थानक, क्लासमधील मैत्रीणी सर्वत्र विचारपूस केली तरी स्वातीचा काही



तपास नव्हता. एव्हाना रात्रीचे नऊ वाजायला आले. तसा अविनाशचा धीर सुटू लागला. पोलिसांची मदत घ्यावी असा विचार करत थेट करत पोलिस ठाण्यात पोहोचला. ठाणे अंमलदार घरात जेवणासाठी डबा आणायला निघालेल घामाघूम होऊन आलेल्या अविनाशला पाहून थांबले. अविनाशला खुर्चीत बसायला सांगत पाण्याचा ग्लास पुढे केला. जेमतम एक घोट पाणी घशाखाली उतरवत अविनाशने स्वाती हरविल्याचे घरतला सांगितले. साहेब रोज सहाला घरी येते. पण आज अद्याप घरी आली नाही. मोबाईल पण लागत नाही. ठाणे अंमलदार घरतना अशा घटना नवीन नव्हत्या. परंत चौकशीचा भाग म्हणून स्वाती चे प्रेम प्रकरण असेल तर पूर्ण माहिती दया असे त्यांनी अविनाशला सांगितले. नाही साहेब तसं काही नाही. जास्त मैत्रिणी सुद्धा नाहीत पोरीला अस काकुळतीला येते अविनाशने घरत साहेबांना सांगितले. वयात आलेली मुलगी आहे वेळीच शोध घेतला तर काही वाईट घडणार नाही असा विचार करत घरत उठले. चला स्वातीची क्लास मधली मैत्रीण हर्षदाकडे जावू असे म्हणत घरत अविनाशला सोबत घेऊन निघाले. हर्षदाच्या घरासमोर मोटारसायकल थांबवत अविनाश घाईत उतरला. दाराची बेल वाजवल्यानंतर हर्षदाच्या आईने दरवाजा उघडला. स्वातीचे वडील आणि सोबत पोलीस पाहून हर्षदाची आई का घाबरली. अजून



सापडली नाही का स्वाती? असा प्रश्न तिने केला नाही. शोध सुरू आहे हर्षदाची मदत पाहिजे म्हणून आलोय असे अविनाशने सांगितले. पोलीस वर्दीतील घरतना पाहून हर्षदा चपापली. घरतच्या पोलीस नजरेनी क्षण टिपला. हर्षदा तुम्ही दोघी सोबत निघाला क्लास मधून मग स्वाती ने कुठे जाणार सांगितले का? घरत साहेबांनी विचारलेल्या प्रश्नावर हर्षदा गोंधळली... मी सहालाच घरी आली. आईला विचारा हव तर. मला वाटलं स्वाती पण घरी गेली असेल असं उत्तर हर्षदाने चाचरत दिले. पण उत्तराने समाधान न झालेल्या घरतनी हर्षदाकडे तिचा मोबाईल मागितला. तशी हर्षदाचा चेहरा पडला. मोबाईल देण्यास हर्षदा आढेवेढे घेऊ लागली. तसा घरतनी आवाज चढवल्यावर मात्र नाईलाजाने हर्षदाने मोबाईल दिला. मोबाईल मधील शेवटचा कॉल स्वातीचा होता. तो सुद्धा सात वाजून पाच मिनिटांनी केलेला. घरत साहेबांनी हर्षदाकडे पाहताच तिची नजर खाली गेली. तू सांगत होतीस सहा वाजता स्वातीला सोडलस. मग सात फोन आल्यावर काय बोलणं झाल सांग? हर्षदा उडवाउडवीची उत्तरे देऊ लागली. तसा घरत साहेबांचा पारा चढला. तुला अटक करावी लागेल हर्षदा खरं सांग कुठे आहे स्वाती? अटक शब्द ऐकताच हर्षदा आणि तिची आई घाबरली. पोरी काय माहिती असेल तर खरं सांगून टाक साहेबाना. आई ने सांगताच हर्षदा बोलू लागली. स्वाती बदलापूरला



मैत्रिणीकडे आहे. घरच्यांनी महागडा मोबाईल घेतला नाही म्हणून रागात घर सोडलय. नोकरी करून स्वतः मोबाईल घेईन असे सांगत होती. हर्षदाच बोलण ऐकून अविनाशला आठवल. महिनाभरापासून स्वाती वीस हजाराचा मोबाईल घ्या म्हणून हट्ट धरुन बसली होती. सर्व मैत्रिणी महागडे मोबाईल वापरतात तसाच मोबाईल मला पण हवा यावरून स्वाती नाराज होती. पण त्यासाठी स्वाती एवढा टोकाच पाऊल उचलेल अस अविनाशला वाटल नव्हतं. हर्षदा कडून बदलापूरच्या मैत्रिणीचा मोबाईल नंबर आणि पत्ता घेऊन घरत आणि अविनाश निघाले. रात्रीचा दीड वाजत होता. बदलापूरमध्ये एका चाळीपाशी घरत आणि अविनाश पोहचले. घरतनी स्वातीच्या मैत्रिणीचा मोबाईल नंबर डायल केला. बराच वेळ रिंग वाजल्यानंतर समोरून कॉल घेतला. स्वातीचे वडील बाहेर आलेत दरवाजा उघडा असे घरत साहेबांनी सांगितले. दारासमोरची लाईट लागली. दरवाजा उघडला. एवढ्या रात्री शोधत थकलेल्या बाबांचा घामाघूम चेहरा पाहून स्वातीला रडू कोसळल. माझी चुकी झाली नको मला महागडा मोबाईल सांगत स्वातीने बाबांना मिठी मारली. पोरगी सुखरूप आहे आणि काही तासातच भेटली ती केवळ घरत साहेबामुळे यांनी अविनाशचा कंठ दाटून आला. घरत साहेबांकडे पाहताना अविनाशच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.



साहित्य म्हणजे असतं काय?

जीवनाचे अनुभव असतात, कधी खरे तर कधी खोटे वाटतील इतके खरे.

जीवनमूल्यांचे आदर्श असतात, कधी सोपे, कधी अवघड. कधी अशक्यप्राय.

जगण्याच्या चढ उतारांचे आरसे असतात. कधी अनुभवलेले. कधी न ऐकलेले.

आपल्या मनाचा, आपल्या जीवनाचा आरसा असतो साहित्य.

साहित्यात रमू या.

साहित्यात रमणारा समाज अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगतीशील असतो.

प्रगती म्हणजे केवळ समृद्धी नाही ना!

ई साहित्य प्रतिष्ठान.

मराठी साहित्यातील एक कोवळे पान.

एक प्रसन्न अनुभव

www. esahity. in

www. esahity. com

esahity@gmail. com



**ई साहित्य प्रतिष्ठानला तेरा वर्षं पूर्ण होत आहेत.**
**मनोज कळमकर यांचं ई साहित्यचं हे दुसरं पुस्तक.**

पुस्तक वाचण्यासाठी क्लिक करा




मनोज कळमकर हे एक ग्रामीण पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते. घरचे खाऊन, स्वतःच्या कष्टाची कमाई करून, लष्करच्या भाकऱ्या भाजणारे या देशातले असंख्य तरूण हे या देशाचे खरे जागरूक नागरिक. त्यांच्यातीलच मनोज हे एक. शालेय जीवनापासूनच लिहिण्याची ऊर्मी त्यांच्यात आहे. ते मुख्यत्वे सामाजिक उपयुक्त असे लेखन करतात.

शहाणे करून सोडावे- सकळ जन ही समर्थांची ऊक्ति त्यांना शक्ती देते.

असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. पण त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकविक्रीबद्दल प्रकाशक साशंक असतात. जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आली नाही तर त्यांचे नांव प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता इंटरनेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत नेण्याचे काम अनेक संस्था करत आहेत.



ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ६ लाख वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्यासाठी ई साहित्यचे प्रयत्न चालू आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, कुमार सोनावणे, प्रतिक उकले, सुजाता सिद्धा, गायत्री रोडे, मनोज कळमकर, काजल दळवी, सचिन बोरसे, कार्तिकी



भट, डॉ. प्रितम दरवडे, अमोल गवळी, निकिता पाटील, संजीवनी देशपांडे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?